# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## सोमवार, दिनांक ०१ एप्रिल, २०२४ / चैत्र १२, शके १९४५

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

**२६.** विधानसभेचे सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन गुरुवार, दिनांक ०७ डिसेंबर, २०२३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या तृतीय सत्रात एकूण २६६ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले होते. त्यापैकी १२४ निवेदने मंगळवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या पत्रक भाग- दोन क्रमांक ८ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली. आता एकूण १४२ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ४४ निवेदने शाखेत प्राप्त झाली. उर्वरित प्रलंबित ९८ निवेदनांचा संबंधित मंत्रालयीन विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच एम.के.सी.एल. तर्फे विकसित करण्यात आलेल्या MOIS या संगणकीय प्रणालीव्दारे सन्माननीय विधानसभा सदस्यांनी संपूर्णतः ऑनलाईन (online) पध्दतीने लक्षवेधी सूचना दिलेल्या असल्यामुळे सन्माननीय विधानसभा सदस्यांना ऑनलाईन (online) पध्दतीने उत्तर प्राप्त होणार असून उर्वरित प्रलंबित निवेदने प्राप्त झाल्यानंतर सर्व विधानसभा सदस्यांना पत्रक भाग-२ व्दारे अवगत करण्यात येईल.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : ०१ एप्रिल, २०२४**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

<u>याची प्रत</u> :

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)
४. अनुवाद कक्ष
५. प्रतिवेदन

गृह (परिवहन) विभाग
लक्षवेधी सूचना

# महाराष्ट्र विधानसभा
## सन-२०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

**श्री. लहू कानडे, ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, कॅप्टन आर. सेल्वन, सर्वश्री अमित साटम, पराग शाह, प्रशांत ठाकूर, मंगेश कुडाळकर, कुणाल पाटील, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री विक्रमसिंह सावंत, नानाभाऊ पटोले, ऋतुराज पाटील, श्रीमती जयश्री जाधव, सर्वश्री बाळासाहेब थोरात, अमित झनक, जितेश अंतापूरकर, पृथ्वीराज चव्हाण, डॉ.राहूल पाटील, श्रीमती सीमा हिरे, श्री. नरेंद्र भोंडेकर, श्रीमती लताबाई सोनवणे, सर्वश्री दौलत दरोडा, बळवंत वानखडे, अनिल बाबर, श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, सर्वश्री समीर कुणावार, अतुल भातखळकर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री महेश बालदी, मिहीर कोटेचा, समाधान अवताडे, संजय जगताप, अमिन पटेल, विकास ठाकरे, प्रा. वर्षा गायकवाड, ॲड. यशोमती ठाकूर (सोनाबणे), सर्वश्री मोहनराव हंबर्डे, अस्लम शेख, सुनील केदार, शिरीष चौधरी, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री विनोद निकोले, दादाराव केचे, संजय रायमुलकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. खालीलप्रमाणे आहे:-**

"राज्यात हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियानांतर्गत केलेल्या सर्वेक्षणाअंती राज्यातील ५७७ बस स्थानकांपैकी ३९४ बसस्थानकांची अत्यंत दुरावस्था झालेली असणे, तेथे प्रवाशांना आवश्यक त्या कोणत्याही सोयी-सुविधा पुरविण्यात येत नसल्याने प्रवाशांची गैरसोय होणे, राज्य परिवहन महामंडळाने सार्वजनिक खाजगी भागिदारी अंतर्गत "बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा" (बी.ओ.टी.) या धोरणानुसार बस स्थानकांचा पुर्नविकास करण्याबाबत घेतलेल्या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी न होणे, सन २०१६ मध्ये परिवहन विभागाने राज्यातील बसस्थानकांचे बसपोर्टमध्ये रुपांतर करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात येणे, मोक्याच्या जागा असलेल्या विविध बसस्थानकांच्या जागेचे मुल्यमापन करुन आराखडे तयार करण्याचे काम खाजगी कंपनीला देण्याचे निश्चित करणे, परंतु निविदा प्रसिध्द न झाल्याने सदरचे काम अद्यापही प्रलंबित असणे, त्यातच मुंबई सेंट्रल येथील राज्य परिवहन महामंडळच्या जीर्ण झालेल्या मध्यवर्ती इमारतीच्या पुर्नविकासाचा ४६१ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असणे, दरम्यानच्या काळात तेथे छताचे प्लॅस्टर कोसळून दुर्घटना घडूनही अद्यापही त्याची दुरुस्ती करण्यात न येणे, उपरोक्त बसस्थानकांमध्ये दुरुस्ती व सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री महोदयांकडे लेखी निवेदनाव्दारे मागणी करण्यात येणे, उक्त सर्व प्रकरणांची शासनाने सखोल चौकशी करुन राज्यातील राज्य परिवहन बसस्थानकांची दुरुस्ती व अद्ययावत सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

## निवेदन
## {श्री.एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री (परिवहन)}

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियान" संपूर्ण राज्यात राबविले जात असून पहिले सर्वेक्षण माहे मे-जून २०२३ या कालावधीत पार पडले असून सदर अभियानाचा सर्वेक्षणाचा हा पहिला टप्पा असून बसस्थानकांना देण्यात येणाऱ्या १०० गुणांपैकी बसस्थानक परिसर व शौचालये-५० गुण, बसस्वच्छतेसाठी एकूण-२५ गुण, तसेच प्रवासी अभियानासाठी-२५ गुण अशी विभागणी केलेली आहे. तथापि,

बसस्थानकांच्या सर्वेक्षणात ५० च्या आतील ३०९ बसस्थानके असून ५१ ते ७० गुणसंख्येतील बसस्थानकांची संख्या २२१ इतकी आहे. तसेच ७० गुणांच्या वरिल बसस्थानकांची संख्या ३० आहे. सदर अभियान प्रभावीपणे राबविणेसाठी गुणसंख्येच्या अग्रस्थानी येण्यासाठी विभागांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. तसेच विभागीय तसेच स्थानिक पातळीवर बसस्थानकांच्या स्वच्छतेबाबत, बसेसच्या स्वच्छतेबाबतच्या घ्यावयाची दक्षता याबाबतच्या सुचना वेळोवेळी प्रसारीत करण्यात आलेल्या आहेत.

राज्यातील बसस्थानकांच्या आधुनिकीकरणाच्या मोहिमे अंतर्गत राज्यात विविध १३ ठिकाणी आधुनिक सुविधांनी युक्त बसतळ "बांधा-वापरा व हस्तांतरीतकरा" या तत्वावर उभारण्याच्या प्रस्तावास महामंडळ ठराव दि.१८.०५.२०१६ नुसार मान्यता देण्यात आली आहे, ते १३ ठिकाणे खालीलप्रमाणे आहेत. १. पनवेल (मुंबई) २. बोरीवली-नॅन्सीकॉलनी (मुंबई) ३. नाशिक-महामार्ग (नाशिक) ४. जळगाव (जळगाव) ५. धुळे (धुळे) ६. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) ७. नांदेड (नांदेड) ८. पुणे-शिवाजीनगर (पुणे) ९. कोल्हापूर (कोल्हापूर) १०. सांगली (सांगली) ११. सोलापूर (सोलापूर) १२. अकोला (अकोला) १३. नागपूर-मोरभवन (नागपूर).

१३ बसतळांपैकी छत्रपती संभाजीनगर व पनवेल या दोन प्रकल्पांना विकासकांचा प्रतिसाद प्राप्त झाला. इतर ११ ठिकाणी विकासकांचा प्रतिसाद प्राप्त झाला नाही. उर्वरीत ११ ठिकाणी बऱ्याचदा निविदा कालावधी वाढवून देखील प्रतिसाद प्राप्त झाला नाही. छत्रपती संभाजीनगर व पनवेल प्रकल्पाचे आराखडे बांधकाम परवानगीसाठी विकासकाने महानगरपालिका यांना सादर केले आहे. बांधकाम परवानगी मिळाल्यानंतर छत्रपती संभाजीनगर व पनवेल येथे प्रत्यक्ष जागेवर बांधकाम सुरु करण्यात येईल.

सन २०२२ मध्ये मुंबई सेंट्रल येथील बस डेपो समोरील छताचे प्लास्टर पडले होते. परंतु त्यामुळे कोणतीही दुर्घटना घडलेली नाही. सध्या इमारतीच्या छताच्या प्लास्टरचे काम चालू आहे. सदर इमारतीची पुर्नबांधणी बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर प्रस्तावित करण्यात आली आहे.

सन २०१५-१६ च्या आर्थिक वर्षा पासून रा.प. महामंडळास बसतळ विकासासाठी व बस खरेदी करीता शासनाकडून निधी अर्थसंकल्पीत करुन देण्यात येत आहे. त्याअंतर्गत सन २०१५-१६ ते २०२२-२३ या कालावधीत ७२ बसस्थानकांची कामे पूर्ण करण्यात आली आहे. उर्वरीत कामे प्रगतीपथावर तसेच प्रशासकीय मंजूरी, निविदा प्रक्रिया इत्यादी प्रक्रियेत आहेत. तसेच सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता रा.प. महामंडळाच्या बसस्थानकाचे आधुनिकीकरण, पुनर्बांधणी व दर्जावाढ करणेकरीता रु.४०२.६४ कोटी रक्कमेची १०१ कामे प्रस्तावित करणेत आली आहेत.

मा. मुख्यमंत्री (परिवहन) तथा अध्यक्ष म.रा.मा.प. महामंडळ यांच्या निर्देशान्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई यांच्याकडून बसस्थानकातील वाहनतळांच्या कॉंक्रीटीकरणासाठी व रंगरंगोटी करीता रु.६०० कोटी एवढा निधी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास उपलब्ध करुन देण्यास शासनाची मान्यता देण्यात आलेली आहे.

*****

गृह (परिवहन) विभाग
लक्षवेधी सूचना क्र.७६२

## महाराष्ट्र विधानसभा
## सन-२०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

**श्री.रवि राणा, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.७६२ खालीलप्रमाणे आहे. :-**

**"अमरावती विभाग नियंत्रक रा.प. महामंडळ यांचे आस्थापनेवरील विशेष मागास प्रवर्गातील वाहक, चालक व सहाय्यक या एस.टी कर्मचाऱ्यांचे लोकप्रतिनिधींनीही मागणी प्रमाणे त्यांच्या मागण्या मान्य करण्यासाठी व त्यांना ऑन लोण बेसीसवर अमरावती जिल्ह्यात कामावर सामावुन घेण्यासाठी या संबंधी मागणीसाठी एस.टी. परिवहन विभागाचे मंत्री तथा राज्याचे मुख्यमंत्री यांचे कार्यालयाकडे मुख्यमंत्री सचिवालय कक्ष विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती येथील विशेष कार्य अधिकारी यांनी दिनांक १८ ऑक्टोबर, २०२३ रोजी पत्रक्र. ३६६/२०२३ पत्र पाठविले असणे व दिनांक १८ ऑक्टोबर, २०२३ चे पत्र क्र.६७०/२०२३ विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती येथील उप आयुक्त (सां.प्र) यांनीही मुख्यमंत्री सचिवालय चे प्रधान सचिव, अप्पर मुख्य सचिव गृह परिवहन मंत्रालय, व उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक रा.प. महामंडळाच्या मुंबई यांना पत्र पाठवले असणे. विशेतः एस.टी महामंडळाच्या अमरावती विभाग नियंत्रक यांनी त्यांचे कार्यालयाचे पत्र क्र.४२०७/२०२३ दिनांक २ नोव्हेंबर, २०२३ पत्र प्रमाणे वरील मागणी मान्य करण्यासाठी अहवाल वाहतूक भवन मुंबई यांचे कार्यालयास पाठवला असुन तो प्राप्त झाला असणे, तरी सुद्धा अनेक दिवसापासून शासनाकडे सातत्याने लोकप्रतिनिधी यांचा पाठपुरावा असूनही एस.टी कर्मचाऱ्यांच्या मागणीकडे शासनाचे दुर्लक्ष होत असणे, सदर कर्मचाऱ्यांमध्ये शासन प्रति निर्माण झालेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना राज्यातील एस.टी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचा प्रलंबित मागण्या तातडीने सोडविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."**

### निवेदन

### {श्री.एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री (परिवहन)}

विभागीय आयुक्त, मागासवर्गीय कक्ष, अमरावती यांचे दि.२८ जानेवारी, २०२१ अन्वये बिंदुनामावली अद्ययावत असताना, नियमबाहय पध्दतीने नियुक्ती, बढती, बदलीची कार्यवाही केल्याचे चौकशीअंती दिसून आल्याने, महाराष्ट्र लोकसेवा आरक्षण अधिनियम २००१ मधील तरतूदींनुसार, नियमबाहय नियुक्त्या तात्काळ रद्द करण्याबाबत रा.प. महामंडळास कळविण्यात आले होते.

तसेच, मा. सहाय्यक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष, अमरावती यांच्या कार्यालयाकडून चालक, वाहक व सहायक पदाची बिंदुनामावली तपासली असता, तपासणीअंती विशेष मागास प्रवर्ग या जात प्रवर्गात मंजूरीपेक्षा कर्मचारी अतिरिक्त कार्यरत असल्याने व सदर कर्मचारी हे इतर विभागातून त्या-त्या वेळेस बदली होऊन आल्याने, सदर कर्मचा-यांना जेथे विमाप्र जात प्रवर्गाची इतर विभागात जागा रिक्त असेल त्या विभागात बदली करण्याबाबत विभाग नियंत्रक, रा.प.अमरावती विभाग यांना सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार, रा.प. अमरावती विभागातील ०२ चालक, ०६ वाहक व ०१ सहायक असे विशेष मागास प्रवर्गातील एकूण ०९ कर्मचारी अतिरिक्त ठरत असल्याने, सदर संवर्गाच्या बिंदुनामावली प्रमाणित करुन घेण्याकरीता मा. सहाय्यक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष, अमरावती यांनी उपस्थित केलेल्या त्रुटींची पुर्तता करण्याकरीता माहे ऑगस्ट २०२३ मध्ये सदर ०९ कर्मचा-यांच्या बदल्या अनुक्रमे जालना, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा विभागात करण्यात आलेल्या आहेत.

*****

(८)

गृह (परिवहन) विभाग
लक्षवेधी सूचना क्र.१४००

# महाराष्ट्र विधानसभा
## सन-२०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

**श्री.रवि राणा, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१४०० खालीलप्रमाणे आहे. :-**

**"मुख्यमंत्री सचिवालय कक्ष, जिल्हाधिकारी, अमरावती या कार्यालयाने अपर मुख्य सचिव यांचेकडे अमरावती जिल्ह्यामध्ये परिवहन विभागासंबंधी अनेक कामाचे प्रस्ताव पाठविला असून त्यामध्ये लोकाभिमुख कामाचा समावेष असणे. ज्यामध्ये अमरावती जिल्हयातील नवीन अंजनगाव सुर्जी बस डेपो, भातकुली शहर बस डेपो, धारणी व चिखलदरा बस डेपो, तिवसा बस डेपो, इत्यादी मागण्यासह अमरावती जिल्हयात नवीन बसेस उपलब्ध करुन देणे, सदर मागण्या शासनाकडे जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांनी पाठविल्या असणे, त्यानुसार अद्यापपर्यंत यासंबधी कोणताच निर्णय झालेला नसणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."**

## निवेदन
## {श्री.एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री (परिवहन)}

अमरावती विभागात एकुण ०८ आगार कार्यरत आहेत. विभागात एकुण ३६९ वाहनांद्वारे ३१४ नियते चालनात आहेत.

| आगार | चालनातील नियत संख्या | ऑक्टोबर, २०२३ अखेर आगारांचा नफा/तोटा रु. (लाखात) |
|---|---|---|
| अमरावती | ४७ | -२७७.८१ |
| बडनेरा | ३४ | -३४२.५० |
| परतवाडा | ५१ | -२९९.१७ |
| वरुड | ३८ | -१८०.०१ |
| चांदूर रेल्वे | ३९ | -३८.७७ |
| दर्यापूर | ३६ | -२५७.६१ |
| मोर्शी | ३४ | -१६५.८८ |
| चांदूर बाजार | ३५ | -१३८.९७ |
| अमरावती विभाग | ३१४ | -१७००.७२ |

जिल्हयात नवीन अंजनगाव सुर्जी बस डेपो, भातकुली शहर बस डेपो, धारणी व चिखलदरा बस डेपो, तिवसा बस डेपो बाबत मागणी केलेली आहे. रा.प. महामंडळाच्या संचालक मंडळाच्या ठराव क्र.९४४१, दिनांक २६.०२.१९८१ तसेच महामंडळ ठराव क्र.२०४, दिनांक २०.११.१९८४ व महामंडळ ठराव क्र.९९:०३:०४, दिनांक ०४/०५.०३.१९९९ नुसार नवीन आगार निर्मितीची मार्गदर्शक तत्वे निश्चित केली आहेत :-

१. आगारासाठी निवडण्यात आलेले ठिकाण केवळ तालुक्याचे ठिकाण आहे म्हणून आगाराची आस्थापना न करता तेथे वाहतूकीच्या संख्यांचे न्याय समर्थन असल्याशिवाय आगाराची निर्मिती करु नये.

२. नवीन आगार उभारताना आर्थिक दृष्टया व्यवहार्य (viable) असल्याशिवाय किंवा तो उभारणीसाठी चालनीय गरजांची (operational needs) योग्य समर्थन असल्याशिवाय त्याची निर्मिती करु नये.

३. एखाद्या विशिष्ट आगाराची नियते १०० पेक्षा अधिक झाल्याशिवाय यापुढे ३० कि.मी. अंतरावर नवीन आगार मंजूर करु नये.

१) **धारणी :** धारणी जिल्हा अमरावती येथील नवीन आगार निर्मितीबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरू असून त्याकरिता आगार बांधणी खर्च अंदाजे रु.१२,५३,२०,०००/- इतका येणार असून सदर आगारामार्फत दैनिक ४३ नियते व १२९१९ कि.मी. चालविणे अपेक्षित आहे. तसेच नव्याने कार्यान्वित होणाऱ्या आगारासाठी २८० कर्मचारीवृंद प्रस्तावित आहे.

२) **अंजनगाव सुर्जी :**अंजनगाव सुर्जी हे अमरावती जिल्हयातील तहसील ठिकाण असून ते परतवाडा-अकोट मार्गावर आहे. सद्यस्थितीत तेथे ६ फलाटाचे अद्ययावत बसस्थानक असून दैनंदिन ९२ फे-या चालविण्यात येतात. येथे २ वाहतूक नियंत्रकांची नियुक्ती आहे. या परिसरातील वाहतूक अंजनगाव येथून ३० कि.मी. अंतरावर असलेल्या अनुक्रमे परतवाडा, अकोट व दर्यापूर या आगारांमार्फत चालविण्यात येतात

तरी, रा.प. महामंडळाच्या आगार निर्मितीच्या मार्गदर्शक तत्वांनुसार अंजनगाव सुर्जी येथे आगाराची निर्मिती करता येणार नाही.

३) **भातकुली शहर बस डेपो :** भातकुली शहर हे अमरावती जिल्हयातील तहसील ठिकाण आहे. भातकुली शहर दर्यापूर आगारापासून ३० कि.मी. अंतरावर असून अमरावती पासून २४ कि.मी. अंतरावर आहे. तेथील लोकसंख्या १,१३,१०९ आहे. दर्यापूर आगारात ३८ नियते चालनात आहेत. भातकुली येथून १८ फे-यांद्वारे प्रवाशांना सेवा दिली जाते.

भातकुली येथे स्थानक निर्मितीकरिता जागा उपलब्ध नाही तसेच उपरोक्त नमूद रा.प. महामंडळाच्या आगार निर्मितीच्या मार्गदर्शक तत्वांनुसार भातकुली येथे आगाराची निर्मिती करता येणार नाही.

४) **चिखलदरा बस डेपो :** चिखलदरा हे थंड हवेचे ठिकाण असून परतवाडा आगारापासून ३० कि.मी. अंतरावर असून तेथील लोकसंख्या १,१८,८१५ आहे परतवाडा आगारात ५१ नियते कार्यरत आहेत. सद्यस्थितीत ३ फलाटांवरुन १४ फे-यांद्वारे प्रवाशी वाहतूक करण्यात येते.

उपरोक्त नमूद रा.प. महामंडळाच्या आगार निर्मितीच्या मार्गदर्शक तत्वांनुसार चिखलदरा येथे आगाराची निर्मिती करता येणार नाही.

५) **तिवसा बस डेपो :** तिवसा हे नागपूर-अमरावती मार्गावरील तहसील असून तेथील लोकसंख्या ९२२०० आहे. तेथे सद्यस्थितीत ४०० हून अधिक फे-यांद्वारे प्रवाशी वाहतूक करण्यात येते.

उपरोक्त प्रमाणे जवळची आगार तसेच तेथील नियतांची संख्या पहाता, रा.प. महामंडळाच्या आगार निर्मितीच्या मार्गदर्शक तत्वांनुसार तिवसा येथे आगाराची निर्मिती करता येणार नाही.

**रा.प. महामंडळाच्या ताफ्यात नव्याने दाखल होणा-या बसेस :** सद्यस्थितीत अमरावती विभागात ३६९ स्वमालकीच्या बसेस आहेत. यात सन जुलै २०२३ मध्ये अमरावती विभागास २० नविन साधारण व ८ नॉन-एसी स्लिपर BS VI नवीन बसेस उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. रा.प. महामंडळात नवीन बसेस उपलब्ध होतील, तेव्हा अमरावती विभागास आवश्यकतेनुसार नवीन बसेस उपलब्ध करुन देणे प्रस्तावीत आहे.

रा.प. महामंडळ ५१५० ई-बसेस भाडेतत्वावर घेत आहे. त्यात अमरावती विभागास २५५ ई-बसेस पुढील ०२ वर्ष कालावधीत उपलब्ध करुन देण्याचे नियोजित आहे.

*****

**गृह (परिवहन) विभाग**
**लक्षवेधी सूचना क्र.१९१७**

## महाराष्ट्र विधानसभा
## सन-२०२३ तृतीय (हिवाळी) अधिवेशन

**श्री.संजय जगताप,श्री.विकास ठाकरे,वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानासभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१९१७ खालीलप्रमाणे आहे.:-**

"श्रीक्षेत्र वीर (ता.पुरंदर,जि.पुणे) येथे श्रीनाथ म्हस्कोबाच्या दर्शनासाठी पुणे जिल्हयासह राज्यभरातून भाविक वर्षभर असणे, यात्रा, दसरा, दर अमावास्येला येथे लाखो भाविक गर्दी करीत असणे, पुरंदर तालुक्यातील लोकसंख्येच्या दृष्टीने वीर हे मोठे गाव असणे, परंतु येथे येणाऱ्या भाविकांसाठी सुसज्ज बस स्थानक उभारण्याबाबत एस.टी महामंडळ दुर्लक्ष करीत असणे, त्यामुळे येथे भाविक-भक्तांना उन्हात ताटकळत बसची वाट पहावी लागत असणे, विद्यार्थी, दररोज नोकरी निमित्त प्रवास करावा लागणारे नोकरदार यांची मोठी गैरसोय होत असणे, त्यामुळे येथे शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन सुसज्ज बस स्थानक उभारावे, अशी आग्रही मागणी असतानाही त्याकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण,याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

## निवेदन
### {श्री.एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री}

श्री क्षेत्र वीर ( ता.पुरंदर,जिल्हा-पुणे ) हे गांव पुण्यापासुन ५५.१ कि.मी. अंतरावर असुन पुरंदर तालुक्याचे मुख्य ठिकाण सासवड येथुन २५.०९ कि.मी. अंतरावर आहे.

वीर या गावी रा.प. महामंडळाने ४० x १० फुट या आकाराचा प्रवासी मार्ग निवारा रस्ता हद्दीत सन १९६८-६९ साली उभारलेला होता व तो मोडकळीस आल्याने काढण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्याच्या दोन्ही बाजुस प्रवासी मार्ग निवारा बांधलेला असून प्रवाशी व विद्यार्थी यांची गैरसोय होत नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर मार्ग निवाऱ्याचे हस्तांतरण महामंडळाकडे केलेले नाही.

******

गृह (परिवहन) विभाग
लक्षवेधी सूचना क्र.२२५७

# महाराष्ट्र विधानसभा
## सन-२०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

**श्री.सचिन कल्याणशेट्टी, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२२५७ खालीलप्रमाणे आहे. :-**

**"महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ सरळ सेवा भरती २०१९ सोलापूर विभाग यांच्याकडून नियुक्त पत्र मिळण्याबाबतची मागणी केलेली असणे, ४३ चालक तथावाहक या पदाकरता महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ सोलापूर विभाग सोलापूर यांच्याकडे चालकाची ४८ दिवस व वाहकाचे पंधरा दिवस सेवा पूर्व प्रशिक्षण पूर्ण केलेले असणे, त्या प्रशिक्षणानंतर त्यांना अद्याप महामंडळाने नोकरीत सामावून घेतलेले नसल्याने हे उमेदवार नाराजी व्यक्त करीत असणे, त्यामुळे महाराष्ट्रातील सर्व मुले नाराजी व्यक्त करत असून दिनांक १५ जानेवारी, २०१९ रोजी दिलेल्या जाहिरातीनुसार तसेच दिनांक १७ एप्रिल, २०२३ ला प्रशिक्षणासाठी बोलवलेल्या उमेदवारांनी दिनांक ४ जुलै, २०२३ प्रशिक्षण पूर्ण करूनही नियुक्ती न दिल्याने ते वंचित असल्याने ते नाराजी व्यक्त करीत असणे, सोलापूर विभागांमध्ये ५९१ पदाची भरती होती त्यापैकी ५४८ लोकांना नियुक्तीपत्र देण्यात आले मात्र राहिलेले ४३ चालक तथा वाहक प्रशिक्षणार्थींना अद्यापपर्यंत नियुक्ती न दिल्याने त्यांची नियुक्ती शासनाने करावी अशी त्यांची मागणी असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."**

## "निवेदन"
## {श्री.एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री (परिवहन)}

रा.प.महामंडळाच्या सरळसेवा भरती सन २०१९ अंतर्गत चालक तथा वाहक पदाकरीता दि.१५.०१.२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरात क्र.१ नुसार सोलापूर विभागासाठी सामाजिक व समांतर आरक्षणानुसार ५९१ जागा घोषित करण्यात आल्या होत्या. त्याकरीता पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले होते. सदर भरती प्रक्रियेकरीता मे.यु. एस. टेक्नॉलॉजी या बाह्य संस्थेची नेमणूक करण्यात आली होती.

रा.प. सोलापूर विभागाकरीता ३२०० उमेदवारांनी अर्ज सादर केले होते. सदर उमेदवारांची ऑफलाईन लेखी परीक्षा बाह्य संस्थेमार्फत दि.२४.०२.२०१९ रोजी घेण्यात आली होती व सदर परीक्षेचा निकाल दि.०७.०३.२०१९ रोजी ऑनलाईन जाहीर करण्यात आला होता. रा.प. सोलापूर विभागामध्ये सदर परीक्षेत २६८७ उमेदवार उत्तीर्ण व ५१३ उमेदवार अनुत्तीर्ण झाले.

उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारले असल्यामुळे त्यांची कागदपत्र पडताळणी करण्याकरीता समिती नेमून सदर उत्तीर्ण २६८७ उमेदवारांना रा.प. सोलापूर विभागाकडून दि. २९.०४.२०१९ ते दि २७.०५.२०१९ या कालावधीत कागदपत्र पडताळणीकरीता बोलविण्यात आले होते.

सदर कागदपत्र पडताळणीमध्ये १९३९ उमेदवार पात्र ठरले, त्यापैकी सामाजिक व समांतर आरक्षणानुसार घोषित जागांच्या १:३ या प्रमाणात १३२५ उमेदवारांना रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे येथील संगणकीय वाहन चालन चाचणी पथावर वाहन चालन चाचणी घेण्याकरीता दि.०९.१०.२०१९ ते दि. २४.१०.२०१९ व दि.३०.१०.२०१९ ते दि.०२.११.२०१९ या कालावधीत बोलविण्यात आले होते. सदर वाहन चालन चाचणीमध्ये उत्तीर्ण उमेदवारांच्या गुणांवर ६०% भारांक व सदर उमेदवारांचे लेखी परीक्षेतील गुणांवर ४०% भारांक देऊन तोंडी मुलाखत न घेता १००% एकत्रित भारांकानुसार उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात आली होती व त्यामधून सामाजिक व समांतर आरक्षणानुसार एकुण ५१० उमेदवारांची अंतिम निवड यादी बनविण्यात आली.

दरम्यानच्या काळात कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता शासनाने दि.२३.०३.२०२० पासून संपूर्ण राज्यात टाळेबंदी जाहिर केलेली होती. तसेच सदर कालावधीत रा.प. वाहतूक सेवेस प्रवाशांचा फारसा प्रतिसाद मिळत नसल्याने रा.प. महामंडळाचे उत्पन्न कमी झालेले होते. रा.प. महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारण्याबाबत उपाययोजना सुचविण्यासाठी गठीत केलेल्या मंत्रीमंडळ उपसमितीच्या दि २५.०८.२०२१ रोजी मा. उपमुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीमध्ये रा.प. महामंडळामध्ये कर्मचारी भरतीवर निर्बंध घालण्याबाबत निर्देश देण्यात आलेले होते. त्यानुसार महामंडळ ठराव २०२१:१०:१६ दि.२८.१०.२०२१ नुसार सरळसेवा नोकर भरतीवर स्थगिती देण्यात आलेली होती. तदनंतर कर्मचारी वर्ग खाते पत्र क्र. राप/कर्मवर्ग/ म.ब./ससेभ/४३२८, ४३२९, दि.०४.१०.२०२२ नुसार विभागीय स्तरावर चालनीय पदे भरण्याबाबतचा निर्णय झाल्याने त्यानुसार भरती प्रक्रियेची कार्यवाही सुरु करण्यात आली.

निवडयादीवरील १८ उमेदवारांना पत्र व्यवहार करुनही प्रतिसाद न दिल्याने सदर उमेदवारांची नावे निवड यादीवरुन कमी करण्यात आली आहेत. चालक तथा वाहक पदाचे अवजड वाहन चालन परवानाच्या अनुभवानुसार ४८/८० दिवसाचे सेवापूर्व प्रशिक्षण पूर्ण करुन अंतीम वाहन चालन चाचणी दि.१४.११.२०२२ ते दि.०५.०८.२०२३ या कालावधीत घेण्यात येऊन सदर चाचणी उत्तीर्ण झालेल्या ३९० उमेदवारांना माहे ऑक्टोबर, २०२३ अखेर पर्यत नेमणूका देण्यात आलेल्या आहेत.

तसेच ४३ उमेदवार हे सेवापूर्व प्रशिक्षणास हजर राहिले व त्यांचे सेवापूर्व प्रशिक्षण (४८/८० दिवस चालक व १५ दिवस वाहक) दि.१३.०७.२०२३ एकूण २० उमेदवार, दि.१७.०८.२०२३ एकूण ०१ उमेदवार, दि.०७.०९.२०२३ एकूण ०२ उमेदवार, दि.०९.१०.२०२३ एकूण १६ उमेदवार व दि.०४.११.२०२३ एकूण ०२ उमेदवारांचे सेवापूर्व प्रशिक्षण पूर्ण झालेली ४१ व मागील टप्यातील ०२ उमेदवार असे एकूण ४३ उमेदवार आहेत. ४३ उमेदवारांनी ४८/८० दिवसाचे सेवापूर्व प्रशिक्षण माहे एप्रिल, २०२३ ते ११ नोव्हेंबर, २०२३ पर्यंत टप्याटप्याने पूर्ण केले असून, सदर उमेदवारांची अंतिम वाहन चालन चाचणी, दि. २७.१२.२०२३ रोजी आयोजित करण्यात आली आहे.

रा.प. सोलापूर विभागातील उर्वरित ५९ उमेदवारांपैकी २२ उमेदवार वैद्यकीय तपासणीकरीता व ०२ सेवापूर्व प्रशिक्षणाकरीता गैरहजर आहेत. ०८ उमेदवारांचे वैद्यकीय तपासणी अहवाल जिल्हा शल्यचिकीत्सक यांचेकडे प्रलंबित आहेत. ०२ उमेदवारांचे प्रकल्पग्रस्त पडताळणी अहवाल प्राप्त न झाल्याने प्रलंबित आहेत. २० उमेदवारांचे सेवापूर्व प्रशिक्षण प्रस्तावित आहे. सद्या ०५ उमेदवारांचे चालक तथा वाहक पदाचे अवजड वाहन चालन परवानाच्या अनुभवा नुसार ४८/८० दिवसाचे सेवापूर्व प्रशिक्षण सुरु आहे.

*****

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग. लक्षवेधी सूचना क्र. ३

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे तृतीय ( हिवाळी ) अधिवेशन.

श्री. अतुल भातखळकर, ॲड. आशिष शेलार, श्री. किसन कथोरे, ॲड. पराग अळवणी, श्री. पराग शाह, कॅप्टन आर. सेल्वन, श्री. मिहीर कोटेचा, श्री. समाधान अवताडे, श्रीमती मेधना साकोरे बोर्डीकर, श्री. अमित देशमुख, श्री. बाळासाहेब थोरात, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. अस्लम शेख, श्री. झीशान सिद्दिकी, श्री. सुनिल केदार, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. नानाभाऊ पटोले, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. राजेश एकडे, श्री. संजय जगताप, श्री. शिरीष चौधरी, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. अबू आजमी, श्री. अमीन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, श्री. संग्राम थोपटे, श्री. संजय केळकर, श्री. विनोद निकोले, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. योगेश सागर, श्री. रईस शेख, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, श्रीमती लताबाई सोनवणे, श्रीमती मंजुळा गावीत, श्रीमती श्वेता महाले, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. रोहित पवार, श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे.

"मुंबईतील वायू प्रदूषण रोखण्याकरिता केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने शासनास शिफारशी केल्या असल्याचे माहे ऑक्टोबर २०२३ मध्ये निदर्शनास येणे, तसेच, शासनास कृती आराखडा सादर करण्याचे सांगितले असणे, त्यामध्ये, मुंबईतील मोठ्या प्रमाणात सुरू झालेली इमारतीची बांधकामे, मेट्रो, रस्त्याचे कॉंक्रिटीकरण, सागरी किनारा मार्गाची कामे, वाहनांची वाढणारी संख्या इत्यादींमुळे तसेच हवेच्या स्थितीमध्ये होणाऱ्या बदलांमुळे प्रदूषण वाढत असणे, तसेच, वाढत्या हवा प्रदूषणामुळे त्याचा आरोग्यावर मोठा परिणाम होत असणे, त्यामुळे बांधकामे आणि विकासकामांवर देखरेख ठेवणे व शहरातील हवेची ढासळती गुणवत्ता, वाढते प्रदूषण याचा अभ्यास करून उपाययोजना करण्याची गरज, तसेच, धुळीला अटकाव करून प्रदूषण रोखण्यासाठी संपूर्ण मुंबई शहरात हवा शुद्धीकरण यंत्र (एअर प्यूरीफायर) बसवण्याची गरज असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

मा. मुख्यमंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल ) यांनी करावयाचे निवेदन.

मुंबईतील वायू प्रदूषण रोखण्याकरीता पर्यावरण, वन आणि हवा बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दि. २६.१०.२०२३ च्या पत्रान्वये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास मुंबई शहरातील हवा प्रदूषण कमी करण्याकरीता करण्यात आलेल्या उपाययोजना व कारवाईचा तपशील सादर करण्याचे निर्देश दिलेले होते सदरील निर्देशांच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दि. ३०.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये करण्यात आलेल्या उपाययोजना व कारवाईच्या तपशीलाबाबतचा प्राथमिक अहवाल पर्यावरण, वन आणि हवा बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांना सादर केला. मुंबई महानगरपालिकेकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दि. २४.११.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अंतिम अहवाल पर्यावरण वन आणि हवा बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांना सादर केलेला आहे.

मुंबई शहरातील हवा प्रदूषण नियंत्रणाकरीता कृती आराखड्यात खालील बाबीचा समावेश आहे.

१. मुंबई शहरातील वाहनांमुळे होणारे हवा प्रदूषण नियंत्रणात आणणे.
२. शहरातील रस्त्यावरील वर्दळीमुळे निर्माण होणारे धुलीकण नियंत्रणात आणणे.
३. हवेतील धुलीकणाचे प्रमाण कमी करण्यासाठी, पालापाचोळा/घरगुती घनकचरा जाळल्यामुळे होणारे प्रदूषण कमी करणे.
४. उद्योगांमुळे होणारे हवा प्रदूषण रोखणे.
५. बांधकामाच्या घडामोडीमुळे निर्माण होणारे हवा प्रदूषण नियंत्रण करणे.
६. मुंबई शहरातील हवेतील धुलीकणाचे प्रमाण कमी करण्यासाठीचा कृती आराखडा तयार करणे.

सध्या मुंबईच्या किमान तापमानात वाढ, मुंबई शहरातील दरवर्षी वाहनाच्या संख्येत होणारी वाढ सागरी किनारा मार्गाची सुरू असलेली कामे विविध ठिकाणी सुरू असलेली बांधकामे, खोदकामे व पाडकामे तसेच कारखान्यांमधून निघणारा धूर यामुळे शहरातील प्रदूषणात वाढ झाल्याचे दिसून येते. जमिनीलगतच्या थंड हवेमुळे इतर ऋतुपेक्षा हिवाळ्यात प्रदूषणाचे प्रमाण अधिक प्रमाणात असते. सदर परिस्थिती ही दरवर्षी नोव्हेंबर ते फेब्रुवारी या महिन्यात उद्भवत असते. मुंबईतील नैसर्गिक हवामानाच्या स्थितीनुसार प्रदूषणाचे प्रमाण कमी-जास्त होत असल्याचे आढळून येते.

मुंबईतील हवेचे प्रदूषण कमी करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे पुढीलप्रमाणे कार्यवाही व उपाययोजना करण्यात आली आहे :-

१. ९६१२.५४ कि.मी. लांबीचे रस्ते पाण्याने धूण्यात आले आहेत.
२. प्रदूषण प्रतिबंधक उपाययोजना करण्याकरिता बांधकाम प्रकल्पांना देण्यात आलेल्या नोटीस संख्या - २९७४.
३. बांधकाम प्रकल्पांना देण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीस संख्या - ५८०.
४. बांधकाम प्रकल्पांना कामे बंद करण्याकरिता दिलेल्या नोटीस संख्या - ७८०.
५. कामे बंद नोटीस देऊन सुध्दा कामे सुरू ठेवणाऱ्या बांधकाम प्रकल्पांविरोधात आयुक्त, महानगरपालिका यांनी संबंधित विभागातील पोलीस ठाणे येथे प्राथमिक माहिती अहवाल (FIR) दाखल करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत मुंबईतील हवेचे प्रदूषण कमी करण्याकरिता विविध तंत्रज्ञानावर आधारीत हवा शुध्दीकरण यंत्रणा व्यावसायिक सामाजिक जबाबदारी (CSR) निधीचा वापर करून प्रायोगिक तत्वावर स्थापन करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार मुंबई शहरात धुळीचा अटकाव करून हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी धूळ शमन प्रणाली (Outdoor Dust Mitigation) १० ठिकाणी तसेच धूळ नियंत्रण प्रणाली (Dust Monitoring System) ०५ ठिकाणी स्थापित करण्याचे काम सुरू आहे तसेच ५० बेस्ट बसेस वर वाहन आरोहित हवा शुध्दीकरण यंत्र बसवण्यात आलेले आहेत. सायन सर्कल या ठिकाणी २ आभासी चिमणी बसवण्यात आलेल्या असून इतर हवा शुध्दीकरण यंत्रणा बसविण्याचे कामे प्रगती पथावर आहेत. सदर प्रक्रीयेत बृहन्मुंबई महानगरपालिका समन्वयाची भूमिका पार पाडत आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाशी समन्वय साधून पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाकडून वायू प्रदूषणासंबंधी वेळोवेळी करण्यात आलेल्या सुचनांचे व मार्गदर्शक तत्वांचे पालन करून वायू प्रदूषण रोखणेकरिता आवश्यक उपाययोजना करीत आहे.

हवा गुणवत्ता आणि हवामान अंदाज आणि संशोधन प्रणाली, भूविज्ञान मंत्रालय, भारत सरकार, भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्थेने (IITM SAFAFI) मुंबई शहरात ९ ठिकाणी सतत हवा तपासणी केंद्र (CAAQMS) स्थापित केलेली आहेत सदरील ठिकाणे ही केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार नाहीत. तसेच सदरील स्थानके ही वाहतूक जंक्शन/खेळाची मैदाने/वर्दळीच्या ठिकाणी बसविण्यात आल्यामुळे सर्वसाधारणपणे हवा प्रदूषकांची पातळी योग्य प्रमाणात दाखवत नाहीत. त्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळास तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेस वेळोवेळी पत्रव्यवहार करून सदर स्टेशन्स मध्ये सुधारणा करण्यात यावी, असे कळवले आहे.

मुंबई शहरातील हवेचा दर्जा माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर २०२३ मध्ये हवा गुणवता निर्देशांकनुसार काही प्रमाणात धोकादायक पातळीपर्यंत खालावल्यामुळे मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी Suo Motu Public Interest Litigation No. ३/२०२३ मध्ये हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी विविध उपाययोजना करण्याबाबत संबंधित विभागांना दिनांक ३१.१०.२०२३, ०६.११.२०२३ व १०.११.२०२३ रोजी निर्देश दिलेले आहेत. तसेच मा. न्यायालयाने दि. १०.११.२०२३ रोजीच्या निर्देशानुसार गठीत केलेल्या त्रिसदस्यीय समितीमार्फत संबंधित विभागांचा अहवाल वेळोवेळी मा. न्यायालयास सादर केला जातो.

माहे ऑक्टोबर/ नोव्हेंबर २०२३ मध्ये वाढलेल्या प्रदूषणाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे मुंबई शहरातील असलेल्या उद्योगाचे व रेडी मिक्स कॉंक्रीट प्लांटचे सर्वेक्षण करण्यात आले असुन पाहणी दरम्यान आढळलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने ६६ उद्योगांना प्रस्तावित आदेश दिले आहेत तसेच २६ उद्योगांना उत्पादन बंदीचे आदेश देण्यात आले आहेत.

मुंबई महानगरपालिकेमार्फत प्राप्त अहवालानुसार के. ई. एम. रुग्णालयातील, पर्यावरण प्रदूषण संशोधन केंद्र व श्वसनरोग चिकित्सा विभागातर्फे मुंबई शहरातील नागरीकांच्या श्वसनारोग्याबद्दलच्या लक्षणांचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. दि. २१ जानेवारी २०२३ पासून ते अद्याप पर्यंतचा अहवाल पाहता मुंबई महानगरपालिका दवाखान्यांतील दम्याच्या रुग्णांच्या संख्येत कोणतीही लक्षणीय वाढ झाल्याचे आढळून आलेली नाही.

---

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग. लक्षवेधी सूचना क्र. ७६१

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे तृतिय (हिवाळी) अधिवेशन.

श्री. सुभाष धोटे, श्री. सुनिल केदार, श्री. विकास ठाकरे, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. संजय जगताप, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. अस्लम शेख, श्री. शिरीष चौधरी, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

" चंद्रपूर जिल्ह्यातील औद्योगिकरणामुळे जल, वायू आणि ध्वनी प्रदूषणाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने जीवघेण्या आजारांमुळे मानवाला मोठी किंमत चुकवावी लागत असणे, विविध खनिज संपतीचे विक्रमी उत्पादन होत असतांना नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या समांतर यंत्रणा बिनकामी ठरल्या असणे, दिवसेंदिवस होणारा नैसर्गिक संपत्तीचा ऱ्हास व कृत्रिम प्रदूषणाने दरवर्षी विविध आजारांमुळे हजारों नागरिकांचा बळी जात असणे, जिल्ह्यातील उद्योगामुळे प्रदुषित धुळीकणांची संख्या वाढली असल्याने वातावरणात विषारी घटक पसरल्याने आरोग्यासाठी सर्वाधिक धोका निर्माण झाला असणे, पर्यावरणाच्या संवर्धनासाठी विविध प्रकारचे मूलभूत कायदे आहेत, त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसल्याने जिल्ह्यात जल, ध्वनी व प्रदूषणाची समस्या सर्वानाच अस्वस्थ करणारी असल्याने या प्रकरणी तक्रार करूनही संबंधित यंत्रणा / शासनामार्फत अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, याकडे कंपनी प्रशासनाचे / शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे सर्वसामान्य जनतेत शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

मा. मुख्यमंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग) यांचे निवेदन

चंद्रपूर जिल्ह्यात मोठे व मध्यम उद्योगांपैकी कोळशावर आधारीत ०५ व टाकाऊ कृषीमाल आणि पालापाचोळा या इंधनावर आधारीत ०२ असे एकूण ०७ औष्णिक विज निर्मीती केंद्रे, ०५ सिमेंट उद्योग, ०८ स्पॉन्ज आर्यन प्लांट, ०१ पेपर उद्योग, ०२ रासायनिक उद्योग कार्यरत आहेत. तसेच, जिल्ह्यात वेस्टर्न कोलफिल्ड लिमीटेड च्या एकूण ३१ कोळसा खाणी (११ भूमिगत व २० खुल्या पध्दतीच्या) आहेत व ०३ खाजगी कोळसा खाणी (०१ भूमिगत व ०२ खुल्या पध्दतीच्या) कार्यरत आहेत.

कोळसा खाणींनी हवा प्रदूषण नियंत्रणासाठी पाण्याचा शिंपडा करण्याची व्यवस्था केलेली आहे. तसेच जलप्रदूषण नियंत्रणासाठी सेडिमेंटेशन टँकची उभारणी केलेली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडुन सर्व कोळसा खाणींना अटी व शर्तीयुक्त संमतीपत्र प्रदान करण्यात आलेले आहेत.

चंद्रपूर जिल्ह्यात एकूण ०७ औष्णिक विज निर्मीती उद्योग व एकुण ०८ पोलाद उद्योग कार्यरत आहेत. सदर उद्योगांमार्फत निर्माण होणाऱ्या औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करणेसाठी प्राथमिक, द्वितीय स्वरुपाची सयंत्रणा बसविण्यात आली असून प्रक्रियाकृत सांडपाण्याचा जास्तीत जास्त पुर्नवापर करण्यात येतो. त्याचप्रमाणे सदर उद्योगांनी हवा प्रदूषण नियंत्रणाकरिता इलेक्ट्रोस्टॅटीक प्रेसिपिटेटर्स, बॅग फिल्टर्स, डस्ट कलेक्टर्स व योग्य उंचीचे धुरांडे बसविलेली आहेत. सदर उद्योगांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे अटी व शर्तीसह संमतीपत्र प्रदान करण्यात आलेले आहेत.

चंद्रपूर जिल्ह्यात एकूण ०५ सिमेंट उद्योग कार्यरत आहेत. सदर उद्योगांनी हवा प्रदूषण नियंत्रणाकरिता ईलेक्ट्रोस्टॅटीक प्रेसिपिटेटर, बॅग फिल्टर्स, कच्च्या मालाच्या वाहतुकीकरिता बंदिस्त कन्व्हेअर पट्टे, पाणी फवारणी संयंत्रणा, अंतर्गत पक्के रस्ते इत्यादी उपाययोजना केलेल्या आहेत. उद्योगांमधून निघणाऱ्या औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरिता सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा (ईटीपी) उभारली आहे. तसेच निर्माण होणाऱ्या घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरिता घरगुती सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा (एसटीपी) उभारली आहे. प्रक्रियाकृत सांडपाण्याचा पुनर्वापर हा कुलिंग टॉवर मध्ये, राख भिजविणे, धुळीकणांचे नियंत्रण करणे व हरीतपट्टा निर्माण करण्याकरीता करण्यात येतो. चंद्रपूर जिल्ह्यातील ०७ औष्णिक विज निर्मीती उद्योग व ०५ सिमेंट उद्योगांच्या घुरांड्यातुन उतेजित होणाऱ्या हवेची गुणवत्ता मोजमापासाठी (Online monitoring system) व उद्योग परिसरातील वातावरणातील हवेची गुणवत्ता मोजण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शनानुसार सतत हवा गुणवत्ता तपासणी सयंत्रणा (CAAQMS) बसविण्यात आल्या आहेत.

चंद्रपूर जिल्ह्यात मे. बिल्ट ग्राफिक्स प्रॉडक्टस् लि. हा पेपर उद्योग कार्यरत असून सदर उद्योगाला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने संमतीपत्र प्रदान केले असून त्याची वैधता दि. ३१/०८/२०२३ होती त्यानुसार उद्योगाने नुतनीकरणाचा अर्ज सादर केलेला आहे. या उद्योगाने औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करणेकामी अद्यावत सांडपाणी प्रक्रिया सयंत्र बसविलेले असून प्रक्रियाकृत सांडपाण्याचा काही प्रमाणात वापर बांबु धुणे, फवारणी व बागकामाकरिता करण्यात येतो व उर्वरीत प्रक्रियाकृत सांडपाणी नाल्याद्वारे वर्धा नदीमध्ये सोडण्यात येते. तसेच सदर उद्योगामध्ये वातावरणीय हवेची गुणवत्ता तपासली असता विविध मानके विहीत मर्यादेत आढळतात. त्याचप्रमाणे, चिमणीतून उर्त्सजीत होणाऱ्या धुराचे विविध मानके हे विहीत मर्यादेत आढळतात. त्याचप्रमाणे प्रक्रीयाकृत औद्योगिक सांडपाण्याचा नमुन्याचा पृथ:करण अहवाल विहीत मर्यादेत आढळते.

चंद्रपूर जिल्ह्यात एकुण ४ कोल वॉशरीज उद्योग कार्यरत असून सदर उद्योजकांनी हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा जसे स्क्रबर, बॅग फिल्टर बसविले असून बहूतांश उद्योजकांनी सदर यंत्रणा अद्यावत केलेली आहे. सदर उद्योगांनी औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करणेकामी सांडपाणी प्रक्रिया सयंत्र बसविलेले असून प्रक्रियाकृत सांडपाण्याचा वापर उद्योगाच्या परिसरात पाणी शिंपडणे व हरितपट्टा विकसीत करणे याकरीता होतो. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सदर उद्योगांची वेळोवेळी पाहणी करून आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने उद्योगांवर कार्यवाही करण्यात येते.

चंद्रपूर जिल्ह्यात २३ कोळसा डेपो कार्यरत असुन येथे कोळसा साठवणे व त्याची विक्री इतकीच प्रक्रिया होते. कोळसा डेपोंनी मंडळाने प्रकाशित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे कोणतेही अनुपालन केलेले नसल्याचे निदर्शनास आले होते त्यानुसार पडोली ते घुग्गुस रस्त्यालगत स्थित सर्व २३ कोळसा डेपोनां बंद करण्याबाबतचे निर्देश महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे देण्यात आले होते. याबाबत जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्यासमवेत झालेल्या बैठकीमध्ये सर्व कोळसा डेपो जोपर्यंत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पूर्णपणे अनुपालन करत नाहीत तोपर्यंत कोळसा डेपो सुरू करण्यास परवानगी न देण्याबाबत सुचना देणयात आल्या आहेत.

चंद्रपूर जिल्ह्यामधील विविध उद्योगांची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पाहणी करण्यात येते व पाहणीमध्ये निदर्शनास आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने मागील एक वर्षात ३७ उद्योगांना कारणे दाखवा नोटीस व ०४ उद्योगांना प्रस्तावित निर्देश देण्यात आले असून जिल्ह्यात वरील विविध

उद्योगांची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने एकुण रू. ९७.०० लक्षची बँक हमी जप्त करण्यात आलेली आहे.

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमा अंतर्गत चंद्रपूर शहरास हवा प्रदूषण नियंत्रणाकरीता विविध कामाची अंमलबजावणी प्रगतीपथावर असून याकरीता चंद्रपूर शहरास रू. ४.२० कोटीचा निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाकडून प्राप्त माहितीनुसार चंद्रपुर जिल्हयामध्ये प्रदुषणामुळे होणारे आजार नियंत्रित करण्यासाठी वातावरणातील बदल व मानवी आरोग्य हा राष्ट्रीय कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाअंतर्गत जिल्हयासाठी कृती आराखडा तयार करण्यात आला असून जिल्ह्यात आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत गृहभेटीमध्ये साथरोगाबाबत सर्व्हेक्षण करणे, पिण्याच्या पाण्याच्या पाईप लाईनवर कुठेही लिकेज राहणार नाही याबाबत संबंधित यंत्रणेला त्वरीत कळवून ते दुरुस्त करुन घेणे, पिण्याच्या पाण्याचे नियमित क्लोरीनेशन करण्याबाबत संबंधित यंत्रणेला वेळोवेळी कळविणे, पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताचा परिसर स्वच्छ ठेवणे, वेळोवेळी गटसभा, ग्रामसभामध्ये नागरिकांना शुध्द पाण्याचे महत्व समजावून सांगणे इत्यादी उपाययोजना करण्यात येतात तसेच साथरोगाबाबत नियमित होणाऱ्या सभांमध्ये जलजन्य आजाराची माहिती व योग्य उपाययोजनेचा आढावा घेवून आवश्यक तेथे मार्गदर्शन करण्यात येते. सदर सर्वेक्षणादरम्यान आढळून आलेल्या रुग्णांबर आवश्यकतेप्रमाणे नजिकच्या प्राथमिक आरोग्य केंद्र/ ग्रामिण रुग्णालय / उपजिल्हा रुग्णालय तसेच शासकीय महाविद्यालय येथे औषधोपचार करण्यात येतात.

**************************

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन.

श्री. योगेश सागर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"मुंबईच्या हवेत खालावत जाणाऱ्या दर्जाबाबत आणि त्यांच्याशी संबंधित आरोग्य विषयक समस्या बाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यास मुंबई पालिकेसह संबंधित यंत्रणातर्फे कोणत्याच उपाययोजना केल्या जात नसल्याचे ताशेरे मा. उच्च न्यायालयाने ओढले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, मुंबईतील एकही भाग प्रदूषणमुक्त नसल्याची टिपणी करून शहरातील हवेची गुणवत्ता दिवसेंदिवस खालावत चालल्या बाबत उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने चिंता व्यक्त केली असणे, याप्रकरणी स्वतःहून जनहित याचिका दाखल करून घेत असल्याचे स्पष्ट करीत न्यायालयाने या प्रकरणी राज्याचे महाधिवक्ता यांना सहकार्यासाठी पाचारण केलेले असणे, मुंबईत साथीच्या आजारापासून मुक्ती मिळवण्यासाठी पालिका प्रशासन त्यासाठी कोठ्यावधी रुपयाचा खर्च करणे, अलीकडेच प्रदूषण मुक्तीसाठी पालिकेने मार्गदर्शक सूचना जारी केल्या परंतु पालिकेकडे पर्याप्त मनुष्यबळच नसल्याने पालिकेकडून या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी कशी होणार हा प्रश्न निर्माण झालेला असणे, तसेच पालिका व राज्य सरकारच्या रुग्णालयामध्ये चतुर्थ श्रेणीचे सुमारे एक लाख पंचेचाळीस हजार कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असणे, पालिकेच्या कीटकनाशक विभागात अनेकपदे रिक्त असणे, स्वाइन फ्लू, डेंगू, मलेरिया सारख्या साथीच्या आजाराचा प्रादुर्भाव वाढत असतानाही मुंबईतील प्रदूषणाचे स्तर वाढत जाणे, मनुष्यबळाचे कमतरतेमुळे प्रदूषण व साथीच्या आजारावर प्रतिबंधाकात्मक उपाययोजना राबवितांना पालिकेला अपयश, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

मा. मुख्यमंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग ) यांचे निवेदन

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने सन २०११ ते २०१५ या कालावधीमध्ये भारतातील २२ राज्यातील १३१ शहरांमधील हवेची गुणवत्ता प्रदूषित झाली असल्याबाबत प्रसिध्द केले होते. सदरील शहरांमधील हवेतील धुलीकण (पीएम १०) या प्रदूषित घटकाबाबतची मात्रा प्रसिध्द केलेली होती. यामध्ये महाराष्ट्र राज्यातील १९ मुंबई, नवी मुंबई, उल्हासनगर, बदलापूर, पूणे, नागपूर, अकोला, अमरावती, औरंगाबाद, चंद्रपूर, जळगाव, जालना, सांगली, कोल्हापूर, लातूर, नाशिक, सोलापूर, ठाणे आणि वसई-विरार या शहरांमधील वातावरणातील हवेतील गुणवत्ता प्रदूषित झाल्याचे प्रसिध्द करण्यात आले होते.

अध्यक्ष, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी १ जुलै २०१६ अन्वये अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, यांना प्रदूषित शहरांचे प्रदूषण रोखण्यासाठी व हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत हवा (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा १९८१ कलम क्रमांक १८(१) (ब) अन्वये निर्देश दिले होते.

त्यानुसार मुंबई शहरातील हवा प्रदूषण नियंत्रणाकरीता कृती आराखडा तयार करण्यात आलेला होता. सदर आराखड्यात पुढील बाबीचा समावेश आहे.

मुंबई शहरातील वाहनांमुळे होणारे हवा प्रदूषण नियंत्रणात आणणे, शहरातील रस्त्यावरील वर्दळीमुळे निर्माण होणारे धुलीकण नियंत्रणात आणणे, हवेतील धुलीकणाचे प्रमाण कमी करण्यासाठी, पालापाचोळा/घरगुती घनकचरा जाळल्यामुळे होणारे प्रदूषण कमी करणे, उद्योगांमुळे होणारे हवा प्रदूषण

रोखणे, बांधकामाच्या घडामोडीमुळे निर्माण होणारे हवा प्रदूषण नियंत्रण करणे, मुंबई शहरातील हवेतील धुलीकणाचे प्रमाण कमी करण्यासाठीचा कृती आराखडा तयार करणे.

सदरील कृती आराखड्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे सुरू असून वेळोवेळी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून आढावा घेण्यात येतो.

सध्या मुंबईच्या किमान तापमानात वाढ, वाहनाच्या संख्येत वाढ, सागरी किनारा मार्गाची व इतर पात्रालगत सुविधांची सुरू असलेली कामे तसेच मुंबई शहरातील दरवर्षी वाहनांच्या संख्येत होणारी वाढ यामुळे शहरातील प्रदूषणात वाढ झाल्याचे दिसून येते. त्याबरोबरच वाऱ्याचा वेग मंदावणे, तसेच जमिनीलगतच्या थंड हवेमुळे इतर ऋतुपेक्षा हिवाळयात प्रदूषणाचे प्रमाण अधिक प्रमाणात असते सदर परिस्थिती ही दरवर्षी नोव्हेंबर ते फेब्रुवारी या महिन्यात उद्भवत असते. सध्या मुंबईमध्ये विविध ठिकाणी बांधकामे, खोदकामे व पाडकामे सुरू आहेत. परिणामी बांधकामातील माती, सिमेंट काँक्रीटचे कण हवेत मिसळतात. तसेच कारखाने, वाहनातून निघणारा धूर यामुळे प्रदूषणाचे प्रमाण वाढत असते. मुंबईतील नैसर्गिक हवामानाच्या स्थितीनुसार प्रदूषणाचे प्रमाण कमी-जास्त होत असल्याचे आढळून येते.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून मुंबई शहरातील हवेची गुणवत्ता तपासली जाते. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे देण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांशी पालन करीत हवा तपासणी केंद्रे मुंबईत १४ ठिकाणी उभारलेली आहेत. सदर यंत्रणेमधून प्राप्त होणारी आकडेवारी मंडळाच्या संकेतस्थाळावर प्रकाशित केली जाते. पृथ्थ:करण अहवालानुसार हवा गुणवत्ता निर्देशांक (AQI) हा सर्वसाधारणपणे समाधानकारक ते मध्यम या गुणवत्तेत येतो.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने सर्व जिल्हाधिकारी/आयुक्त / पोलीस आयुक्त / SP/ परिवहन विभाग यांना पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ कलम ५ अंतर्गत राज्यातील हवाप्रदूषण नियंत्रणाकरिता निर्देश बजावलेले आहेत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत मुंबईतील हवेचे प्रदूषण कमी करण्याकरिता विविध तंत्रज्ञानावर आधारीत हवा शुध्दीकरण यंत्रणा व्यावसायीक सामाजिक जबाबदारी (CSR) निधीचा वापर करून प्रायोगिक तत्वावर स्थापन करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार शहरात विविध ठिकाणी धुळ शमन संयंत्रे स्थापित करण्यात येत असून तात्काळ उपाययोजनांची अंमलबजावणी सुरू आहे. त्यानुसार ५० बेस्ट बसेस वर वाहन आरोहित हवा शुध्दीकरण यंत्र बसवण्यात आलेले आहेत. तसेच सायन सर्कल या ठिकाणी २ आभासी चिमणी बसवण्यात आलेल्या आहेत व फिल्टररहित हवा शुध्दीकरण तंत्रज्ञान यंत्र ६ उद्यानांमध्ये बसविणायचे कामे प्रगती पथावर आहेत. सदर प्रक्रीयेत बृहन्मुंबई महानगरपालिका समन्वयाची भूमिका पार पाडत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाशी समन्वय साधून महाराष्ट्र शासन, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाकडून वायू प्रदूषणासंबंधी वेळोवेळी करण्यात आलेल्या सुचनांचे व मार्गदर्शक तत्वांचे पालन करून वायू प्रदूषण रोखणेकरिता आवश्यक उपाययोजना करीत आहे.

हवा गुणवत्ता आणि हवामान अंदाज आणि संशोधन प्रणाली, भूविज्ञान मंत्रालय, सरकार भारत भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्थाने (IITM SAFAR) मुंबई शहरात ९ ठिकाणी सतत हवा तपासणी केंद्रांच्या (CAAQMS) स्थापित केलेली आहेत.

मुंबई शहरातील हवेचा दर्जा माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर २०२३ मध्ये हवा गुणवत्ता निर्देशांकनुसार काही प्रमाणात धोकादायक पातळीपर्यंत खालावल्यामुळे मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी Suo Motu Public Interest Litigation No. ३/२०२३ मध्ये हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी विविध उपाययोजना करण्याबाबत संबंधित विभागांना दिनांक ३१/१०/२०२३, ०६/११/२०२३ व १०/११/२०२३ रोजी निर्देश दिलेले आहेत. तसेच मा. न्यायालयाने दि. १०/११/२०२३ रोजीच्या निर्देशानुसार गठीत केलेल्या त्रिसदस्यीय समितीमार्फत संबंधित विभागांचा अहवाल मा. न्यायालयास वेळोवेळी सादर केला जातो. माहे ऑक्टोबर / नोव्हेंबर २०२३ मध्ये वाढलेल्या प्रदूषणाच्या अनुशंगाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळातर्फे मुंबई, ठाणे व नवी मुंबई शहरात

असलेल्या उद्योगाचे व रेडीमिक्स कॉंक्रीट प्लांटचे सर्वेक्षण करण्यात आले असून पाहणी दरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुशंगाने कार्यवाही करण्यात आलेली आहे.

वायू प्रदुषण नियंत्रणाकरिता बांधकाम कंत्राटदार, बांधकाम व्यावसायिक, विकासक, महापालिका अधिकारी व विभाग स्तरावरील अधिकारी यांनी करावयाच्या उपाययोजनासंबंधी सर्वकष मार्गदर्शक तत्वे दिनांक २५.१०.२०२३ रोजी सर्व संबंधितांना निर्गमित करण्यात आलेली आहेत. सदर मार्गदर्शक तत्वांमध्ये बांधकाम प्रकल्पाच्या सभोवताली धूळप्रदूषण रोखण्याकरिता पत्र्यांचे कुंपण उभारणे, हिरव्या कपड्यांचे आच्छादन करणे, पाणी-फवारणी करणे, राडारोडयाची शास्त्रशुध्द साठवण व ने-आण करणे, बांधकामाच्या ठिकाणी वायू-प्रदूषण मोजमाप करणारी यंत्रणा बसविणे, धूरशोषक यंत्रे बसविणे व इतर महत्वाच्या उपाययोजना सुचविण्यात आलेल्या आहेत.

के.ई.एम रुग्णालयातील पर्यावरण प्रदुषण संशोधन केंद्र व श्वसनरोग चिकित्सा विभागात रोग निदान व अद्ययावत उपचार सुविधा देण्यात येतात. तसेच विविध लोकवस्त्यांत जाऊन श्वसनरोगांच्या तक्रारी संदर्भात सर्वेक्षण करण्यात येते. लोक जागृती करीता निबंध स्पर्धा, रेडीओ, टीव्ही वर माहिती, घरातील वायूविजन व दम्यावर नेमके औषधोपचार यांकरिता अस्थमा एज्युकेशन हे पर्यावरण प्रदुषण संशोधन केद्रांतर्फे करण्यात येते. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दवाखान्यांमध्ये दमा रुग्णांची संख्या सन २०२३ माहे सप्टेंबर - ६९५, ऑक्टोबर - ७७९ व नोव्हेंबर - ७८० व खोकल्याच्या रुग्णांची संख्या माहे सप्टेंबर -२२९०, ऑक्टोबर-१८३३ व नोव्हेंबर - २२०७ इतकी आढळून आलेली आहे. यावरून श्वसन विकारांच्या आजारात लक्षणिय वाढ झाल्याचे आढळून येत नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत दवाखाने, प्रसुतिगृहे व विशेष रुग्णालये यांच्या माहे सप्टेंबर २०२३ मधील चतुर्थश्रेणी कामगारांची एकूण २८२१ पदांपैकी १८०९ पदे भरलेली असून १०१२ पदे रिक्त आहेत. चतुर्थ श्रेणीतील कामगारांची पदे प्रमुख कामगार अधिकारी यांच्यामार्फत भरली जातात. नागरिकांना सेवा देण्याकरीता नियमित रिक्त पदे भरेपर्यंत रोजंदारी व कंत्राटी पध्दतीने (एमपीएल) पदे भरली जातात. किटकनाशक विभागामध्ये चतुर्थश्रेणी कामगारांची एकूण १७६९ पदांपैकी १११९ पदे भरलेली असून ६५० पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदे खाजगी संस्थांमार्फत (एनजीओ) कंत्राटी पध्दतीने भरली जातात.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख रुग्णालयांमध्ये चतुर्थश्रेणी कामगारांची एकूण ५१६९ पदांपैकी ३०८८ पदे भरलेली असून २०८१ पदे रिक्त आहेत. प्रमुख वैद्यकीय अधिक्षक व खाते प्रमुख (माध्यमिक आरोग्य सेवा) यांच्या आस्थापनेवर चतुर्थश्रेणी कामगारांची एकूण २९२४ पदांपैकी १७२५ पदे भरलेली असून ११९९ पदे रिक्त आहेत. पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महानगरपालिका, महानगर विकास प्राधिकरण व इतर संबंधित विभाग यांच्याशी वेळोवेळी समन्वय साधून करण्यात आलेल्या विविध उपाययोजनांचा आढावा घेण्यात येतो.

*****************************************************

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग. लक्षवेधी सूचना क्र. १६८०

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन.

श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यात विशेषत: चंद्रपूर, नागपूर, जळगांव जिल्ह्यात माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये प्रदुषणात मोठ्या प्रमाणात झालेली वाढ, आधीच प्रदुषीत असलेल्या चंद्रपूर जिल्ह्यात नोव्हेंबर महिन्यात ३० पैकी ३० दिवस प्रदुषित असणे, परिणामी नागरीकांना अस्थमा, निमोनिआ, सर्दी, खोकला आदी श्वसनाच्या आजाराला सामोरे जावे लागणे, अशीच परिस्थिती जळगाव जिल्ह्यात असणे, जळगांव जिल्ह्यातही नोव्हेंबर महिन्यात ३० दिवस प्रदुषित असल्याचे उघडकीस येणे, तसेच राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूर शहरातील सिव्हिल लाइन्स, महाल, अंबाझरी व रामनगर या चारही केंद्राची केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या आकडेवारीनुसार माहे नोव्हेंबर महिन्यातील संपूर्ण ३० दिवस प्रदूषित असल्याचे निदर्शनास येणे, ब्युरो, शहरीकरण व औद्योगिकरणाने चंद्रपूर जिल्ह्यात जल, वायु, ध्वनी व मृद प्रदुषणाने नागरीक त्रस्त झालेले असणे, विविध श्वसनाचे आजार होऊन त्यांचा जीव धोक्यात येणे, शासनाने उक्त प्रकरणी तातडीने चौकशी करुन चंद्रपूर, नागपूर, जळगांव या जिल्ह्यासह संपूर्ण राज्यातील वाढत्या प्रदुषणावर नियंत्रण आणण्याची तसेच सक्षम उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही वा प्रतिक्रिया."

---

मा. मुख्यमंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग ) यांचे निवेदन

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने सन २०११ ते २०१५ या कालावधीमध्ये भारतातील २२ राज्यातील १३१ शहरांमधील हवेची गुणवत्ता प्रदूषित झाली असल्याबाबत प्रसिध्द केले होते. सदरील शहरांमधील हवेतील धुलीकण (पीएम १०) या प्रदूषित घटकाबाबतची मात्रा प्रसिध्द केलेली होती. यामध्ये महाराष्ट्र राज्यातील १९ मुंबई, नवी मुंबई, उल्हासनगर, बदलापूर, पूणे, नागपूर, अकोला, अमरावती, औरंगाबाद, चंद्रपूर, जळगाव, जालना, सांगली, कोल्हापूर, लातूर, नाशिक, सोलापूर, ठाणे आणि वसई-विरार या शहरांमधील वातावरणातील हवेतील गुणवत्ता प्रदूषित झाल्याचे प्रसिध्द करण्यात आले होते.

अध्यक्ष, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी १ जुलै २०१६ अन्वये अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, यांना प्रदूषित शहरांचे प्रदूषण रोखण्यासाठी व हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत हवा (प्रतिबंध व नियंत्रण ) कायदा १९८१ कलम क्रमांक १८(१) (ब) अन्वये निर्देश दिले होते. त्यानुसार चंद्रपूर, नागपूर व जळगांव या शहरातील हवा प्रदूषण नियंत्रणाकरीता कृती आराखडा तयार करण्यात आलेला होता. सदर आराखड्यात खालील बाबीचा समावेश आहे.

१. शहरातील वाहनांमुळे होणारे हवा प्रदूषण नियंत्रणात आणणे.

२. शहरातील रस्त्यावरील वर्दळीमुळे निर्माण होणारे धुलीकण नियंत्रणात आणणे.

३. हवेतील धुलीकणाचे प्रमाण कमी करण्यासाठी, पालापाचोळा/घरगुती घनकचरा जाळल्यामुळे होणारे प्रदूषण कमी करणे.

४. उद्योगांमुळे होणारे हवा प्रदूषण रोखणे.

५. बांधकामाच्या घडामोडीमुळे निर्माण होणारे हवा प्रदूषण नियंत्रण करणे.

६. शहरातील हवेतील धुलीकणाचे प्रमाण कमी करण्यासाठीचा कृती आराखडा तयार करणे.

सदरील कृती आराखड्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे सुरु असून वेळोवेळी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून आढावा घेण्यात येतो.

राज्यात सध्या किमान तापमानात वाढ, दरवर्षी वाहनांच्या संख्येत होणारी वाढ, सागरी किनारा मार्गाची सुरू असलेली कामे, विविध ठिकाणी सुरू असलेली बांधकामे, खोदकामे व पाडकामे तसेच कारखान्यांमधून निघणारा धूर यामुळे शहरातील प्रदूषणात वाढ झाल्याचे दिसून येते. जमिनीलगतच्या थंड हवेमुळे इतर ऋतुपेक्षा हिवाळयात प्रदूषणाचे प्रमाण अधिक प्रमाणात असते. सदर परिस्थिती ही दरवर्षी नोव्हेंबर ते फेब्रुवारी या महिन्यात उद्भवत असते.

चंद्रपूर, नागपूर व जळगांव या शहरातील हवेचा दर्जा माहे नोव्हेंबर २०२३ मध्ये हवा गुणवत्ता निर्देशांकनुसार काही प्रमाणात ठराविक ठिकाणी, ठराविक दिवशी धोकादायक पातळीपर्यंत खालावलेला आढळून आला होता.

चंद्रपूर जिल्ह्यामध्ये एकुण २० जल प्रदूषणकारी उद्योग कार्यरत असुन या उद्योगामधून २७५.१७८३ द.ल.लि. इतक्या औद्योगिक सांडपाण्याची निर्मिती होते. सर्व जल प्रदूषणकारी उद्योगांमध्ये प्राथमिक, द्वितिय व तृतिय स्वरूपाची सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा बसविण्यात आली आहे. प्रक्रियाकृत सांडपाण्याचा वापर बाग कामाकरीता व प्रक्रियेमध्ये पुर्नवापर करण्यात येतो. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये एकुण १६ नागरी स्थानिक स्वराज्य संस्था असुन त्यापैकी १ महानगरपालिका, ०९ नगरपालिका, ०६ नगरपंचायत आहेत. सद्यस्थितीमध्ये चंद्रपूर शहरामधुन ३६ द.ल.लि. घरगूती सांडपाण्याची निर्मिती होत असून त्यावर प्रक्रिया करण्याकरीता एकूण ७०.५ द.ल.लि. इतकी क्षमता असणारे ०३ सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारण्यात आलेले आहेत व त्यामधून ३६ द.ल.लि. इतक्या सांडपाण्यावर प्रक्रिया होते. इतर नगरपालिका व नगरपंचायत मधुन ३३.९ द.ल.लि. इतक्या निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर कोणत्याही प्रकारची प्रक्रिया न करता सांडपाणी विविध नाल्यामध्ये सोडण्यात येते. याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाणे सर्व नगरपालिका व नगरपंचायतींना सांडपाणी प्रक्रिया करुनच नैसर्गिक स्त्रोतात विर्सजित करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत चंद्रपुर शहरामध्ये गणपती उत्सवामध्ये ३ ठिकाणी व दिवाळी मध्ये ०३ ठिकाणी ध्वनी मोजमापन करण्यात येते. सदर ध्वनी मोजमापनाचा अहवाल चंद्रपुर महानगरपालिका आयुक्त/ पोलीस अधीक्षक यांना अवलोकनार्थ पाठवण्यात येतो व त्यांचेकडुन पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येते.

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार माहे जानेवारी २०२३ ते ऑक्टोंबर २०२३ पर्यंतची श्वसनांच्या आजाराच्या रुग्णांची सरासरी आकडेवारी पाहता माहे नोव्हेंबर २०२३ मध्ये रुग्णांची नोंद कमी आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपुर यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार चंद्रपुर जिल्हयात सन २०२०-२१, २०२१-२०२२ व २०२२-

२३ या तीन वर्षाच्या रुग्णांच्या आकडेवारी वरुन असे लक्षात येते की, कोणत्याही आजाराच्या प्रमाणात रुग्णांच्या संख्येत सतत वाढ किंवा घट झाल्याचे दिसुन येत नाही.

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांच्या दि. १३/१२/२०२३ रोजी च्या प्राप्त अहवालानुसार जळगांव जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत सर्दी, खोकला इत्यादी असे श्वसनाचे आजारांमध्ये माहे नोव्हेंबर मध्ये रुग्ण संख्येत वाढ (मागील वर्ष व मागील दोन महिन्याच्या तुलनेत) वाढ दिसुन आलेली नाही. तसेच जिल्हा शल्यचिकित्सक, जळगांव यांच्या दि. १३/१२/२०२३ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार जिल्हा शल्यचिकित्सक यांचे अधिनस्त असलेल्या आरोग्य संस्थामध्ये प्रदुषणामुळे परिणामी नागरीकांना अस्थमा, निमोनिया, सर्दी, खोकला आदी श्वसनाच्या आजाराचे रुग्णसंख्येत वाढ झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे राष्ट्रीय वातावरणीय हवेची गुणवत्ता तपासणी उपक्रम/ राज्य वातावरणीय हवेची गुणवत्ता तपासणी उपक्रम राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ६९ ठिकाणी स्वयंचलीत वातावरणीय हवा गुणवत्ता तपासणी संयंत्रणेची (CAAQMS) यंत्रणा उभी केली आहे. सदर यंत्रणेमधून प्राप्त होणारी आकडेवारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थाळावर प्रकाशित केली जाते. पृथ्थ:करण अहवालानुसार हवा गुणवत्ता निर्देशांक (AQI) हा सर्वसाधारणपणे समाधानकारक ते मध्यम या गुणवत्तेत येतो.

हवा, जल तसेच ध्वनी प्रदुषण कमी करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांकडुन आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

*****************************************************

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

मा. श्री. सुनिल प्रभू, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २३१९ पुढीलप्रमाणे आहे -

"कोल्हापूर बायोमेडिकल वेस्ट विल्हेवाटीसाठी मे.एस.एस. सर्विसेस कोल्हापूर महानगरपालिका व मे.एस.एस. सर्विसेस इचलकरंजी महानगरपालिका या कंपनीकडे कंत्राट असणे, ह्या कंपन्या नगरपालिकाअंतर्गत काही तालुक्यात बायोमेडिकल वेस्टच्या विल्हेवाटीचे काम सक्षमपणे करणे, याशिवाय श्री. गोविंद बायोमेडिकल प्रा.लि. कुडाळ (सिधुदूर्ग) ही कंपनी बायोमेडिकल वेस्टचे विल्हेवाट करण्यासाठी क्षमतेने काम करीत असणे, या तीनही कंपन्या सक्षम, अनुभवी व कुशल कर्मचारी याबाबतीत स्वयंपूर्ण असणे, या कंपन्यांची प्रत्येकी १० हजार बेडची क्षमता कमी असली तरी नवीन कंपनीस मान्यता देणे नियमबाह्य असणे, याशिवाय नवीन कंपनीस परवानगी देताना ७५ कि.मी.ची मर्यादा असणे, असा नियम असताना येथे आरोग्यम वेस्ट मॅनेजमेंट प्रा. लि.ला प्लॉन्ट उभारणीस महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने मान्यता देणे, खरेतर या कंपनीकडे पुरेशी क्षमता, अनुभव नसणे, त्यांना परवानगी देताना कागदपत्रांची पूर्तता व निविदा प्रक्रिया राबविलेली नसणे, नवीन इन्सीनरेटरची १५० किलो प्रती तास क्षमतेच्या उभारणीची मागणी केली असता, २५० किलो प्रती तास क्षमतेचा इन्सीनरेटरची नियमबाह्य उभारणी करण्यास दिलेली संमती चुकीचे असणे, त्यामुळे ही परवानगी देतान आर्थिक हितसंबंध असल्याची चर्चा असणे, या प्रकल्पास मान्यता देताना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकारावर गदा आणून मान्यता देणे, त्यामुळे शासनाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

मा. मुख्यमंत्री यांनी करावयाचे निवेदन

कोल्हापूर जिल्हयाचे एकूण क्षेत्रफळ ७६८५ चौ. किमी असून जिल्हयाची लोकसंख्या ३५.२३.१६२ इतकी आहे. या जिल्हयात १२ तालूके, ०२ महानगरपालिका, १० नगरपरिषद व ०३ नगरपंचायत यांचा समावेश होतो. या जिल्हयात जवळपास १२०० लहान मोठी खेडी आहेत. कोल्हापूर जिल्हयामध्ये एकूण ३०६९ इतक्या आरोग्य सेवा आस्थापना उदा. इस्पितळे, दवाखाने, क्लिनिक, लॅब इ. कार्यरत आहेत. सदरील आस्थापनांमधुन निर्माण होणाऱ्या जैव वैद्यकीय कचऱ्याची प्रक्रिया व विल्हेवाट करण्याकरीता ३ सामुहिक जैव वैद्यकीय कचरा निर्मुलन संस्था कार्यरत आहेत. तसेच मागील वर्षाच्या वार्षिक अहवालानुसार आरोग्य सेवा आस्थापना मधील एकूण खाटांची संख्या १२५९० आहे. मागील

वर्षी सरासरी २३३७ कि.ग्रॅ./दिन जैव वैद्यकीय कचऱ्यावरती प्रक्रिया करण्यात आली व त्याची विल्हेवाट सद्य:स्थितीत चालू असलेल्या ०३ सामुहिक जैव वैद्यकीय कचरा निर्मुलन करणाऱ्या संस्थेमार्फत करण्यात येत होती. कोल्हापूर जिल्हयासाठी कार्यरत सामुहिक जैव वैद्यकीय कचरा प्रकल्पांची माहिती खालीलप्रमाणे -

| अ.क्र | प्रकल्पाचे नाव व पत्ता | संमतीपत्राची मुदत | प्रकल्पाची क्षमता | क्षेत्र (तालुके) | बेडेड आरोग्य सेवा आस्थापनांची संख्या | बिना बेडेड आरोग्य सेवा आस्थापनांची संख्या | एकूण बेडची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे. एस. सर्विसेस, नवीन सांगली नाक्याजवळ, टाकवडे रोड, इचलकरंजी, जि. कोल्हापूर | ३१.१०.२०२३ | १०० किलो/ प्रति तास १८०० किलो/ प्रति दिन | कोल्हापूर जिल्ह्यातील पाच तालुके : हातकणंगले, शिरोळ,पन्हाळा, शाहूवाडी, गडहिंग्लज व कागल (शहर) | ४२३ | १२८३ | ५७३८ |
| २ | मे. एस. सर्विसेस, ई-वॉर्ड, कसबा, बावडा, कोल्हापूर | ३१.०३.२०२६ | २५० किलो/ प्रति तास ४५०० किलो/ प्रति दिन | कोल्हापूर जिल्ह्यातील पाच तालुके : करवीर, गगनबावडा, राधानगरी,भुदरगड, कागल(ग्रामीण) कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्र व कागल (शहर) | ४०२ | | |
| ३ | मे.श्री गोविंद बायो- मेडिकल प्रा. लि.कुडाळ औद्योगिक वसाहत,जि. सिंधुदुर्ग. | ०३.०२.२०२८ | १०० किलो/ प्रति तास १८०० किलो/ प्रति दिन | आजरा व चंदगड तालुका | ५४ | ८१ | २२७ |
| ४ | | | | जि.सिंधुदुर्ग- वेंगुर्ला,कुडाळ, मालवण, सावंतवाडी दौडामार्ग तालुका | ९६ | ३११ | १४६५ |

उपरोक्त कोल्हापूर जिल्हयामधील कार्यरत दोन सामुहिक जैव वैद्यकीय कचरा प्रकल्प सोडून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास मे. आरोग्यम वेस्ट मॅनेजमेंट प्रा. लि., प्लॉट नं. एफ २०, कागल-हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक वसाहत, कोल्हापूर यांच्या कडून जैव वैद्यकीय कचरा प्रकल्प उभारण्यासाठीचा संमत्तीपत्राचा अर्ज प्राप्त झालेला होता. प्रस्तावित सामुहिक जैव वैद्यकीय कचरा प्रकल्प हा मे. श्री गोविंद बायो-मेडिकल प्रा. लि. कुडाळ औद्योगिक वसाहत, जि. सिंधुदुर्ग पासून आकाशीय अंतर- १०१.१६ कि.मी., मे. एस. एस. सर्विसेस, ई वॉर्ड, कसबा बावडा, कोल्हापूर पासून आकाशीय अंतर-१७.१६ कि.मी., व तसेच मे. एस. एस. सर्विसेस, नवीन सांगली नाक्याजवळ, टाकवडे रोड, इचलकरंजी, जि. कोल्हापूर पासून आकाशीय अंतर- १६.९३ कि. मी. आहे. यावरुन प्रस्तावित सामुहिक जैव वैद्यकीय कचरा प्रकल्प हा कार्यरत सामुहिक जैव वैद्यकीय कचरा प्रकल्पापासून ७५ किमीच्या आत आहे.

जैव वैद्यकीय कचरा केंद्र प्रक्रिया स्थापनेबाबत केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने दि ०६/०५/२०२२ रोजीच्या पत्राद्वारे असे स्पष्ट केले आहे की, "जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अन्वये एका ठिकाणी / परिसरामध्ये एकापेक्षा जास्त जैव वैद्यकीय कचरा केंद्र स्थापित करण्याबाबत कोणतेही प्रतिबंध/निबंध नाही. तसेच केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने जारी केलेल्या सुधारित मार्गदर्शक तत्वांनुसार जर विद्यमान केंद्रामध्ये जैव वैद्यकीय कचरा हाताळण्यासाठी पुरेशी क्षमता नसेल आणि / किंवा जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अंतर्गत विहित केलेल्या नियमांचे पालन करत नसेल तर कव्हरेज क्षेत्रात (७५ कि.मी.च्या त्रिज्या) नवीन जैव वैद्यकीय कचरा केंद्र स्थापनेबाबत कोणतेही प्रतिबंध/निबंध नाही."

तसेच मुकुल कुमार V/s स्टेट ऑफ UP & Ors (OA १८०/२०२१), माननीय NGT (PB), दिल्ली यांनी दिनांक २३/०१/२०२३ च्या आदेशाच्या परिच्छेद १४ मध्ये म्हटले आहे की "अशा प्रकारे, संरक्षण सुनिश्चित करण्याच्या दृष्टीकोनातून पर्यावरणाच्या बाबतीत, आम्हाला असे निर्देश देणे आवश्यक आहे की या प्रकरणातील केंद्रीय देखरेख समितीच्या (CMC) पुढील निर्णयापर्यंत, ओडिशा आणि पंजाब राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने सुचविल्याप्रमाणे अतिरिक्त सामुहिक जैव वैद्यकीय कचरा प्रकल्पाच्या परवानगीची त्रिज्या विद्यमान सुविधेच्या ४० किमीपर्यंत कमी केली जाईल आणि १०००० खाटांची संख्या कमी करून ५००० खाटांवर येईल. तसेच राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने अधिक चांगल्या अनुपालनाची खात्री करण्यासाठी, आवश्यक वाटल्यास, अंतर कमी करण्याचा अधिकार असेल. एका जिल्ह्याचे एक सामुहिक जैव वैद्यकीय कचरा प्रकल्पाचे तत्त्व सार्वत्रिक असू शकत नाही, कारण असे मोठे जिल्हे असू शकतात ज्यांना एकापेक्षा जास्त सुविधांची आवश्यकता असू शकते किंवा असे छोटे जिल्हे असू शकतात ज्यांना वेगळ्या पद्धतीने सामोरे जावे लागेल."

तसेच सामुहिक जैव वैद्यकीय कचरा सुविधा केंद्र चालक संघटना V/s & महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ & Ors (OA ५१/२०२२), माननीय NGT (WZ) पुणे दिनांक २१/०३/२०२३ नुसार,

अर्जदाराच्या वकिलाने केलेल्या युक्तिवादादरम्यान, असे नमूद केले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ७५ किमीच्या व्याप्तीमध्ये एकापेक्षा जास्त सामुहिक जैव वैद्यकीय कचरा केंद्र स्थापित करण्याची परवानगी देऊ नये, त्यामुळे इतर सामुहिक जैव वैद्यकीय कचरा केंद्रांच्या व्यावसायिक व्यवहार्यतेवर परिणाम करेल, अर्जदारांच्या वकिलांनी केलेल्या युक्तिवादावर माननीय N.G.T ने असे स्पष्ट केले आहे की ७५ किमीच्या परिसरात एकापेक्षा जास्त सामुहिक जैव वैद्यकीय कचरा केंद्र स्थापित केले जाऊ शकत नाहीत असा नियमात निकष नाही आहे. माननीय NGT (WZ) पुणेच्या मते, वरील निकषांमध्ये किमान एक सुविधा असावी असे स्पष्ट केले आहे म्हणून, एकापेक्षा अधिक सामुहिक जैव वैद्यकीय कचरा केंद्र असल्यास याचा अर्थ असा नाही की ते जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ चे उल्लंघन आहे. असे दिसते की कायदेमंडळचा हेतू हा आहे की ७५ किमी परिसरात किमान एक सामुहिक जैव वैद्यकीय कचरा केंद्र स्थापित केले जाये. तसेच अर्जदाराच्या वकिलांनी अशी प्रार्थना केली आहे की जोपर्यंत आरोग्य सुविधा केंद्राची सुची पूर्ण होत नाही तोपर्यंत, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून मंडळाने कोणत्याही नवीन सामुहिक जैव वैद्यकीय कचरा केंद्रला स्थापनेसाठी किंवा सुरु करण्यासाठी संमती आणि अधिकृतता देण्यापासून प्रतिबंधित केले जावे. नियमांतर्गत ७५ किमी परिसरात एकापेक्षा जास्त सामुहिक जैव वैद्यकीय कचरा केंद्र स्थापन करण्यास मनाई नाही या कारणास्तव माननीय NGT (WZ) पुणे ने नवीन सामुहिक जैव वैद्यकीय कचरा केंद्रला स्थापनेसाठी किंवा सुरु करण्यासाठी संमती आणि अधिकृतता देण्यापासून प्रतिबंधित केले जावे ही विनंती अमान्य केली.

त्या अनुषंगाने सदरील संस्थेस प्रकल्प उभारण्याकरीताचे संमत्तीपत्र (Consent to Establish) कोल्हापूर जिल्हामध्ये नवीन येणाऱ्या किंवा ज्या आरोग्य सेवा आस्थापना वर नमुद केलेल्या ०३ सामुहिक जैव वैद्यकीय कचरा प्रकल्पाचे सभासद नसणाऱ्या आरोग्य सेवा आस्थापनांसाठी, पर्यावरण विषयक मंजूरी घेण्याच्या तसेच इतर अटी व शर्तीसह दि. ३०/०६/२०२३ रोजी संमतीपत्र देण्यात आले. संमत्तीपत्र मंजूर करताना इन्सिनरेटरची क्षमता १५० किलो/तास ऐवजी २५० किलो/तास ही टंकलेखनातील चूक होती. ही टंकलेखनात्मक चूक दुरुस्त करुन दि. ०१/०८/२०२३ रोजी सुधारित संमतीपत्र प्रदान करण्यात आले आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून याबाबत करण्यात आलेली कार्यवाही नियमानुसार असून, अधिक चांगली सेवा उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून करण्यात आलेली आहे. यामुळे शासनाचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही. उलट कोल्हापूर जिल्हयातील नागरिकांना स्पर्धात्मक पर्याय उपलब्ध राहील तसेच जैव वैद्यकीय कचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावली जाईल.

**लक्षवेधी सूचना क्रमांक-१६१७**

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन**

**श्री.सुभाष धोटे, वि.स.स.** यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना क्र.१६१७** पुढीलप्रमाणे आहे. :-

"राज्यातील चंद्रपूर जिल्ह्यामध्ये एकूण ४ विभागीय कोल माईन्स कार्यरत असून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी शासनाच्या निकषानुसार वेकोली परिसरात वृक्ष लागवड करण्याकरिता निविदा काढण्यात आलेली असणे, सदरहू वृक्ष लागवडीचे काम मध्यप्रदेश राज्य वनविकास निगम कार्यालय, छिंदवाडा येथील ठेकेदारास मंजूर झालेले असणे, सदरहू ठेकेदार कंपनीने शासनाच्या निकषानुसार करारात नमूद केलेली विशिष्ट जातीची वृक्ष लागवड न करता मनमानी पध्दतीने प्रोसोपीस जुलीप्लोरा जातीचे काटेरी वनस्पतीची लागवड करुन अधिकाऱ्यांशी संगनमत करुन कोट्यावधी रुपये रकमेच्या देयकांची उचल करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येणे, मात्र सदरहू कोल माईन्स कंपन्याकडून परिसरातील पर्यावरण/वातावरण प्रदूषित केले जात असतांना कोणतीही प्रतिबंधात्मक उपाययोजना न करता नागरिकांच्या आरोग्याशी खेळले जात असणे, यामुळे परिसरातील नागरिक प्रदुषणामुळे विविध आजाराचे बळी पडल्या जात असल्याचे निदर्शनास येणे, माईन्सचे काम सुरु करतेवेळी ज्या स्थितीत परिसर होता ती स्थिती माईन्स बंद करतांना नसल्याचे निदर्शनास येणे, सदर प्रकरणी संबधित कोल माईन्स प्रशासन, स्थानिक यंत्रणा/शासनामार्फत अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे विभागातील सर्वसामान्य जनतेत शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

**श्री.एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री (खनिकर्म) यांचे निवेदन**

केंद्र शासनाचा अंगीकृत उपक्रम असलेल्या मे.वेस्टर्न कोलफिल्ड लि., यांच्या चंद्रपूर क्षेत्र, बल्लारपूर क्षेत्र, माजरी क्षेत्र व वणी क्षेत्रात असलेल्या कोळसा खाणीच्या परिसरात पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या उद्देशाने स्थानिक पर्यावरणाशी सुसंगत असलेल्या वृक्षांचे रोपण व देखभाल करण्याच्या उद्देशाने मे.वेस्टर्न कोलफिल्ड लि. व मध्य प्रदेश राज्य वनविकास निगम लि. यांच्यात करारनामा झालेला आहे. त्यानुसार, या परिसरात आवळा, सिताफळ, अर्जुन, जाम, पेरु, कुसुंब, करंज, सिसु निम, बेहडा, पिंपळ आणि बांबु इ. प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आलेली आहे. या लावण्यात आलेल्या झाडांचे पर्यवेक्षण व पर्यावरण पूर्तता अहवाल केंद्र शासनाच्या वने, पर्यावरण व वातावरणीय बदल या विभागामार्फत केला जातो.

याशिवाय या परिसरात, प्रदुषण नियंत्रीत राहण्यासाठी कंपनीकडून, (१) ब्लास्टींग आणि क्रशिंगपासून संरक्षण करण्यासाठी पृष्ठभाग खाण तंत्रज्ञानाचा वापर करणे. (२)कोळसा स्टॉक यार्ड, कोळसा वाहतूक रस्ता आणि वजन काट्याच्या ठिकाणी फिक्सड स्प्रिंकलर बसवणे. (३)धुळीवर नियंत्रण रहावे, यासाठी वाहतुकीच्या रस्त्यावर फिरत्या पाण्याच्या टॅंकरद्वारे पाणी फवारणे. (४) सरासरी ४०० ते ५०० हे. परिसरात वृक्षारोपण करण्यात आलेले असणे.(५) धूळकण पसरविणारे खनिज कार्यक्षेत्रापासून दूर १०० मिरट लांब अंतरावर टाकले जात असणे. (६) खदानीतून निघणाऱ्या वाहनांचे टायर, खदानीच्या बाहेरील परिसरात धुण्यासाठी पाण्याचो साय करण. (७) कोळसा वाहतुकीचा रस्ता व डेपो जवळ स्प्रिंकलर मजबुतीने बसविणे. या सर्व उपाययोजना केलेल्या आहेत.

याशिवाय कंपनीच्या कार्यक्षेत्रात, काम करणारे सर्व ठेकेदार/कर्मचारी यांच्यासाठी प्राथमिक उपचार किट उपलब्ध असून, येथे कार्यरत कर्मचारी, कामगार तसेच कंपनीच्यापरिसरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आरोग्य तपासणी शिबीरे तसेच प्राथमिक उपचार शिबीरे कंपनीच्या सीएसआर फंडातून वेळोवेळी आयोजित केली जात आहेत.

सध्या कार्यरत असलेल्या चंद्रपूर जिल्ह्यातील एकूण ४ खाणीमध्ये मंजूर खाणकाम आराखड्यानुसार उत्खनन व इतर संपूर्ण खाणकामे केली जात आहे. तसेच उत्खनन पूर्ण झालेल्या खाणी या मंजूर मायनिंग क्लोजर प्लॅन नुसार कार्यवाही करुन बंद केल्या जातात.

ROTA-H-1721-1 (750-3-2024) ******************

महाराष्ट्र विधानसभा

नगर विकास विभाग

लक्षवेधी सूचना क्र.१८५७

सन २०२३ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन.

**श्रीमती देवयानी फरांदे, श्री.नितीन पवार मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

नाशिक महानगरपालिका अंतर्गत रस्ते स्वच्छता करण्यासाठी व पेस्ट कंट्रोल करण्यासाठी ठेका देण्यात येणे, या ठेकेदाराचे काम अत्यंत समाधानकारक असणे, लोक प्रतिनिधी व नागरिकांनी याबाबत मोठ्या प्रमाणावर नाशिक महानगरपालिकेला तक्रार केलेली असणे, असे असताना देखील सदर ठेकेदारांना मुदतवाढ देण्यात येणे, सदर ठेकेदारांकडून कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबत मोठ्या प्रमाणावर लूट केली जाणे, कर्मचा-यांना किमान वेतन देणे आवश्यक असताना देखील सदर वेतन न देता कर्मचाऱ्यांच्या खात्यातून परस्पर रक्कम काढून घेणे, अनेक कर्मचा-यांच्या खात्यातून एकाच वेळी सारख्या स्वरूपाची रक्कम काढून घेणे, पेस्ट कंट्रोल ठेकेदाराकडून योग्य प्रकाराने काम होत नसल्यामुळे शहरात डेंगू सारखी लाट निर्माण होणे, डेंगू मुळे नागरिकांचा मृत्यू होत असताना महापालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून मात्र डेंगू बाबतची खरी आकडेवारी लपवण्यात येणे, महानगरपालिकेत अधिकारी व ठेकेदार यांच्यात संगणमत झाल्यामुळे महानगरपालिकेची होत असणारी मोठी लूट, शासनाचे सदर बाबीकडे होत असणारे दुर्लक्ष, मुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, याबाबत सरकारने तत्काळ करावयाची कारवाई व प्रतिक्रीया.

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

नगर विकास विभाग शासन परिपत्रक दिनांक ०६ मे, २०१६, मा.न्यायालयाकडील निकाल व विविध सक्षम प्राधिकरणांच्या मान्यतेस अनुसरून नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ना.पुर्व, ना.पश्चिम व गंगाघाट येथील सार्वजनिक ठिकाणी बाहययंत्रणेद्वारे साफसफाई व स्वच्छता कामाचे कंत्राट मे.वॉटरग्रेस प्रॉडक्टस, नाशिक यांना दिनांक ०१.०८.२०२० पासून तीन वर्षाकरीता देण्यात आले होते. त्यानुसार, सदर कामकाजाची मुदत दिनांक ३१.०७.२०२३ रोजी संपुष्टात आली. तथापि याकामी नविन निविदा प्रक्रिया राबविणे व प्रत्यक्ष कामकाजास सुरूवात होण्यास अवधी लागणार असल्याच्या कारणास्तव, मे.वॉटरग्रेस प्रॉडक्टस, नाशिक यांचे सद्यस्थितीतील कामास पुढील तीन महिने म्हणजेच दिनांक ०१.०८.२०२३ ते ३१.१०.२०२३ पर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यात आलेली आहे. व तद्नंतर दिनांक ०१.११.२०२३ ते ३१.०१.२०२४ पर्यंत द्वितीय मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

सदर कंत्राटाचा कालावधी संपल्यानंतर सदर विभागातील सार्वजनिक साफसफाई व स्वच्छतेचे कामकाज अबाधित राखणे अत्यंत आवश्यक आहे. तथापि, नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील वाढती लोकसंख्या तसेच, नव्याने विकसित होत असलेले नागरी भाग व विस्तारीत होत असलेले भौगोलिक क्षेत्रफळ इ.चा विचार करता मनपा सफाई कामगारांची संख्या कमी आहे. त्यामुळे शहराची साफसफाई व स्वच्छता अबाधित राखणे तितकेच आवश्यक आहे. सदर कामास मुदतवाढ न दिल्यास परिणामी शहरातील सार्वजनिक स्वच्छतेच्या कामकाजात व्यत्यय निर्माण होऊन त्याचा सार्वजनिक आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन साथीचे रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे अत्यावश्यक सेवेत अडथळे निर्माण होतील. या बाबींमुळे सदर कामास महानगरपालिकेमार्फत पुनश्चः मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

संबंधित स्वच्छता कंत्राटदार मे. वॉटरग्रेस प्रॉडक्टस, नाशिक व सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी पाणी पुरवठा विभाग व सिटी लिंक विभागाकडून कंत्राट दिलेला कंत्राटदार तसेच सार्वजनिक आरोग्य मलेरिया विभागाकडून डास निर्मुलनाकामी कंत्राट देण्यात आलेल्या संबधीत कंत्राटदारांना महानगरपालिकेडून दरमहाचे देयक विहीत प्रक्रियेनुसार अदा करण्यात येते. किमान वेतन कायद्यानुसार देय वेतन कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यावर जमा केले बाबतची खात्री करण्यात येते. तसेच, ठेकेदाराने देयक सादर केल्यानंतर देयकाची पडताळणी व छाननी करणेत येऊन कंत्राटी कामगारांचे भविष्य निर्वाह निधी, विमा इ.भरलेबाबत खात्री करण्यात येते व तद्नंतर लेखा व लेखापरिक्षण विभागाकडून देयकाची पडताळणी होऊन लेखा विभागामार्फत देयकाची अंतिम अदायगीची प्रक्रिया पार पाडली जाते. तसेच, कर्मचाऱ्यांचे किमान वेतन न मिळण्यासंदर्भात कर्मचाऱ्यांच्या तक्रारी प्राप्त नाहीत.

डास निर्मुलनाकामी ठेका संपुष्टात आल्यानंतर नविन निविदा प्रक्रिया राबविणेकामी कार्यवाही प्रस्तावित असताना सदर निविदेच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दावा दाखल केल्याने सदर कामास मुदतवाढ देणेत आली आहे. तथापि, मा.न्यायालयाकडील निकाल लागलेला असून, नविन निविदा प्रक्रिया कार्यवाहीत आहे.

नाशिक शहरात डेंग्यु सारखी लाट निर्माण झालेली नसून जानेवारी २०२३ ते आजपर्यंत डेंग्युमुळे एका व्यक्तीचा मृत्यु झालेला आहे.महानगरपालिका व राज्य शासन कर्मचाऱ्यांद्वारे तापरुग्ण सर्वेक्षण, वर्तमानपत्र, लाऊडस्पिकर ,पत्रके, पोस्टर,प्रभातफेरी, गटसभा, लोकल टि.व्हि, रेडीओद्वारे नागरिकांना आरोग्य शिक्षण दिले जात आहे. तसेच डास उत्पत्ती स्थाने नष्ट करण्यासाठी व डेंग्यु ह्या आजारावर प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यासाठी मनपातर्फे मोहिम हाती घेण्यात आली असून डेंग्यु आजाराच्या अनुषंगाने मनपातर्फे सर्वोतोपरी कार्यवाही करण्यात येत आहे.

***************************************************

लक्षवेधी सूचना क्र. २०४४

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

श्री.नानाभाऊ पटोले, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २०४४ खालीलप्रमाणे आहे:-

" ठाणे जिल्ह्यातील कळवा येथील एन एम एम कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित या गृहनिर्माण संस्थेची पुनर्बांधणी करार करून करून अशा बिल्डर यांनी हा प्रकल्प राबवताना शासनाचे तसेच महानगरपालिका व रेरा कायद्याचे उल्लंघन केल्याचा प्रकार निदर्शनास येणे, त्यामुळे त्या सोसायटीतील मूळ रहिवासी यांचे भविष्य व भवितव्य धोक्यात येणे, सदर सोसायटीच्या लगत जय त्रिमूर्ती सोसायटी असून सदर दोन संस्थांमध्ये जमिनीबाबत वाद असल्याने एन एम सोसायटी व पुनर्बांधणी करणाऱ्या आशर बिल्डर या दोघांमध्ये झालेल्या करारात वाद दिसून येणे, रेल्वेची जमीन अधिकृत न करता त्यावर ठाणे मनपा सार्वजनिक वापरासाठी रस्ता बांधून याबाबत रेल्वे मंत्रालयाने चौकशीची मागणी करणे, सदरचा प्रकल्प हा बेकायदेशीर उभा केल्यामुळे हा प्रकल्प अडचणी सापडल्याने रहिवाशांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करून करावयाची संबंधित विकासावर याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

<u>मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन</u>

ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार त्यांच्या हद्दीतील मौजे कळवा येथे एन एम एम कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या एकुण १३ इमारती असून संस्थेचे ३८४ सभासद आहेत. सदरच्या इमारती जुन्या व धोकादायक झाल्याने त्यांची एकत्रित पुनर्बांधणी करण्याचा निर्णय सदर संस्थेने घेतला होता. तथापी, इमारत क्र. ३ च्या सभासदांनी त्यांची इमारत केवळ २० वर्षे जुनी असल्याने पुनर्विकासास विरोध केला असल्याने संस्थेने १३ इमारतींमधून, इमारत क्र ३ चे विभाजन करुन १२ इमारतींची स्वतंत्र नोंदणी करण्याबाबत उप निबंधक, सहकारी संस्था, ठाणे शहर यांचेकडे अर्ज केला असता त्यावर दिनांक १३.०७.२०१८ रोजी सुनावणी होऊन १४.१४ % क्षेत्र इमारत क्र ३ करीता राखून ठेवणेबाबत आदेश पारित झाले.

त्यानुसार संस्थेच्या एकूण १७१९६ चौ.मी. क्षेत्रापैकी इमारत क्र. ३ करीता १४.१४ % म्हणजेच २४३१.५१ चौ.मी. क्षेत्र राखून उर्वरीत क्षेत्रावर १२ इमारतीच्या पुनर्बाधणी बांधकामास परवानगी मिळण्याचा प्रस्ताव विकासक मे. आशर व्हेंचर्स यांनी ठाणे महानगरपालिकेकडे दिनांक ०१.१२.२०२१ रोजी प्रस्ताव दाखल केला. अस्तित्वातील इमारतींच्या पुनर्बाधणी करीता एन एम एम कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था, विकासक मे. आशर व्हेंचर्स व संस्थेचे सभासद यांचे समावेत विकासकरारनामा दुय्यम निबंधक, ठाणे शहर यांच्याकडे दिनांक ३.११.२०२१ अन्वये नोंदणीकृत करण्यात आला आहे. वास्तुविशारद यांचेमार्फत दाखल केलेल्या १२ इमारतींच्या पुनर्बाधणी प्रस्तावास ठाणे महानगरपालिकेने एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील तरतूदीनुसार दिनांक ११.०१.२०२२ रोजी मंजूरी दिली आहे. त्यानुसार जागेवर बांधकाम सुरु आहे. एन एम एम कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेचे पुर्नविकासाबाबतचा करारनामा नोंदणीकृत करण्यात आली असून करारातील अटी उभयपक्षी यांना बंधनकारक आहेत.

शेप H/1685 (750-2-24) ए.पृ.

एन एम एम कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या भुखंडालगत जय त्रिमूर्ती को ऑ. हौ. सो. या संस्थेच्या इमारती असून दोन्ही संस्थेच्या इमारतीमधील रस्त्याच्या मालकी व हद्दीबाबत वाद आहे ही वस्तुस्थिती आहे. तथापि, उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे उक्त विषयाची तक्रार ठाणे महानगरपालिकेने निकाली काढली आहे.

कळवा बाजार पेठकडुन जुना मुंबई पुणे रस्ता ते सह्याद्री शाळेकडे जाणारा एकुण ४८०.०० मी. लांबीचा रस्ता ठाणे महानगरपालिकेमार्फत पुर्ण करण्यात आलेला आहे. यापैकी जुन्या मुंबई-पुणे रस्त्यापासून कळवा रेल्वे कारशेड गेट कडे जाणारा ११०.०० मी. लांबीचा रस्त्याचे व कळवा स्टेशन ते कळवा बाजार पेठ कडुन सह्याद्री सोसायटीकडे जाणाऱ्या सुमारे ८०.०० मी. अस्तित्वातील रस्त्याचे कॉक्रीटीकरण करण्यात आले आहे. तसेच या दोन रस्त्यामधील व रेल्वे संरक्षक भिंत व सह्याद्री सोसायटी व एन एम एम कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या संरक्षक भितीमधील २९० मी लांबीच्या अस्तित्वातील कच्च्या स्वरुपाच्या नाल्याची पुनर्बांधणी करुन जोड रस्ता तयार करण्यात आला आहे. सदर रस्ता बांधकामासाठी रेल्वे विभागाची कोणतीही हरकत ठाणे महापालिकेस प्राप्त नाही. सदरचे बांधकाम करतेवेळी रेल्वे विभागाची पडझड झालेली संरक्षक भिंत रेल्वे विभागाच्या अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार कॉंक्रीटमध्ये बांधुन देण्यात आलेली आहे ही वस्तुस्थिती आहे.

एन एम एम कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या अस्तित्वातील इमारतींच्या पुनर्बाधणी प्रस्तावास महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम १९६६ अंतर्गत, एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतूदीनुसार मंजूरी देण्यात आली असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

तसेच गृह निर्माण विभागाकडून प्राप्त माहितीनुसार सदर प्रकरणी महारेरा कायद्याचे कुठल्याही प्रकारचे उल्लंघन झालेले नाही. तसेच प्रकल्प पूर्ण करण्याचा दिनांक ३१.१२.२०२७ असून, आतापर्यंत महारेराकडे कुठल्याही ग्राहकाची तक्रार प्राप्त झालेली नसल्याचे गृहनिर्माण विभागाने कळविले आहे.

****

लक्षवेधी सूचना क्र. २१४८

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

**श्री. राजु (बाबा) जयवंतराव आवळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २१४८ खालीलप्रमाणे आहे :-**

" भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका हद्दीत टोरेंट पॉवर कंपनी लि. यांचे २००७ ते २०२३ पर्यंतचे थकबाकी वसुलीबाबत महानगरपालिकेने विजवितरण व्यवस्थेतील पायाभूत उपकरणे ज्या जागेवर आहेत त्या जागेवरील भुईभाडे व मालमत्ता करापोटी दिनांक ३० ऑगस्ट, २०१८ रोजी ३८५ कोटी महावितरणाच्या फ्रेंचायसी कंपनी टोरेंट पॉवरला भरण्याचे आदेशीत केले होते तसे न भरल्यास त्यांची जंगम मालमत्ता रद्द करण्याची नोटीस काढली असता तात्कालीन शासनाने परिपत्रक काढुन नोटीस रद्द करण्यात आली असणे, वास्तविक परिपत्रकाच्या आदेशात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूचि-ड प्रकरण- ८ कराधन नियम ४२ च्या तरतुदीनुसार जंगम / स्थावर मालमत्तेची अटकावनी करु नये म्हणुन जप्तीची नोटीस रद्द करण्यासाठी परीपत्रक काढण्यात येणे, महापालिकेने दिनांक २७ मे, २०१९ रोजी टोरेंट पॉवरला दिलेली माफीचें परीपत्रक तुर्त रद्द करुन भुईभाडे व मालमत्ता करापोटी थकबाकी तात्काळ वसुलीचे आदेश देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**<u>मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन</u>**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने मे.टोरेन्ट पॉवर कंपनी यांना सन २००७-०८ ते २०१८-२०१९ करीता भुईभाडे व मालमत्ता करापोटी (चालू मागणी व थकबाकी) रु.७१,३७,७२,९१२ व दंडनीय व्याजापोटी रू.२१३,६६,९९,४०० अशी एकूण रु.२८५,०४,७२,३१२ इतक्या रकमेच्या वसुलीकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या अनुसूची-ड, प्रकरण-८ कराधान नियम ३९ च्या तरतुदीनुसार देयक क्र. ००१ ते ००४ दिनांक १५.०६.२०१८ नुसार नोटीस बजाविली होती. तसेच अधिनियमाच्या अनुसूची-ड, प्रकरण-८ कराधान नियम ४२ च्या तरतुदीनुसार जंगम/स्थावर मालमत्तेची अटकावणी करून जप्तीची कारवाई करणे संदर्भात दिनांक ३०.०८.२०१८ आदेश बजावले होते.

सदर रक्कम वसुल केल्यास उक्त रकमेचा भाग अप्रत्यक्षरित्या व अंतिमत: भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांवर पडणार आहे. तथापि, राज्य मंत्रिमंडळाच्या दिनांक २९.११.२०१८ च्या बैठकीत "भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांनी महावितरण कंपनीची फ्रेंचायझी मे.टोरेन्ट पॉवर कंपनीवर वितरण रोहित्र, एल.टी. पोल, एच.टी. पोल, भुमीगत वाहिन्या यावर आकारलेला रु.२८५.०८ कोटी (२००७-०८ ते २०१८-१९ पर्यंतची मुळ रक्कम ७८.३८ कोटी, व्याज रु.२१३.६७ कोटी) मालमत्ता कर भरण्याबाबतची नोटीस रद्दबातल अथवा निरर्ह करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याकरीता नगर विकास विभागाकडून याबाबत विशेष अधिसूचना निर्गमित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

[ह.मा.प.]

रोटा H/1683 (750-2-24)

उक्त बाब विचारात घेता, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने मे.टोरेन्ट पॉवर कंपनी यांना दिनांक १५.०६.२०१८ च्या देयकान्वये उक्त रक्कम जमा करण्यास दिलेली नोटीस/आदेश व दिनांक ३०.०८.२०१८ अन्वये अटकावणी व जप्ती नोटीस/आदेश व्यापक लोकहिताविरुध्द असल्याचे निदर्शनास आल्याने व मंत्रिमंडळाच्या दिनांक २९.११.२०१८ च्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या अनुसूची-ड, प्रकरण-८, कराधान नियम ३९ च्या तरतुदीनुसार दिनांक १५.०६.२०१८ रोजीच्या नोटीसद्वारा मे.टोरेन्ट पॉवर कंपनी यांना सन २००७-०८ ते सन २०१८-१९ या कालावधीतील वीज वितरण व्यवस्थेतील पायाभुत उपकरणे ज्या जागेवर आहेत त्या जागेवरील भुईभाडे व मालमत्ता करापोटी (चालू मागणी व थकबाकी) रु.७१,३७,७२,९१२ व दंडनीय व्याजापोटी रु.२१३,६६,९९,४०० अशी एकूण रु.२८५,०४,७२,३१२ इतक्या रकमेची वसुली नोटीसद्वारे जमा करण्यास दिलेल्या आदेशांचे तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या अनुसूची-ड, प्रकरण-८ कराधान नियम ४२ च्या तरतुदीनुसार जंगम/स्थावर मालमत्तेची अटकावणी करून जप्तीची कारवाई करणे संदर्भात दिनांक ३०.०८.२०१८ चे आदेश व्यापक लोकहिताच्या विरुध्द असल्याचे अंतिमत: खात्री पटल्याने उक्त आदेशांचे कार्यान्वयन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५१ (३) नुसार प्राप्त अधिकारात अंतिमत: रद्द करण्यात आले.

सदरची कार्यवाही व्यापक लोकहित विचारात घेऊन अधिनियमातील तरतुदीद्वारे विहीत केलेल्या प्रक्रियेनुसार करण्यात आली आहे.

*****

लक्षवेधी सूचना क्र. २३१८

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

**श्री.सुनिल प्रभु, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२३१८ खालीलप्रमाणे आहे:-**

" वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात आगीच्या घटना सातत्याने वाढत असतानाही, महानगरपालिकेचे मुख्य अग्निशमन अधिकारी पद गेले सात ते आठ वर्षापासून रिक्त असल्याचा प्रकार नुकताच निदर्शनास येणे, आगीच्या वाढत्या घटना विचारात घेता शासनाच्या नगर विकास विभागाने महापालिकेचे सहाय्यक अग्निशमन अधिकारी सुरेंद्र सावंत यांची वसई-विरार महापालिकेच्या मुख्य अग्निशमन अधिकारी पदावर एक वर्षाच्या प्रतिनियुक्ती करण्याचे जारी केलेले परिपत्रक राजकीय दबाव आणून रद्द करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार, शासनाने वसई-विरार महापालिकेचे मुख्य अग्निशमन अधिकारी पद भरण्याकरिता जारी केलेले परिपत्रक रद्द केल्याने सदर पद हे प्रभारी अधिकारी दिलीप पालव यांचेकडेच कायम ठेवणे, विरारच्या विजय वल्लभ हॉस्पीटलला आयसीयू कक्षात आग लागून झालेली भीषण घटना, बहुसंख्य खाजगी रुग्णालयात फायर ऑडीट करण्यात न येणे, अनेक निर्माणाधीन इमारतींमध्ये शहानिशा न करता आर्थिक संगनमताने फायर ना हरकत दाखला देणे, वसईत वाढत असलेल्या आगीच्या घटना, त्यावर अग्निशमन विभागाकडून कोणतीही प्रभावी अंमलबजावणी करण्यात न येणे, तत्कालीन आयुक्त यांनी प्रभारी अधिकारी यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करणे, त्या चौकशीचा अहवाल अद्यापपर्यंत न येणे, मुख्य अग्निशमन अधिकारी हे पद न भरण्यात काय गौडबंगाल आहे व यात कोणाचे हित जपले जात आहे यासंदर्भात होत असलेली उलटसुलट चर्चा, मुख्य अग्निशमन अधिकारी हे पद तातडीने भरण्याची जनतेतून होत असलेली मागणी, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन**

वसई विरार शहर महानगरपालिका या "क" वर्ग महानगरपालिकेची स्थापना दिनांक ०३.०७.२००९ रोजी झाली असून महानगरपालिकेच्या आस्थापनेचा आकृतीबंध व सेवाप्रवेश नियमांना सन २०१४ मध्ये शासन मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर मुख्य अग्निशमन अधिकाऱ्याचे १ पद श्रेणी-१ मध्ये मंजूर असून सदरचे पद नामनिर्देशन/ पदोन्नती / प्रतिनियुक्तीद्वारे भरण्याची तरतुद उपलब्ध आहे. उपरोक्त पद भरती संदर्भात महानगरपालिकेमार्फत आज़तागायत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, ही वस्तुस्थिती आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार अग्निशमन विभागाच्या उपमुख्य अग्निशमन अधिकारी या पदावर श्री. दिलीप पालव यांची दिनांक ०१.०१.२०१६ पासून नेमणूक करण्यात आली असून सद्यस्थितीत त्यांच्याकडे प्रभारी मुख्य अग्निशमन अधिकारी पदाचा कार्यभार देण्यात आला आहे.

सेटा H/1684 (750-2-24)  C.क्र. मा.प.

दरम्यान मुख्य अग्निशमन अधिकारी, वसई विरार शहर महानगरपालिका या पदावर शासनाने दिनांक १५.१२.२०२२ रोजीच्या आदेशान्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलातील सहाय्यक विभागीय अग्निशमन अधिकारी यांची प्रतिनियुक्तीद्वारे पदस्थापना केली होती. तद्नुसार संबंधित अधिकारी यांच्या कार्यमुक्तीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून विविध अटी व शर्ती कळविण्यात आल्या आहेत. तथापि, सदरचे आदेश दिनांक ०४.०८.२०२३ रोजी शासनाने रद्द केले आहेत.

दिनांक २३.०४.२०२१ रोजी विजय वल्लभ रुग्णालयाच्या आय.सी.यू. विभागात शॉर्ट सर्किटमुळे झालेल्या आगीच्या दुर्घटनेत १५ रुग्णांचा होरपळून मृत्यू झाला आहे, ही वस्तुस्थिती आहे. वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील नोंदणीकृत रुग्णालयांपैकी ३०८ रूग्णालयाचे फायर ऑडिट केले असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे. तसेच सदर रुग्णालयामध्ये आग प्रतिबंधक व जीव संरक्षण उपाययोजना धोरणानुसार अत्यावश्यक यंत्रणा उपलब्ध आहेत.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर अग्निशमन विभागात २२६ पदे विविध संवर्गात शासनाने मंजूर केली असून त्यापैकी २१९ पदे सद्यस्थितीत रिक्त असल्याने या विभागाचे दैनंदिन कामकाज ठेक्याद्वारे नियुक्त कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत आहे. मागील ५ वर्षाच्या आगीच्या वर्दीच्या तपशिलानुसार वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात सन २०२१-२२ मध्ये २० व सन २०२२-२३ मध्ये १७ वर्दींची नोंद झाली आहे.

वसई विरार शहर क्षेत्रातील आगीच्या दुर्घटना व त्यामुळे जिवितास होणारा धोका विचारात घेता महानगरपालिकेकडून आग प्रतिबंधक उपाययोजना करणेबाबत सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत. महानगरपालिकेकडे दाखल होणाऱ्या विकास प्रस्तावांतर्गत अग्निशमन यंत्रणा विषयक सर्व प्रचलित अटी व शर्ती पूर्ण केल्याची खातरजमा करुन तद्नंतरच परवानगी प्रदान करण्यात येत आहे. तसेच विकासकास सदर यंत्रणा सदैव तत्पर व कार्यान्वित ठेवण्याकरीता आवश्यक त्या सूचना देण्यात येतात. तसेच महानगरपालिका क्षेत्रातील विविध स्वरुपाच्या व्यवसायिक आस्थापनेकडील आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अनुषंगाने सर्व यंत्रणेची नियमितपणे तपासणी करण्यात येते.

श्री.दिलीप पालव, प्रभारी मुख्य अग्निशमन अधिकारी यांच्या संदर्भात महानगरपालिकेच्या स्तरावर प्राप्त झालेल्या विविध तक्रारींच्या अनुषंगाने त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित केली असून सद्यस्थितीत चौकशीची कार्यवाही सुरू असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

*******

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे तिसरे हिवाळी) अधिवेशन**

**श्री. रोहित पवार, श्री. अनिल देशमुख, श्री. सुनिल प्रभू, श्री. राजकुमार पटेल, श्री. विजय वडेट्टीवार, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. प्रमोद पाटील, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. अमीन पटेल, श्री. विकास ठाकरे, श्री. सुनिल केदार, श्री. अबू आजमी, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१००१ पुढील प्रमाणे आहे.-**

"राज्यात महिला अत्याचाराची प्रकरणे वाढत असणे, दिनांक १५ नोव्हेंबर २०२३ रोजी अकोल्यात एका गावगुंडाने १४ वर्षीय मुलीला सिगारेटचे चटके देत तिच्यावर बलात्कार करणे, दिनांक १८ सप्टेंबर २०२३ रोजी मुंबईत दोन इसमांनी एका १४ वर्षीय मुलीवर धावत्या टॅक्सीत बलात्कार करणे, दिनांक १८ जून २०२३ रोजी एका २० वर्षीय तरुणीवर धावत्या लोकलमध्ये महिलांच्या डब्यात चढून बलात्कार केला जाणे, अशाप्रकारे सार्वजनिक ठिकाणी देखील महिला असुरक्षित असणे, राज्यातील शहरे दिवसेंदिवस महिलांसाठी असुरक्षित असणे, माहे जानेवारी २०२३ ते ऑगस्ट २०२३ या कालावधीत मुंबईत विनयभंग आणि छेडछानीच्या १,२५४ तर बलात्काराच्या ५४९ घटना घडणे, याच कालावधीत पुण्यात विनयभंग आणि छेडछानीच्या ३६४ तर बलात्काराच्या १२४ घटना घडणे, नगपूरात विनयभंग आणि छेडछानीच्या ३०४ तर बलात्काराच्या १६५ घटना घडणे, एनसीआरबी (NCRB) च्या अहवालानुसार महिला अत्याचाराच्या बाबतीत महाराष्ट्र देशातील तिसऱ्या क्रमांकाचे राज्य असणे, राज्या तील महिला सायबर गुन्हेगारांच्या फसवणुकीला बळी पडत असणे, राज्यात नोंद होणाऱ्या सायबर गुन्ह्यांमध्ये १/३ गुन्हे हे महिलांच्या बाबतीत घडणे, राज्यात दररोज सरासरी एका महिलेसोबत सोशल मिडीयाद्वारे पाळत ठेवणे अथवा धमकावले जाण्याची घटना घडत असणे, त्यामुळे महिलांच्या सायबर सुरक्षेसाठी विशेष तरतुदी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन**

अकोला जिल्ह्यात पिडीत अल्पवयीन मुलीवर आरोपीनी केलेल्या अत्याचारा प्रकरणी पोलीस स्टेशन खदान जि, अकोला येथे गु.र.क्र. ६३५/२०२३, कलम ३६३, ३२३, ३२४, ३५४, ३५४(ब), ३७६, ३७६(२)(एन), ५०६ भा.द.वि. सह कलम ४, ८ बालकांचे लैंगीक संरक्षण अधिनियम, २०१२ अन्वये दि.१७.११.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी अटक असून, न्यायालयीन कोठडीत आहे.

मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावून पळवून नेवून अत्यचार केल्याप्रकरणी मलबार हिल पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.११७/२०२३, कलम ३६३, ३७६(१), २(Lz), ३, १०९, ११४, ३ भा.द.वि. सह ४, ८, ३(I), ५(ज्ञ), ६, १६, ७ पोक्सो अन्वये दि.१८.०९.२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्ह्यात दोन आरोपी अटक असून, मा. न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात आले आहे.

मुंबई येथील धावत्या लोकलमध्ये महिलांच्या डब्यात चढून २० वर्षीय तरुणीवर अत्याचार केल्याप्रकरणी सी.एस.एम.टी. रेल्वे पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.५३१/२०२३, कलम ३७६ (१), ३५४ (अ), ३५४ (ब), ३५४ (ड), ५०९, ३२३, ५०४ भा.द.वि. अन्वये दिनांक १४.०६.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी आरोपीस अटक करण्यात आली असून, मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.

क्राईम ईन इंडिया-२०२२ च्या प्रकाशित अहवालानुसार महिला अत्याचाराच्या बाबतीत (भा.द.वि. + विशेष स्थानिक गुन्हे) महाराष्ट्र राज्यात ४५,३३१ गुन्हे दाखल झाले आहे. देशात महाराष्ट्र राज्याचा दुसरा क्रमांक लागतो.

| अ.क्र. | राज्य | महिला अत्याचाराचे (भा.द.वि.+विशेष स्थानिक गुन्हे) गुन्हे |
|---|---|---|
| १. | उत्तरप्रदेश | ६५,७४३ |
| २. | महाराष्ट्र | ४५,३३१ |
| ३. | राजस्थान | ४५,०५८ |

प्रतिलक्ष लोकसंख्ये मागे गुन्ह्याचे प्रमाणानुसार (क्राईम रेट) महाराष्ट्र राज्य देशात १२ व्या क्रमांकावर आहे. प्रतिलक्ष लोकसंख्येमध्ये गुन्ह्यांचे हे प्रमाण ७५.१ इतके आहे.

सायबर गुन्हेगारीशी संबंधित नोंद गुन्हे सन २०२२ मध्ये एकूण ८,२४४ गुन्ह्यांची नोंद झाली असून त्यापैकी १६३६ (१९.८४%) गुन्हे महिलांबाबत घडले आहेत. तसेच माहे ऑक्टोंबर, २०२३ पर्यंत ६,९६१ सायबर गुन्ह्यांची नोंद झाली असून त्यापैकी १४६७ (२१%) गुन्हे महिलांबाबत घडले आहेत.

महिला अत्याचारास प्रतिबंध करण्यासाठी केलेल्या उपाययोजना खालीलप्रमाणे आहेत.

१) राज्यात महिला व बालकांच्या अनैतिक मानवी वाहतुकीस प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने एकूण ४५ अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षांची स्थापना करण्यात आली आहे.

२) हरविलेल्या बालकांना शोधण्यासाठी ऑपरेशन मुस्कान राबविण्यात येते.

३) राज्यात महिला व बालकांच्या सुरक्षतेसाठी निर्भया पथकाची स्थापना करण्यात आली आहे. मुंबई महिला सुरक्षितता पुढाकार योजनेंतर्गत महिला सुरक्षितेच्या दृष्टीने उपाय योजना करण्याच्या अनुषंगाने २५२ कोटी रुपये खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

४) महिला व मुली यावरील अत्याचारास प्रतिबंध करण्याकरीता पोलीसांची गस्त वाढविणे, पोलीस काका, पोलीस दीदी या उपाययोजना करण्यात येत आहेत.

५) राज्यात सर्व पोलीस ठाणे स्तरावर महिला मदत कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

६) राज्यात २० पोक्सो व १२ जलदगती न्यायालय स्थापन करण्यात आले आहेत.

७) बलात्कार व ॲसिड हल्यातील पिडीत व्यक्तींना १० लाखापर्यंत मदत दिली जाते.

८) महिला हेल्पलाईन क्र. १०३, १०९१, ११२ कार्यरत असून त्याद्वारे महिलांना २४*७ मदत देण्यात येते.

महिला अत्याचाराबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झाल्यास त्याबाबत तांत्रिक तपास करण्यासाठी महाराष्ट्र सायबर कार्यालयात CCPWC लॅबची स्थापना करण्यात आली आहे. सदर लॅबमध्ये महाराष्ट्रातील अधिकारी व अंमलदारांना प्रशिक्षण देण्यात येते. सन २०१९ पासून महाराष्ट्र सायबर यांनी महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यातील पोलीसांच्या सहभागाने "सायबर सेफ वुमन" ही मोहिम सुरु केली आहे. त्यामध्ये इंटरनेट वरील फिर्शींग, वैवाहीक विषयक साईट वरील ओळख चोरी, फोटो मधील फेरबदल, बँका संदार्भातील फसवणूक, पोर्नोग्राफी, सायबर बुलिंग याची माहिती देणारे संकेतस्थळे यांची माहिती या पासून प्रतिबंधात्मक उपाय, सायबर गुन्हा संदर्भातील कायदे तसेच सोशलमिडिया वापरतांना घ्यावयाची काळजी याबाबत प्रत्येक जिल्ह्यांत कार्यशाळा राबविण्यात येतात. महाराष्ट्र सायबर कार्यालयात CCPWC पोर्टल कार्यरत असून त्यावर राज्यभरातील महिला ऑनलाईन तक्रार दाखल करु शकतात. सदर तक्रार दाखल केल्यानंतर महाराष्ट्र सायबरकडून तात्काळ संबंधित जिल्ह्यांना तक्रार पाठविण्यात येते व त्याबाबत वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येतो.

---

लक्षवेधी सुचना गृह विभाग/पोल-७

## सन २०२३ चे हिवाळी तिसरे अधिवेशन

मा.श्री. सुनिल कांबळे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १४१९ पुढीलप्रमाणे आहे :-

पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघातील सोमवार पेठ आणि भवानी पेठ येथील पोलीस लाईन ची उभारणी सन १९२० साली झालेली असून आज त्याठिकाणी असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांची अत्यंत दुरावस्था झालेली असणे, सदर ठिकाणी पाण्याची लाईन ड्रेनेज आणि लाईट इत्यादी गोष्टींसाठी पोलिस कर्मचाऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, सदर ठिकाणी राहणारे पोलीस कुटुंबीय या सर्व गोष्टीची दुरुस्ती व्हावी म्हणून कित्येक वर्षापासून मागणी करीत असणे, यासाठी भवानी पेठ पोलीस लाईन मधील इमारतीच्या दुरुस्तीसाठी व पाणी ड्रेनेज लाईट इत्यादी विषयांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, त्याचप्रमाणे सदर इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करून या इमारती धोकादायक झालेल्या असतील तर नव्याने इमारतीची उभारणी करण्याची आवश्यकता, यावर याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया ?""

### मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

पोलीस आयुक्त, पुणे शहर आस्थापनेवरील सोमवारपेठ व भवानीपेठ पोलीस वसाहतीमधील निवासस्थानाचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे,

| वसाहत | पोलीस अंमलदार | | पोलीस अधिकारी | |
|---|---|---|---|---|
| पद | तपशिल | संख्या | तपशिल | संख्या |
| सोमवार पेठ | ७ बैठया चाळी | ७० | ३ बंगले | ०३ |
| | ४ इमारती | १२८ | २ इमारती | २४ |
| | ४ इमारती | १२८ | १ इमारती | ०६ |
| | | | २ इमारती | २४ |
| भवानी पेठ | १ इमारत | १९ | | |
| | २ इमारती | १०८ | | |

सदर पोलीस वसाहतींमधील निवासस्थानांच्या दुरुस्तीसाठी सन २०१७-२०१८ मध्ये प्राप्त झालेल्या सुमारे रुपये १६८ लाख निधीतून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पाणीपुरवठा व ड्रेनेज लाईनसह आवश्यक ती दुरुस्तीकामे करुन घेण्यात आलेली आहेत. तसेच पोलीस आयुक्त, पुणे शहर या कार्यालयाने सदर वसाहतीमध्ये करावयाच्या ड्रेनेज लाईन, पाणीपुरवठ लाईन, जलरोधिकरण, दरवाजे, खिडक्या छत व रंगकाम इ. दुरुस्ती कामांसाठी रु.९,१७,११,७३२/- (अक्षरी रुपये नऊ कोटी सतरा लाख अकरा हजार सातशे बत्तीस फक्त) इतकी रक्कम उपलब्ध करुन देण्याकरीता पोलीस महासंचालक कार्यालयास प्रस्ताव पाठविला आहे. निधी उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. सदर पोलीस वसाहतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन घेण्यासाठी, सार्वजनिक बांधकाम विभागास पोलीस आयुक्त, पुणे शहर कार्यालयाने कळविले आहे.

पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या आस्थापनेवर शिवाजीनगर व बॉडीगेट पोलीस वसातीमध्ये एकूण २८८० निवासस्थानांची आवश्यकता असल्याचे पोलीस महासंचालक यांना कळविले आहे. शिवाजीनगर येथील नियोजीत ८४० पैकी १६८ निवासस्थानांचे बांधकाम खाजगी व्यक्तींकडून करुन घेण्यात आले आहे. उर्वरीत ६७२ निवासस्थान बांधकामासाठी महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळास कळविण्यात आले, असून त्यांच्याकडून पुढील कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

गृह विभाग

लक्षवेधी सूचना क्र. २२९६

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे तृतीय अधिवेशन

**ॲड. राहुल ढिकले, मा. वि.स.स., यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २२९६ पुढीलप्रमाणे आहे :-**

"महाराष्ट्रात धार्मिक तणावाच्या घटनासमोर येत असताना दिनांक ११ जून, २०२३ रोजी व त्यासुमारास मालेगाव येथे अंदाजे ११/०० वाजेपासून ते दुपारी ०१/०० वा. मालेगाव येथील एम. एस. जी कॉलेज, कॉन्फरन्स हॉलकॅम्प रोड येथे हिंदू मुलांचा धर्मातराचा प्रकार उघडकीस येणे, संबंधित कार्यक्रमात हिंदू विद्यार्थ्यांची संख्या जास्त असतांना कार्यक्रमाची सुरूवात एका छोटया इस्लामिक प्रार्थनेने करण्यात येणे, सदर कार्यक्रमात करिअर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन केलेले असणे, सदर कार्यक्रमात उपस्थित दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना आर्मी, नेव्ही, एअर फोर्स भरती, अभ्यासक्रम आदीसंदर्भात माहिती देण्याचे सोडून नमाज पठन करणे, नमाज पठन केल्यामुळे मन प्रसन्न होऊन अभ्यास करण्यास उर्जा निर्माण होते, अभ्यास करण्यासाठी व इतर कामांसाठी दिवसभरात खूप वेळ देता येतो त्यामुळे नमाज पठणाचे वेगवेगळे फायदे मिळत राहतात अशी माहिती विद्यार्थ्यांना देण्यात येणे, तसेच एकंदरीत हिंदू धर्माविषयी तुलना करून ईस्लाम धर्म कसा चांगला आहे याबाबत माहिती देणे, कार्यक्रम संपतेवेळी मोठ्या संख्येने विविध हिंदुत्वादी संघटनांच्या कार्यकत्यांनी हॉलमध्ये घुसणे आणि धर्मांतराचा प्रकार उघडकीस आणणे, तसेच कार्यक्रमात पुण्यातील डिफेंस करियर इंस्टीट्यूटचे अनीस कुट्टी यांना कॉलेजमध्ये निमंत्रीत केलेले असणे आणि त्यांनी सर्व माहिती उपस्थित विद्यार्थ्यांना देण, मात्र अद्याप सदरील संस्थेवर पोलिसांनी कोणत्याही प्रकारची कारवाही न करणे, सदर घटनेसंदर्भात केंद्रीय बाल हक्क आयोगाने दखल घेणे आणि आयोगाने नाशिक जिल्हाधिका-यांना नोटीस देणे, त्यानंतर देखील अनिस कुट्टी याच्या संस्थेवर ठोस अशी कारवाई न होणे, महाराष्ट्रासह मालेगाव शहरातील नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण होणे, त्यानंतर दिनांक २ जुलै, २०२३ रोजी मोठ्या संख्येने सकल हिंदू समाजाचा हिंदू जन आक्रोश मोर्चा मालेगावात निघणे आणि तरीसुद्धा मुख्य आरोपी अनिस कुट्टी याला अटक न होणे, याप्रकरणाचा राज्यभरातील नागरिक व लोकप्रतिनिधीकडून घडलेल्या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**************************************************************************

## मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

महाराजा सयाजीराव गायकवाड कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मालेगाव येथे प्रोफेट मोहमद ग्रुप व सत्यमलीक लोकसेवा ग्रुप मालेगाव यांच्या वतीने ईस्लाम धर्माविषयी माहिती देऊन मस्जिद मध्ये शिक्षणासाठी येवून त्यांना आर्थिक आमिष दाखवून हिंदू धर्म व मुस्लिम धर्मात तुलना करुन मुस्लिम धर्म कसा श्रेष्ठ आहे हे सांगितले त्यामुळे हिंदू व मुस्लीम धर्म यांचेत तेढ निर्माण करुन तसेच हिंदू धर्मीयांच्या

धार्मीक भावना दुखावल्या म्हणून फिर्यादिने दिलेल्या तक्रारीवरुन मालेगाव कॅम्प पो.स्टे. नाशिक ग्रामीण येथे CCTNS गुरनं. १११/२०२३ भा.द.वि. कलम-१५३ अ, २९५अ, २९८, ३४ प्रमाणे गुन्हा दि. १२/०६/२०२३ रोजी ००.५५ वाजता दाखल करण्यात आला आहे. नाशिक ग्रामीण घटकात मालेगाव कॅम्प पोलीस ठाणे हद्दीत दि. ११/०६/२०२३ रोजी १२.३० वाजायच्या सुमारास महाराजा सयाजीराव गायकवाड कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मालेगाव येथे काही मुस्लीम मौलाना हे विद्यालयातील NCC विद्यार्थी विद्यार्थीनी यांना मुस्लीम धर्म प्रसारणाचे धडे शिकवत आहेत व सदरचा कार्यक्रम हा हिंदू संघटनेच्या लोकांनी हाणून पाडला तसेच सदर ठिकाणी दोन गटांमध्ये गदारोळ झाल्याचे स्थानिक पोलीसांनी जाऊन खात्री केली असता, ही बाब खरी असल्याचे निदर्शनास आली. प्रभारी अधिकारी मालेगाव कॅम्प पोलीस ठाणे यांनी सदरची परिस्थिती हाताळून तेथील दोन्ही धर्माचे लोकांना समजावून सांगून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची दक्षता घेतली, तसेच, या ठिकाणी मुस्लीम धर्म प्रसारणासाठी आलेल्या लोकांना ताब्यात घेवून पोलीस ठाण्यामध्ये आणले, अपर पोलीस अधीक्षक मालेगाव यांनी व उपविभागीय पोलीस अधिकारी कॅम्प उपविभाग मालेगाव यांनी या ठिकाणी भेट देऊन परिस्थिती समजून घेवून सदरचा कार्यक्रम बंद करणाऱ्या हिंदू संघटनांचे कार्यकर्ते व कार्यक्रमास उपस्थित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना पोलीस ठाण्यात बोलावून या घटनेची माहिती घेतली. तसेच या प्रकरणामध्ये १५ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्यात सात वर्षापेक्षा कमी शिक्षा असल्याने त्यांना सी.आर.पी.सी. ४१(१) (अ) प्रमाणे नोटीस बजावणी केली. या प्रकरणात ४ आरोपींना अटक करण्यात आली असून सदर आरोपींना दि. १७/०६/२०२३ रोजी पोलीस कस्टडी रिमांड यादीसह मा. न्यायालयात हजर केले असता मा. न्यायालयाने दि. ३०/०६/२०२३ रोजी पावेतो न्यायालयीन कस्टडी रिमांड दिली होती. आरोपींना जामीनावर मुक्त करण्यात आले असून सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे.

-----****------

## लक्षवेधी सूचना क्र.६३२

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे तृतीय (हिवाळी अधिवेशन)

**श्री.विजय वडेटटीवार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना ६३२ पुढीलप्रमाणे आहे:-**

---

### लक्षवेधी सूचना

" मौ.शेज बाबुळगाव (ता.मोहोळ,जि.सोलापूर) येथे श्री.भाऊसाहेब पाटील यांनी काही स्थानिक राजकीय नेते व नोंदणी विभागाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या संगनमताने मूळ मालकाची जमीन बनावट कागदपत्रे तसेच खरेदी खताच्या आधारे स्वत:च्या नावावर करणे, सदर प्रकार संबंधित जमिनीचे मूळ मालक श्री.सुहास साळुंखे व श्री.विकास साळुंखे यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी मोहोळ तालुक्याचे नोंदणी दुय्यम निबंधक श्री.धनंजय गोरे, श्री.गोविंद गीते, सह जिल्हा निबंधक तसेच पोलीस निरीक्षक श्री.विनोद घुगे व सोलापूर जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेश पांडे यांच्याकडे तक्रार करणे, श्री.गोरे यांनी तात्काळ पोलीस फिर्याद देणे अपेक्षित असताना आरोपींच्या संगनमताने तक्रार दाखल करण्यास दिरंगाई करणे, सह जिल्हानिबंधक श्री.गीते यांनी तात्काळ गुन्हा दाखल करण्याचे आदेश देऊनही श्री.गोरे यांनी १ महिना इतक्या विलंबाने फिर्याद दाखल करणे, यामुळे आरोपी श्री.पाटील मूळ जमीन मालक श्री.साळुंखे यांना तक्रार मागे घेणे बाबत धमकी देणे, पोलिस तपास अधिकारी श्री.झाल्टे व दुय्यम निबंधक श्री.गोरे यांनी देखील तक्रारदारांवर दबाव टाकणे, तक्रारदार मराठवाडा भागातील रहिवासी असल्याने मोहोळ तालुक्यातील त्यांच्या मालकीची जमीन भविष्यात विकू देणार नाही अशी धमकी देणे, तक्रारदारावर तक्रार मागे घेण्यासाठी दबाव आणल्यामुळे दबावाला बळी पडून सदर जमिनीचे उलट खरेदी खत उरकण्यात येणे, याप्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधित दोषी प्रशासकीय अधिकारी व दुय्यम निबंधक श्री.गोरे यांच्यावर निलंबनाची कारवाई करुन मोहोळ पोलीस स्टेशन येथे दाखल फिर्यादीनुसार गुन्हा दाखल करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

### श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री(महसूल) यांचे निवेदन

मौ. शेज बाभुळगाव (ता. मोहोळ जि. सोलापूर) येथे श्री. भाऊसाहेब पाटील यांनी काही स्थानिक राजकीय नेते व नोंदणी विभागाच्या अधिकारी/कर्मचा-यांच्या संगनमताने मुळ मालकाची जमीन बनावट कागदपत्रे तसेच खरेदी खताच्या आधारे स्वत:च्या नावावर करणे अशी आशयाची तक्रार अर्जदार

श्री. विकास साळुंखे व सुहास साळुंखे यांनी दि. ०७/०९/२०२३ रोजीच्या लेखी अर्जान्वये सह जिल्हा निबंधक वर्ग-१, सोलापूर यांच्या कार्यालयात दाखल केली आहे. सदर तक्रारीमध्ये, दुय्यम निबंधक श्रेणी -१, मोहोळ कार्यालयातील नोंदविलेले दस्त क्र.३९५१/२०१३ व ३९५३/२०१३ या कुलमुख्यत्यारपत्राचे दस्ताबाबत त्यांचे ठिकाणी दुसरी व्यक्ती उभी करुन डुप्लीकेट कुलमुखत्यार केले असलेबाबत नमूद केले आहे.

तक्रारदार श्री. विकास साळुंखे व सुहास साळुंखे यांनी त्यांच्या दि.०७/०९/२०२३ रोजीचे तक्रार अर्जात नमूद मुद्यांचे अनुषंगाने श्री. डी. ए. गोरे, दुय्यम निबंधक श्रेणी -१, मोहोळ यांनी आवश्यक ती चौकशीची कार्यवाही करुन पोलीस निरीक्षक, मोहोळ पोलीस ठाणे यांना दि. १५/०९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये नोंदणी अधिनियम, १९०८ चे कलम ८२ अन्वये गुन्हा दाखल करणेबाबत कळविलेले आहे.

सह जिल्हा निबंधक वर्ग-१, सोलापूर यांनी दि.१२/१२/२०२३ रोजीचे पत्रान्वये श्री. डी. ए. गोरे, दुय्यम निबंधक श्रेणी-१, मोहोळ यांचा खुलासा सादर केला असून अर्जदार विकास साळुंखे व सुहास साळुंखे यांनी दि. २६/१०/२०२३ रोजी दुय्यम निबंधक श्रेणी-१, मोहोळ कार्यालयामध्ये समक्ष उपस्थित राहून खालीलप्रमाणे जवाब दिलेला असून आम्ही, सौ. अर्चना भाऊसाहेब पाटील व शितल भाऊसाहेब पाटील यांचय विरोधात गैरसमजूतीने अर्ज दिला असून सदरच्या तक्रार अर्जातील मजकूर ही गैरसमजूतीने दिला नोंदणीकृत कुलमुखत्यारपत्र दस्त क्रमांक ३९४९/१३, ३९५१/१३, ३९५३/१३ अन्वये ताबा, वहिवाट दिली आहे. त्याबाबत कोणत्याही प्रकारची दिवाणी व फौजदारी स्वरुपाची तक्रार नाही. तसेच सदरचे कुलमुखत्यारपत्रावरील सही, अंगठयाचा ठसा हा आमचाच असल्याने बनावट व्यक्ती उभी करुन खोटया सहया केल्याबाबतची तक्रार ही गैरसमजूतीने करण्यात आली असून सदर कुलमुखत्यारपत्रान्वये जमिनीचा ताबा वहिवाट पुर्णपणे आम्ही आमची आत्याची मुलगी सौ. अर्चना पाटील हिस दिलेला आहे. तसेच सदर कुलमुखत्यारपत्राबाबत डमी व्यक्ती उभी करुन दस्त नोंदविल्याबाबतची तक्रार गैरसमजूतीने केली असून अर्जदार श्री. विकास साळुंखे व सुहास साळुंखे यांनी याबाबत स्वत: हजर राहून दुय्यम निबंधकासमोर उपरोक्त प्रमाणे जबाब नोंदविला असून विषयांकित मिळकतीचा मोबदला श्री. विकास साळुंखे व सुहास साळुंखे यांना वेळोवेळी मिळालेला आहे. तसेच दस्त नोंदणीचे कामोज नोंदणी अधिनियमानुसार करण्यात आले असून कुलमुखत्यारपत्राबाबत श्री. विकास साळुंखे व सुहास साळुंखे यांनी दि. ०३/०५/२०२३ रोजी तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मोहोळ यांच्या समोर केलेले शपथपत्र प्राप्त झाले आहे. श्री. विकास साळुंखे व सुहास साळुंखे यांनी, दि. २६/१०/२०२३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला तक्रार अर्ज हा गैरसमजूतीने दिला तक्रार अर्ज निकाली काढण्याबाबत लेखी पत्र कार्यालयास सादर केले आहे.

त्यानुषंगाने तक्रारदार श्री. विकास साळुंखे व श्री. सुहास साळुंखे यांनी सह जिल्हा निबंधक वर्ग-१, सोलापूर कार्यालयाकडे केलेला तक्रार अर्ज हा गैरसमजूतीने दिला आहे. दरम्यानचे कालावधीमध्ये श्री. विकास साळुंखे व श्री. सुहास साळुंखे व गैरअर्जदार श्रीमती अर्चना पाटील यांनी दुय्यम निबंधक श्रेणी-१, मोहोळ कार्यालयामधील कामकाजाबाबत तसेच श्री. डी. ए. गोरे, दुय्यम निबंधक श्रेणी-१,मोहोळ यांचेबाबत कोणतीही लेखी अथवा तोंडी तक्रार या कार्यालयाकडे तसेच वरिष्ठ कार्यालयाकडे केलेली नाही. तसेच महसूल दप्तरी ७/१२ उतारा व फेर फार नोंद घेण्याचे कायदेशीर अधिकार नोंदणी विभागाच्या कार्यकक्षेत येत नाहीत. तसेच तक्रारदार व त्यांनी ज्यांच्या विरुध्द तक्रार केली आहे ते सर्व आपापसात एकमेकांचे पुर्वीपासूनच नातेवाईक आहेत. त्यामुळे दुय्यम निबंधक श्रेणी-१, मोहोळ कार्यालयाचा या प्रकरणाशी दुरान्वये कोणताही संबध येत नाही तसेच सदर प्रकरणी कोणताही राजकीय हस्तक्षेप झालेला नाही. तसेच श्री. डी.ए गोरे यांनी तक्रारदारावर दबाव टाकल्याबाबतची कोणताही सबळ पुरावा अद्यापपावतो सह जिल्हा निबंधक वर्ग-१, सोलापूर कार्यालयाकडे प्राप्त झालेला नाही.

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र, राज्य पुणे यांच्या प्राप्त अहवालाचे अवलोकन करता, सदर प्रकरणी शासन स्तरावर तपासणी करण्यात येत असून तपासणीअंती श्री. गोरे, दुय्यम निबंधक श्रेणी-१, मोहोळ तसेच प्रकरणातील अन्य संबधित दोषी आढळल्यास त्यांचेवर नियमानुसार उचित कारवाई करण्यात येईल.

****************************

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

**श्री. दिलीप लांडे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना**
**१८०० क्र.~~५७३३०~~८१ पुढीलप्रमाणे आहे :-**

"पुणे जिल्ह्यामधील भोर तालुका डोंगर पायथ्याशी वसलेले असून सदर ठिकाणी पर्जन्यमान हे तुलनेने अधिक असून, तसेच भौगोलिक रचना ही डोंगराला लागूनच आहे. विकासकांनी डोंगर-उतार फोडून/ उत्खनन करून राष्ट्रीय नैसर्गिक साधन संपत्तीचे नुकसान करून, सर्व शासकीय नियम पायदळी तुडवत, अनधिकृतपणे मोठ्या प्रमाणात रिसॉर्ट, हॉटेल्स व बंगले बांधण्यात आले आहेत. तसेच विकासकांनी डोंगर माथ्यावर व टेकडीच्या उतारावर बांधकामास परवानगी नसल्याचे न्यायालयाने दिलेल्या आदेशाची पायमल्ली झाली असून विकासकांनी शासनाच्या दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या आद्यदेशाला पूर्ण हरताळ फासला जाणे, त्यामुळे माळीण गाव सदृश दुर्घटना घडून जीवित व वित्तीय हानी होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे भोर तालुक्यातील अनेक गावांच्या सुरक्षतेचा प्रश्न एरणीवर आला असणे, हे संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना दिसत नसणे सदर दोन्ही तालुक्यातील भविष्यात काही दुर्घटना घडल्यास त्याला जिल्हाधिकारी व शासन जबाबदार राहिले असून, तरी याची चौकशी करून सर्व शासकीय नियम धाब्यावर बसवुन अनधिकृतपणे बांधलेल्या रिसॉर्ट, हॉटेल्स, बंगले यांचे करीत असलेल्या बांधकामावर स्थगिती आदेश देण्यात यावेत आणि विकासकावर कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी या लक्षवेधी मार्फत मी शासनाचे लक्ष वेधीत आहे यावर शासनाने तातडीने केलेली व करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

भोर तालुका हा पुणे जिल्हयातील पश्चिमेकडील सहयाद्री पर्वत रांगामध्ये वसलेला तालुका असून तालुक्याचे सरासरी पर्जन्यमान १०५० मी.मी. एवढे आहे. भोर तालुक्यामध्ये एकूण २०० महसूली गावे असून नगर विकास विभाग, अधिसूचना क्र.टीपीएस/१८१५/प्र.क्र.३१३/१५/नवि-१३, दि.१०/०२/२०१६ नुसार तालुक्यातील पूर्वेकडील ५३ गावांचा समावेश पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामध्ये (PMRDA) करण्यात आलेला आहे. सदर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामध्ये समाविष्ट झालेल्या एकूण ५३ गावांमध्ये बांधकाम परवाना व रेखांकन मंजूरी ही सदर प्राधिकरणामार्फत होत असून महसूल विभागाकडून केवळ सदर मान्यता प्राप्त झाल्यानंतर अकृषिक आदेश पारित करणेत येतो. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामध्ये समाविष्ट असणाऱ्या क्षेत्रामधील झालेल्या अनाधिकृत बांधकामाबाबत त्यांचेकडून कार्यवाही करण्यात येते.

भोर तालुक्यातील सर्व गावातील अनाधिकृत बांधकामे (५३ गावे वगळून) तसेच सर्व २०० गावांमधील अनाधिकृत उत्खननाबाबत तपासणी करुन कार्यवाही करण्यासाठी तहसिलदार, भोर यांनी दि.२१/०२/२०२२, दि.०२/०३/२०२२, दि.२७/१२/२०२२, दि.३०/१२/२०२२, दि.३०/०४/२०२३, दि.१६/०८/२०२३ इत्यादी पत्रान्वये सर्व मंडळ अधिकारी व तलाठी यांना सुचित केले आहे. त्यानुसार भोर तालुक्यात सन २०२१ ते २०२३ अखेर अनाधिकृत बांधकामांच्या ७१ प्रकरणांमध्ये रुपये ५,६१,७८५/- इतक्या

रकमेच्या दंडाचे आदेश पारित केलेले आहेत. तसेच अनाधिकृत उत्खनन प्रकरणी २०२१ ते २०२३ अखेर एकुण १५ प्रकरणांमध्ये रुपये ९६,८२,९२५/- इतक्या रकमेच्या दंडाचे आदेश पारित केलेले आहेत. तसेच अनाधिकृत उत्खननाच्या २७ प्रकरणांमध्ये सुनावणी सुरु आहे. सन २०२१-२०२३ अखेर रु. २,४१,७६,५१०/- इतके स्वामित्वधन भरुन घेतले आहे.

दि.१४/११/२०१७ चा शासन निर्णय नगर विकास विभागाकडून निर्गमीत करण्यात आला असून हा शासन निर्णय दि.१४/०७/२०२० च्या आदेशान्वये मा. सर्वोच्च न्यायालयाने रद्द केला आहे. नगर विकास विभागाच्या दि.११/१२/२०१८ रोजीच्या अधिसुचनेनुसार पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासाठी सुधारीत नियमावली मंजुर केली आहे. या नियमावलीतील नियम क्र.१३ नुसार १:५ पेक्षा तीव्र उतारावर बांधकाम अनुज्ञेय नाही. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना नियम, १९६६ च्या कलम ५३(अ) अन्वये अनाधिकृत बांधकाम निर्मुलन विभागामार्फत एकुण ६८ नोटीसा दिलेल्या आहेत. यामध्ये एक निष्कासन व एक गुन्हा दाखल केला आहे.

विधानसभा सदस्य श्री. दिलीप लांडे यांनी मौजे तांभाड, ता.भोर, जि.पुणे येथील उत्खननाबाबत यापुर्वी दि.१८/०२/२०२२ रोजी लक्षवेधी सुचना उपस्थित केली होती. याठिकाणी रस्त्याच्या कामासाठी ४० ब्रास व १०० ब्रास परवानगीपेक्षा जादा उत्खनन केल्याचे आढळुन आले आहे. त्यासाठी रुपये २,०३,६००/- इतके दंड संबंधितांकडून वसूल करण्यात आला असून उर्वरित रुपये ५,०९,०००/- इतका दंड वसूलीची संबंधितांना नोटीस देण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४५ नुसार अनाधिकृत बांधकामधारकांना अनाधिकृत बांधकामे काढून टाकणेबाबत नोटीस देण्यात आल्या आहेत. या नोटीसींना मा. दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर यांनी स्थगिती दिली आहे. मा. न्यायालयाच्या प्रस्तुत निर्णयाविरुद्ध मा. जिल्हा न्यायालय, पुणे येथे अपिल करण्यात आले आहे.

पुणे महानगर विकास प्राधिकरण हद्दीतील अनाधिकृत बांधकामाबाबत त्यांना लेखी स्वरुपात अवगत करण्यात आले आहे. याशिवाय कार्यकारी अभियंता, भाटघर धरण शाखा यांना भाटघर जलाशयालगत धरण क्षेत्राच्या हद्दीलगत काही अनाधिकृत हॉटेल व रिसॉर्टची बांधकामे झाली असल्यास नैसर्गिक आपत्तीच्या दृष्टीकोणातून त्यावर नियमानुसार कार्यवाही करणेबाबत दि.२४/०८/२०२२ रोजी कळविण्यात आले आहे.

भोर तालुक्यात होणाऱ्या अनाधिकृत बांधकाम व अनाधिकृत उत्खनन या बाबत तपासणी करणेकामी वेळोवेळी पथके तयार करुन क्षेत्रिय स्तरावर तपासणी करुन दंडात्मक कारवाईचे आदेश पारित केलेले आहेत. तसेच संबंधित विकास प्राधिकरण, शासकीय विभाग व स्थानिक स्वराज्य यांना त्यांच्या हद्दीमध्ये होणारी अनाधिकृत बांधकामे थांबविण्याबाबत तसेच उचित कार्यवाही करण्याबाबत अलाहिदा कळविले आहे.

*****

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२३ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन**

श्री. मदन येरावार व श्री. नामदेव ससाणे, वि.स.स, यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२०४९ खालीलप्रमाणे आहे:-

"गर्व्हनर व बेरार यांनी ०७ मे १९४२ रोजी उमरी ता. केळापुर जि. यवतमाळ येथील स.नं. ३३ मधील १४ एकर ३१ गुंठे जमीन फ्रि मेथेडीस्ट मिशन उमरी यांना टी.बी. हॉस्पीटलसाठी लिजवर देणे, स.नं. ३७ मधील १३ एकर १० गुंठे जमीन शाळा व होस्टेलचे बांधकामासाठी दिलेली असणे, स.नं. ३८ मधील ५ एकर २५ गुंठे जागा तलावासाठी दिलेली असणे, टी. बी. हॉस्पीटल बंद पडल्यानंतर परवानगी न घेता इंग्लीश मेडीअम स्कुल सुरू असणे, वापराचा मुळ उद्देश बदलल्यामूळे SDO केळापुर यांचेकडे प्रकरण दाखल करणे, शर्त भंग झाल्याने SDO यांनी जमीन शासन जमा करणेबाबत आदेश पारीत करणे, जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी SDO केळापुर यांचा आदेश कायम ठेवने, तसेच मा. उच्च न्यायालय यांचे आदेशावर जिल्हाधिकारी यांनी २१-१२-२०२२ ला आदेश पारीत करुन अपीलार्थी संस्थेचा अर्ज फेटाळने व संस्थेकडे टी. बी. हॉस्पीटल, तलाव, शाळा होस्टेल करीता अर्जीत जमीनीचा वापर त्याच प्रयोजनाकरीता करण्यात आला नसल्याने न्यायालयाने जमीन शासन जमा करणेचा आदेश दिला असतानाही प्रशासनाने कोणतीही कारवाई केलेले नसणे, काही अधिकाऱ्यांनी पैशांची देवाणघेवाण केल्याचीबाब निदर्शनात येणे, यासंदर्भात चौकशी लावण्याची मागणी होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

**मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

स्वातंत्रपुर्व काळात मध्य प्रांताचे तत्कालिन गव्हर्नर व बेरार यांनी दि.७ मे १९४२ च्या आदेशान्वये मौजा उमरी ता. केळापुर जि. यवतमाळ येथील स.क्र.३३, सी क्लास मधील ४१ एकर ३१ गुंठे जमीन फ्री मेथेडीस्ट मिशन, उमरी यांना टि.बी. हॉस्पिटलसाठी मंजुर करण्यात आली होती. सदर संस्थेने सन १९५० पर्यंत त्या जागेवर टि.बी. हॉस्पिटलचे बांधकाम केले नसल्याने शासन मेमोरन्डम दि. १४ मार्च १९५० नुसार सदर संस्थेस टि.बी. हॉस्पिटल बांधकामाकरीता ३ वर्षांची वाढीव मुदत देण्यात आली व ४१ एकर ३१ गुंठे जमिनीपैकी २२ एकर १७ गुंठे जागा टि.बी हॉस्पिटलकरीता, ५ एकर २५ गुंठे जागा तलावाकरीता व १३ एकर १० गुंठे जागा शाळा व वस्तीगृह बांधकामाकरीता अनुज्ञेय करण्यात आली.

टि.बी. हॉस्पिटल, बांधकामाकरीता सदर संस्थेस शासनाकडुन मंजुर करण्यात आलेल्या जागेत संस्थेमार्फत हॉस्पिटलची इमारत बांधण्यात आली. सदर हॉस्पिटल २५ वर्षे सुरु होते नंतर ते बंद पडले. त्यानंतर टि.बी. हॉस्पिटल च्या जागेवर सदर संस्थेने शासनाच्या मान्यतेशिवाय डॉ. यार्डी इंग्लीश मिडीयम स्कुल, उमरी ही इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु केली. फ्री मेथेडीस्ट मिशन, उमरी यांनी नावात बदल करण्याबाबतचा दस्त सादर केल्यानंतर कोणत्याही परवानगीशिवाय तलाठी, उमरी, ता. केळापूर, यांनी फेरफार क्र.२१२ दि.२०.०९.२००४ नुसार सदर शासकीय जागा ईटाणी ई वेनजीकल ट्रस्ट या संस्थेच्या नावाने केली आहे.

दिनांक ०२.०४.२०१५ रोजी श्री. विलास राजेश्वर आत्राम यांनी शेत स.नं. ३७ ते ४० ही जमीन फ्री मेथडीक्स मिशन, उमरी रोड यांनी लिज मधील अटी व्र शर्तीचे उल्लंघन केल्यामुळे शासन जमा करण्याबाबत जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेकडे तक्रार अर्ज दिला. सदर तक्रारीवर निर्णय घेण्याकरीता उपविभागीय अधिकारी, केळापुर यांचेकडे मुळ तक्रार वर्ग करण्यात आली. त्यानुसार उपविभागीय अधिकारी, केळापुर यांनी दिनांक १५.०९.२०१७ रोजी विस्तृत चौकशी करुन मुळ/जुना स.नं. ३३ चे विभाजन होऊन स. नं. ३८, आता गट नं. १०१ क्षेत्र ७.०७ हे. आर. जागा टि. बी. हॉस्पिटलकरीता, स. नं. ४०, आता गट नं. १०२ क्षेत्र २.२८ हे. आर. जागा तलावाकरीता, स. नं.३७, आता गट नं. १०४ क्षेत्र २.२९ हे. आर. जागा शाळेकरीता व स. नं.३५ आता गट नं. १०५ क्षेत्र ५.३६ हे. आर. शाळेकरीता असून संस्थेस देण्यात आलेल्या क्षेत्रा व्यतिरिक्त इतर क्षेत्र गट नं. १०६ क्षेत्र ५.७४ हे. आर. मधील जागा शासन जमा करण्याबाबत आदेश पारीत केले.

उपविभागीय अधिकारी, केळापूर यांचे ओदशाविरुध्द संस्थेने अपर जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेकडे अपील दाखल करण्यात आले. सदर प्रकरणात दिनांक २७.०७.२०१८ रोजी अपर जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी आदेश पारीत केला व उपविभागीय अधिकारी, केळापुर यांचा आदेश कायम ठेवण्यात आला. सदर आदेशाविरुध्द संस्थेने अपर आयुक्त, अमरावती यांचेकडे अपील दाखल केले. सदर प्रकरणी अपर आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांनी दिनांक २८.१०.२०२० रोजी आदेश पारीत करुन उपविभागीय अधिकारी, केळापुर व अपर जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचा आदेश रद्द करुन सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी नव्याने आदेश पारीत करावेत असे आदेश दिले.

अपर आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांच्या उपरोक्त आदेशाविरुध्द श्री.विलास राजेश्वर आत्राम यांनी मा.उच्च न्यायालय,नागपुर येथे रिट याचीका ३१३५/२०२१ दाखल केली.सदर प्रकरणात मा.न्यायालयाने दिनांक ०६.०९.२०२१ रोजी आदेश पारीत केला व त्यानुसार जिल्हाधिकारी,यवतमाळ यांनी न्यायालयाचे आदेशाच्या दिनांकापासुन ३ महिन्याच्या आत आदेश पारीत करावा असे निर्देशीत केले. यानुसार **जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी**

**दिनांक १९/१२/२०२२ रोजी अंतीम आदेश पारीत केला** असून फ्री मेथेडीस्ट मिशन, उमरी या संस्थेस **लिजवर वाटप केलेल्या जागेच्या वापरात बदल केल्याप्रकरणी / शर्तभंग झाल्यावरुन** स. नं. ३८ आता **गट नं. १०१**, ७.०७ हे. आर. क्षेत्र,स. नं. ४० आता **गट नं. १०२**, २.२८ हे. आर. क्षेत्र, स. नं.३७ आता **गट नं. १०४**, २.२९ हे. आर. क्षेत्र व स. नं.३५ आता **गट नं. १०५**, ५.३६ हे. आर. **क्षेत्र शासन जमा करणेबाबत आदेश पारीत करण्यात आले. त्यानुसार फेरफार क्रमांक ७९७ नुसार विषयांकित जागा शासन जमा करण्यात आलेली आहे.**

सदर आदेशाविरुध्द संस्थेने विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचेकडे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम,१९६६ मधील कलम २५७ अन्वये पुनरीक्षण अर्ज अपील दाखल केला आहे. सदर प्रकरणी विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचेकडे सुनावणी होऊन जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी पारीत केलेल्या दि. १९/१२/२०२२ च्या आदेशास विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांनी दि. २६/१२/२०२३ पर्यंत स्थगिती दिलेली असून प्रकरणाची पुढील सुनावणी दि. २६/१२/२०२३ रोजी ठेवण्यात आलेली आहे.

************

लक्षवेधी सुचना क्र.२१४०.

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन-२०२३ चे (हिवाळी) अधिवेशन**

**श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२१४० पुढीलप्रमाणे आहे :-**

" ठाणे जिल्हयातील भुमि अभिलेख विभागात अनेक मिळकत पत्रीकांसह चुकीच्या पद्धतीने चौकशी नोंद करून सातबाऱ्यावरील भोगवटदार व कुळखातेदारांची खातरजमा न करता मिळकतपत्रीका घडवण्यात येणे, मौजे-नारपोली येथील मिळकतपत्रीका क्रमांक ८२०५ ते ८०३२ व ८४५२ ते ८४५४ तथा ७९२८ ते ८२३७ अश्या मिळकतपत्रींका घडवत असतांना जुने १९७० पासूनचे सातबाऱ्याची खातरजमा न करता चुकीच्या पद्धतीने भूमापन करण्यात येणे, मुळ खातेदाराची खातरजमा न करता त्याठिकाणी मिळकतपत्रीका घडवण्यात येणे, काळूराम पांडुरंग धापसी यांच्या पुर्वजांवरून तिन्हाईत व्यक्तीच्या झालेल्या चुकीच्या नोंदीमुळे अनियमिततेमुळे पुर्नविलोकन करण्याची आवश्याकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

मौजे नारपोली ता. भिवंडी जि. ठाणे येथे सन १९८६ साली नगर भूमापन कार्यवाही परिरक्षणार्थ लागू करण्यात आली आहे. तसेच तत्कालिन नगर भूमापन चौकशी अधिकारी यांनी मिळकत न.भू.क्र.८२०५ ते ८०३२, न.भू.क्र.८४५२ ते ८४५४ आणि न.भू.क्र. ७९२८ ते ८२३७ (एकूण विषयांकित मिळकती-३१३) यांचेबाबत महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २० (२) अन्वये प्रत्यक्ष जागेवरील स्थानिक व रितसर चौकशीअंती मालकी हक्काबाबतचे निर्णय घोषित करण्यात आलेले आहेत. त्याचबरोबर उक्त मिळकतीपैकी वेळोवेळी प्राप्त नामांतरण प्रकरणांच्या अनुषंगाने फेरफार घेण्यात आले आहेत.

मौजे नारपोली ता. भिवंडी, जि. ठाणे येथील स.नं.११६ पैकी ८८, ८९, ९० पैकी क्षेत्रामध्ये न.भु.क्र.७२४८ ते ७५१३ व ८२३८ ते ८२५४ अ या मिळकत पत्रिका उघडून चंद्रया गोपाळ डुकले यांचे नाव उडवून टाकले असल्याने सदरची प्रक्रिया त्यांना मान्य नसल्याचे उपरोक्त सर्व्हे नंबरमध्ये कलम ३६ च्या परवानगीचे पुर्नविलोकन होऊन आदिवासी मिळकत चंद्रया गोपाळ डुकले (मयत) यांचे मा.दिवाणी न्यायालयाने घोषीत केलेले हेअरशिप सर्टीफिकेट चे आधारे वारस म्हणून नाव दाखल करणेबाबत श्री. काळुराम पांडुरंग धापसी यांचे कुलमुख्यत्यार श्री. नागेश किसनराव निमकर यांनी दिनांक ४/१२/२०२३ रोजी तक्रार अर्ज सादर केला आहे.

सदर तक्रार अर्जात नमूद मिळकत न.भु.क्र.७२४८ ते ७५१३ व न.भू.क्र.८२३८ ते ८२५४ अ संदर्भात नगर भुमापन योजनेच्या मूळ चौकशीवेळी तत्कालीन चौकशी अधिकारी यांनी मालकी हक्काबाबत चौकशी करताना महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २० (२) अन्वये सर्व संबंधितांना जाहीरपणे नोटीस

देऊन धारक हक्काची चौकशी करण्यात आली आहे. तसेच चौकशी वेळी उपस्थित व्यक्ती यांचेकडून पुराव्याची कागदपत्रे ७/१२ उतारे, खरेदीखत तसेच जागेवरील वहीवाट याची खात्री करून मिळकत पत्रिका उघडण्यात आलेल्या आहेत.

विषयांकित मिळकतींबाबत महाराष्ट्र अनुसूचित जमातीच्या जमिनी प्रत्यर्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४ मधील तरतुदीनुसार तपासुन नियमानुसार कार्यवाही तहसिलदार, भिवंडी यांचेकडून करणेत येत आहे. विषयांकित मिळकतींबाबत तत्कालिन चौकशी अधिकारी यांनी घोषित केलेल्या निर्णयांचे बाबत हितसंबंधित धारक यांचा उक्त निर्णयांबाबत आक्षेप असल्यास पुराव्यांचे सबळ कागदपत्रांसह सदरच्या निर्णयाविरुद्ध विलंब माफीच्या अर्जासह संबंधित महसूल अधिकारी यांचेकडे रितसर अपिल दाखल करुन दाद मागणी करण्याचे प्रावधान महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ कलम-२४७ अंतर्गत उपलब्ध आहे. हे लक्षात घेता, हितसंबंधित धारक यांनी उक्त निर्णयांबाबत आक्षेप असल्यास पुराव्यांचे सबळ कागदपत्रांसह सदरच्या निर्णयाविरुद्ध विलंब माफीच्या अर्जासह संबंधित महसूल अधिकारी यांचेकडे रितसर अपिल दाखल केल्यास प्रकरण तपासून उचित निर्णय घेण्यात येईल.

**********

लक्षवेधी सूचना क्र.२१४२

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे तृतीय (हिवाळी अधिवेशन)

**श्री राजु(बाबा) जयवंतराव आवळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना २१४२ पुढीलप्रमाणे आहे:-**

---

**लक्षवेधी सूचना**

" ठाणे जिल्हा ग्रामीण नोंदणी विभागातील मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम कलम ५३ (अ) व कलम २८ प्रमाणे कारवाई करणेसाठी नोफिल पटेल या तक्रारदाराने दि. २७/११/२०२३ रोजी नोंदणी महानिरीक्षक तथा नोंदणी उपमहानिरीक्षक यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात येणे, सदर तक्रारीवरुन विभागाकडून कोणतीच कारवाई केली नसल्याने तक्रारदाराने व इतर नागरिकांनी अभय योजनेखाली त्यांचे दस्त अभिनिर्णित करणेसाठी कमी पडलेले मुद्रांक शुल्क भरणेसाठी वारंवार सांगणे, संबंधित विभागाकडून अभय योजनेखाली मुद्रांक शुल्क आकारुन तात्काळ नागरिकांना नोटिसीअंती माहिती देऊन मुद्रांक शुल्क भरुन घेत नसल्याने शासनाचा महसुल बुडत असणे, मुद्रांक शुल्काबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यावाही व प्रतिक्रया".

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री(महसूल) यांचे निवेदन**

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील कलम ३३ अंतर्गत निष्पादित दस्तावर मुद्रांक शुल्क अदायगीकरिता सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी ठाणे यांच्या कार्यालयातील दाखल प्रकरणांपैकी प्रलंबित मौजे कशेळी, दापोडे ता. भिवंडी जि. ठाणे येथील एकूण ०७ प्रकरणांपैकी १ प्रकरण पुरक कागदपत्राकरिता संबधित पक्षकाराकडून पूर्तते अभावी प्रलंबित आहे. तर ०२ प्रकरणामध्ये पक्षकारांनी मुद्रांक शुल्क अदा करणेस्तव प्रलंबित असून ०४ प्रकरणी आरआसीची प्रक्रीया पुर्ण करण्यात आली आहे. उक्त ०७ प्रकरणे अभय योजना २०२३ अंतर्गत लाभ घेणे करिता संबधित पक्षकार यांना १८/१२/२०२३ रोजी नोटीस पारित करण्यात आलेली आहे. उपरोक्त मौजे कशेळी, ता. भिवंडी जि. ठाणे येथील ०६ प्रकरणामध्ये एकूण २५,५४०/- इतके मुद्रांक शुल्क प्रलंबित असल्योच दिसून येते. त्यामुळे १६००० रुपये कोटीचे नुकसान झालो असल्याचे बाब निर्देशनास आलेली नाही. प्रलंबित प्रकरणे संबधित पक्षकाराचे सकारात्मक प्रतिसाद अभावा प्रलंबित असून सदर प्रकरणी कोणताही विलंब झालेला नाही.

*********

लक्षवेधी सूचना क्र.२१४४.

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन**

**श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"धुळे जिल्ह्यातील तालुका धुळे, नांदाळे खुर्द गावांमधील शेतकऱ्यांच्या काही जमिनीमध्ये बेकायदेशीर फेरफारांची नोंद होणे, फेरफार क्रमांक ५२५, ६६२ व त्यापुढील इतर फेरफार तत्कालीन तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांनी गैरव्यवहारातुन गैरप्रकारे नोंद घेतल्याने मौजे-नांदाळे खुर्द जुना सर्व्हे क्रमांक ६० मध्ये अनियमितता व अनेक बेकायदेशीर त्रुटी निर्माण होणे, या सर्व फेरफारांचे उपविभागीय अधिकारी यांनी पुर्नविलोकनाची कारवाई होणे गरजेचे असल्याने त्याचप्रमाणे सदर प्रकरणामध्ये विकासकांनी कोणतीचतपासणी न करताच बनावट शेतकऱ्याकडुन जमिन खरेदी केली असणे, सदर खरेदी व्यवहार हा बेकायदेशीर असल्यारचे निदर्शनास येणे, त्याअमुळे जे मुळ शेतकरी आहेत त्यांकच्यान जमिनीमध्येर बेकायदेशीर फेरफार झाले आहेत त्याश शेतक-यांना त्योंच्याण जमिनी परत मिळण्यातकरिता याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

मौजे नंदाळे खु.ता. जि. धुळे येथील गट नं.६० क्षेत्र ३.९४ आर या शेत जमिनीचा सन १९५७-५८ या कालावधीचा ७/१२ उतारा पाहता बनीबाई सख्या व गबा रामजी यांची नावे दिसून येतात. बनीबाई सख्या महार या मयत असून त्यांना मुले नाहीत. फेरफार क्रमांक ५१४ दिनांक २२.८.१९६३ पाहता वारसाने राणुबाई आनंदा महार व ध्यानीबाई भ्र. भगा महार व पुतण्या गबा रामजी यांची नावे वारस नोंद झालेली दिसून येतात.

फेरफार नोंद क्रमांक ५२५, दिनांक १२/१९६५ महार इनाम जमीन सन १९६० वर्षापासून खालसा झाल्याने कब्जेदार सरकार असे नांव दाखल झाले. ती जमीन वतनदारांना नवीन अविभाज्य शर्तीवर रिग्रॅन्ट करण्यात आल्याने गबा रामजी महार, रानुबाई आनंदा व ध्यानीबाई भ्र भगा महार यांच्या नावे कब्जा हक्काने दिलेली नोंद दिसून येते. फेरफार नोंद क्रमांक ५६२, दिनांक ४.२.१९७४ अन्वये श्रीमती.ध्यानीबाई भ्र. भगा महार वगैरे यांचेकडून श्री. दगा दला पाटील यांनी रु.६०००/- वर तोंडी खरेदी केल्याची नोंद घेण्यात आली. तथापि, सदर व्यवहार बेकायदेशीर असल्याने सदरची नोंद फेरफार नोंद क्रमांक ६१६, दिनांक २०/११/१९७५ अन्वये रद्द केल्याचे ७/१२ वर दिसून येते.

फेरफार नोंद क्र.८९९B, दि.०१ एप्रिल २००० अन्वये ध्यानीबाई भ्र. भगा महार (झाल्टे) यांचे वारस देवराम भगा झाल्टे, शिवराम भगा झाल्टे, धुपदाबाई शामराव झाल्टे यांनी त्यांचा हक्क स्वखुशीने सोडून दिलेला आहे. फेरफार नोंद क्रमांक ९०३ नुसार गबा रामजी शिरसाठ हे मयत झाल्याने त्यांचे वारसाची नोंद दाखल आहे. तसेच फेरफार नोंद क्रमांक ९०४, दि.९.६.२००१ अन्वये गबा रामजी याचे वारस १) व्दारकाबाई गुलाब मोरे २) सायजाबाई वामन शिरसाठ ३) भिमराव वामन शिरसाठ ४) शेखर वामन शिरसाठ ५) आशा विठ्ठल मोरे यांनी स्वखुशीने वारसा हक्क कमी करून घेतल्याने त्यांचे नाव ७/१२ वरुन कमी केले आहे.

फेरफार नोंद क्रमांक ९३१, दि. २४.९.२००३ अन्वये उर्वरित कब्जेदार १) मोतीराम भगा २) सखाराम भगा ३) दगा भगा ४) तुकाराम भगा यांनी अपर जिल्हाधिकारी, धुळे यांचेकडील दि.१६/०९/२००३ आदेशान्वये सदर गट क्षेत्र ३.९४ हे.आर श्री.राजेंद्र वालचंद शिंदे यांना विक्री केल्याची नोंद घेण्यात आलेली आहे. अपर जिल्हाधिकारी, धुळे यांचेकडील दि.१२/५/२००४ च्या आदेशा नुसार श्री प्रकाश भवरलाल मेहता यांनी श्री राजेंद्र वालचंद शिंदे यांच्या कडून सदर गट क्षेत्र ३.९४ हे.आर दि.१७/०५/२००४ रोजी फेरफार नोंद क्रमांक ९३९ नुसार खरेदीने घेतल्याने त्यांची नांवे दाखल करण्यात आली आहेत. सदर जमीन पूर्वी इनाम वर्ग ६ ची होती. प्रकाश भवरलाल मेहता यांनी जिल्हाधिकारी यांचेकडील दि.०६.०५.२००९ आदेशान्वये ५०% नजराणा आकारुन भोगवटादार वर्ग -२ मधून भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करण्यात आली आहे. त्याबाबतची नोंद फेरफार नोंद क्रमांक १०४४ दि.१९.०६.२००९ अन्वये घेण्यात आलेली आहे.

फेरफार नोंद क्रमांक १०७७, दि.१०.५.२०११ अन्वये सौ. ललिता विजु रुणवाल, संगिता अनिल रुणवाल, सौ.दिपाली युवराज चौधरी, सौ.हरविंदसिंग कोर शेठी यांनी प्रकाश भवरलाल मेहता यांचकडून सदर जमीन क्षेत्र ३.९४ हे.आर दि.०४.०५.२०११ रोजी खरेदीने घेतल्याबाबत नोंद घेण्यात आलेली आहे.

फेरफार नोंद क्रमांक ११६० अन्वये सदर जमीनी पैकी १३०० चौ.मी. क्षेत्र रा.म.क्र. ६ खाली संपादित करण्यात आली असून फेरफार नोंद घेतली आहे. फेरफार नोंद क्रमांक १३७८ अन्वये धनंजय शिवाजी सुर्यवंशी व विशाल दिलीप सैंदाणे यांनी दिपाली युवराज चौधरी वगैरे यांचेकडून ३.८१ हे.आर पैकी १.३० हे.आर व फेरफार नोंद क्रमांक १३९० अन्वये एकनाथ मगन पाटील, निलेश दिलीप पाटील व विशाल दिलीप सैंदाणे यांनी २.४० हे.आर जमीन खरेदी केल्याची नोंद आहे.

विशाल दिलीप सैंदाणे यांनी निलेश दिलीप पाटील यांचेकडून २.४० हे.आर जमीनीपैकी ०.८० हे.आर दि.२७.०९.२०२१ रोजी खरेदी घेतलेबाबत फेरफार नोंद क्रमांक १४४० करण्यात आली आहे. फेरफार नोंद क्रमांक १४६७, दि.२९.०३.२०२२ अन्वये तहसिलदार यांचे दि.२२.११.२०२१ च्या आदेशान्वये विशाल दिलीप सैंदाणे वगैरे यांचे क्षेत्र २.४० हे.आर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४२ क नुसार औद्योगिक प्रयोजनार्थ बिनशेतीकडे वर्ग करण्यात आलेले आहे. फेरफार नोंद क्रमांक १४७६, दि.०३.०५.२०२२ अन्वये ललीता सुनिल रुणवाल व इतर यांचे क्षेत्र १.४१ हे.आर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४२ क नुसार वाणिज्य प्रयोजनार्थ वर्ग करण्यात आलेली आहे. फेरफार नोंद क्रमांक १४८८, दि.१७.०६.२०२२ नुसार विशाल दिलीप सैंदाणे यांनी स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा यांचेकडून रक्कम रु.५० लाख कर्ज घेतल्याने बोजा दाखल करण्यात आला आहे. फेरफार नोंद क्रमांक १५१५, दिनांक ३०.१२.२०२२ अन्वये विशाल दिलीप सैंदाणे यांनी धनंजय शिवाजी सुर्यवंशी यांचेकडुन १.३० हे.आर पैकी क्षेत्र ०.६५ हे.आर क्षेत्र दिनांक २९.०४.२०२२ रोजी खरेदी घेतल्याने नोंद दिसून येत आहे. एकूणच आजरोजी श्री.विशाल दिलीप सैंदाणे यांचे नाव एकुण क्षेत्र ३.७० हे.आर जमीन आहे.

फेरफार नोंद ९३१ ही अपर जिल्हाधिकारी, धुळे यांचे दि.१६.९.२००३ चे आदेशान्वये घेण्यात आलेली असून नमूद केलेला व्यवहार हा नोंदणीकृत दस्ताऐवज व कायदेशीरपणे झालेला आहे. त्यामुळे सदरची नोंद पूर्नविलोकनात घेण्याचा प्रश्न येत नाही.

*******

लक्षवेधी सूचना क्र. २१५०

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे तृतीय (हिवाळी अधिवेशन)

श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २१५० पुढीलप्रमाणे आहे:-

## लक्षवेधी सूचना

" राज्यात शासनाच्या महसूल विभागातील नोंदणी विभागामध्ये जमिन व सदनिका व्यवहारामध्ये अनेक जुने दस्तांची नोंदणी होणे अथवा अभिनिर्णित होणे. ब-याच वर्षापासून प्रलंबित असून जुने अभिनिर्णीत व इतर जुने दस्त यांच्यावरती दंडात्मक कारवाई दोनशे पट असल्याने दस्तधारक घाबरून दस्त नोंदणी अभिनिर्णीत करीत नसणे, कमी पडलेला मुद्रांक शुल्क भरत नसल्याने मुद्रांक शुल्काच्या व आकारण्यात आलेल्या दंडात सूट माफी मिळावी म्हणून महाराष्ट्रातील असे दस्त अभिनिर्णीत झाल्यास महाराष्ट्र शासनाला वीस हजार कोटी रुपये पर्यंतचे उत्पन्न या मुद्रांक शुल्क मिळण्याची शक्यता असणे, शासनाने तात्काळ दंडात्मक कारवाई माफ करुन सहा महिन्यासाठी अभय योजनेची धोरणात्मक तरतूद तात्काळ करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

## श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन:-

महाराष्ट्र राज्यामध्ये निष्पादित झालेल्या तथा नोंदणी करिता संबंधित दुय्यम निबंधकाकडे दाखल होणाऱ्या दस्तांवर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या तरतुदीनुसार मुद्रांक शुल्काची आकारणी केली जाते. न्यून मुद्रांकीत दस्तांवर देय होणा-या मुद्रांक शुल्कावर मुद्रांक अधिनियमाच्या तरतूदीनुसार प्रतिमाह २% याप्रमाणे महत्तम ४००% पर्यंत दंड लावण्यात येतो. परंतु, उक्त दंडाची रक्कम जास्त असल्याने वर नमूद प्रमाणे न्यून मुद्रांकित दस्तांचे पक्षकार सदर रक्कम शासनाकडे जमा करण्यास तयार होत नाहीत. त्यामुळे, नोंदणी व मुद्रांक विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाकडे मुद्रांक शुल्काच्या वसुलीसाठी प्रलंबीत असलेल्या दस्तांची संख्या फार मोठी असल्याने ते निकाली काढण्यास्तव तसेच, त्यामध्ये अडकलेल्या मुद्रांक शुल्काची वसूली करून राज्य शासनाच्या महसूली उत्पन्नात वाढ करण्यास सहायकारी व्हावे म्हणून संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये "महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना- २०२३" राबविण्याचा जाणिवपूर्वक धोरणात्मक निर्णय घेऊन शासनामार्फत दि.०७ डिसेंबर, २०२३ रोजी शासन राजपत्रात आदेश अधिसूचित करण्यात आले आहेत.

उक्त अभय योजनेमध्ये दि.०१ जानेवारी, १९८० ते दि.३१ डिसेंबर, २०२० या कालावधीत निष्पादित झालेल्या परंतु, नोंदणीस दाखल किंवा न केलेल्या दस्तांवर निष्पादित केलेल्या दिवशी देय होणा-या मुद्रांक शुल्कामध्ये आणि दंडामध्ये मोठ्या प्रमाणात लोकहितास्तव सुट देण्यात येणार आहे. उक्त अभय योजना दि.०१ डिसेंबर २०२३ ते दि.३१ जानेवारी, २०२४ आणि दि.०१ फेब्रुवारी, २०२४ ते दि. ३१ मार्च, २०२४ अशा दोन टप्प्यात राबविण्यात येणार आहे. उक्त मुद्रांक शुल्क अभय योजनेच्या प्रभावीपणे अंमलबजावणीकरीता शासनाकडून मानक कार्यरत कार्यपध्दती निश्चित करुन दि.११ डिसेंबर, २०२३ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये स्पष्टीकरणात्मक सूचना देखील निर्गमित करण्यात आल्या आहेत.

वस्तूत: महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम १७ नुसार दस्त निष्पादनाच्या किंवा लगतच्या कामाच्या दिवशी लागु असलेल्या तरतूदीनुसार उक्त दस्त निष्पादित करणा-या व्यक्तीने शासनखाती यथोचित मुद्रांक

शुल्काचा भरणा करणे क्रमप्राप्त आहे. परंतु, त्याप्रमाणे मुद्रांक शुल्काचा भरणा न केल्याने अशा प्रकरणी कमी भरलेले मुद्रांक शुल्क दंडासह वसुल करण्याची तरतूद उक्त अधिनियमाच्या कलम ३४ सह कलम ३९ मध्ये विहित करण्यात आलेली आहे. याशिवाय, वारंवार सूचना करून देखिल अशा व्यक्ती उक्त अधिनियमाखाली भरावे लागणारे शुल्क किया शास्ती यांचा भरणा शासनखाती करत नसतील तर, महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या तरतूदीनुसार जमीन महसूलाची थकबाकी वसूल करण्यासाठी विहित केलेले अधिकार मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी यांच्यासह मुद्रांक जिल्हाधिकारी यांना उक्त अधि[illegible]यमाच्या कलम ४६ नुसार बहाल करण्यात आलेले आहेत. थोडक्यात, कमी भरलेल्या मुद्रांक शुल्काची आणि त्यावरील दंडाची सक्तीने वसुली करण्याची तरतूद कायद्याने संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेली आहे. तथापि, केवळ सहानुभूतीच्या दृष्टीकोन म्हणून तसेच, कायद्याच्या अजाणतेपणाने मुद्रांक शुल्काचा कमी भरणा शासनखाती केला असल्याची शक्यता वर्तवून अशा कमी भरलेल्या मुद्रांक शुल्काचा व त्यावरील दंडाचा शासनखाती भरणा करण्याकरीता संबंधित व्यक्तीना तथा पक्षकारांना संधी वारंवार दिल्या गेल्या आहेत. त्याचाच एक भाग म्हणून नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शासनास वेळोवेळी केलेल्या विनंतीस अनुलक्षून शासनामार्फत सन १९९४ पासून ते आजरोजीपर्यंत वेगवेगळया कालावधीसाठी मुद्रांक शुल्क अभय योजना राबविल्या आहेत.

उक्त मुद्रांक शुल्क अभय योजनांमुळे, नक्कीच राज्य शासनाच्या तिजोरीत अडकलेला मुद्रांक शुल्करुपी महसुल जमा करण्यास सहाय्य झाले आहे. तथापि, काही व्यक्तीकडून हेतुपूर्वक केवळ शासनाला ठकविण्याच्या उद्देशाने म्हणजेच मुद्रांक शुल्काची जाणीवपूर्वक चोरी करण्याच्या उद्देशाने देखिल दस्त निष्पादित करण्याची व नोंदविण्याची कार्यवाही केली जाते. अशा हेतूपूर्वक मुद्रांक शुल्काच्या चुकवेगिरीला आळा घालण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम ५९ व कलम ६२ मध्ये अपराध सिध्दतेनंतर सक्षम कारावासाची शिक्षा देण्याबाबत देखिल स्पष्ट अशी तरतूद विहित करण्यात आलेली आहे. त्यामुळे, राज्य शासनाला मिळणा-या महसूली उत्पनातुन सर्वसामान्य नागरिकांसाठी विविध विकासात्मक [illegible] कल्याणकारी योजना राबविण्यासाठी जाणिवपूर्वक होणा-या मुद्रांक शुल्क चुकवेगिरीला आळा घालण्याच्या उद्देशाने पर्यायाने, राज्य शासनास मिळणाऱ्या मुद्रांक शुल्करुपी महसुलाची शाश्वती होण्याकरीता दि.१३ डिसेंबर, २०२३ रोजीच्या शासन परिपत्रकांन्वये स्पष्ट अशा सुचना देण्याचा जाणिवपूर्वक धोरणात्मक निर्णय देखिल शासनाने घेतला आहे.

***********************************

**लक्षवेधी सुचना क्र.२१५३.**

## महाराष्ट्र विधानसभा

## सन-२०२३ चे (हिवाळी) अधिवेशन

**श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२१५३ पुढीलप्रमाणे आहे :-**

"मुंबई उपनगर जिल्हा व ठाणे जिल्ह्यातिल भुमि अभिलेख विभागातील मिळकत पत्रीकेवरील चौकशी नोंदप्रमाणे नोंदी घेत असतांना अनेक नोंदी चुकीच्या पध्दतीने घेण्यात येणे, चौकशी नोंदीवरुन मिळकत पत्रीका घडवण्यात आल्या परंतु तत्पूर्वी सदर मिळकत पत्रीका म्हणजे महसुल विभागातील सातबारा हाच मुळ भोगवटदार यांचे मिळकत कार्ड असणे, परंतु मिळकत पत्रीकेवरती नोंदी तबदील करते वेळेस सातबाऱ्यावरील फेरफार जागेवरील कब्जा आकारबंद याचा सखोल अभ्यास न करताच काही चुकीच्या मिळकत पत्रीकेच्या नोंदी घडुन आले असणे, तसेच क्षेत्र सुध्दा जुळुन आलेले नसून बनवाट बिनशेतीच्या आधारे भाडेकरुलाच मिळकत पत्रीकेवरती बेकायदेशीर मालक बनवण्याचे काम गैरव्यवहारातून घडले असल्याचे मरोळ व मुळगाव येथील काही प्रकरणांमध्ये दिसून आल्याने काही मिळकत पत्रीकेवरील कुठलाही कायदेशीरपुरावा नसतांना तिन्हाईत ईसमांची नावे लावण्यात आल्याचे अनेक तक्रारी संबंधित विभागाकडे धुळखात पडणे, त्याची कुठलीही खातरजमा व त्यावरची ठोस कारवाई शासनाकडून केली जात नसल्याने त्याबाबत अनेक नागरीकांनी दि.२८ नाव्हेंबर,२०२३ रोजी व गेल्या दोन वर्षात जमा बंदी आयुक्त अधिक्षक भुमिअभिलेख मुंबई उपनगरे व नगर भुमापन अधिकारी विलेपार्ले व जिल्हाधिकारी मुंबई उपनगरे यांना रीतसर निवेदन देणे, सदर कायद्यात अनेक कायदेशीर तरतुदी असतांना त्याचा उपयोग संबंधित अधिकारी करत नसून भुमिअभिलेख विभागामध्ये कायदेशीर मिळकत पत्रीका घडवणे व मोजणी करुन सिटीएस नकाशे देणेबाबत भुमिअभिलेख विभाग चाल ढकल करित असणे, त्यामुळे यासर्व प्रकरणाचे शासनाने सखोल चौकशीकरुन भुमिअभिलेखमधील जुनेकायदे रद्द करुन सरळ-सरळ मार्गाने खोट्या व बनावट पध्दतीने झालेल्या मिळकत पत्रीका या रद्द करणे कामी व बिनशेती खरेदी खताने आलेल्या अर्जावरुन तात्काळ मिळकत पत्रीका घडवण्याची कारवाई यावर याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

## श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मुंबई उपनगर तसेच ठाणे जिल्ह्यात भूमि अभिलेख विभागाकडून विविध भागात नगर भूमापन योजना लागू करण्यात आलेल्या आहेत. यावेळी मालकी हक्काबाबत चौकशी करताना महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २०(२) अन्वये सर्व संबंधितांना रितसर नोटीस देऊन जाहीरपणे धारक हक्काची चौकशी करण्यात आली आहे. तसेच चौकशीवेळी उपस्थित व्यक्ती यांचेकडून पुराव्याची कागदपत्रे म्हणजेच ७/१२ उतारे, खरेदीखत तसेच जागेवरील वहिवाट याची खात्री करुन अर्ध न्यायीक स्वरुपाचा निर्णय देण्यात येवून मिळकतपत्रिका उघडण्यात आलेल्या आहेत.

ज्या मिळकती रितसर जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी व सक्षम महसूल अधिकारी यांचे आदेशाने बिनशेती परवानगी प्राप्त झालेल्या आहेत, अशाच मिळकती बिनशेती ठरविल्या गेल्या आहेत व त्याआधारे धारकांची नांवे मिळकत पत्रिकेवर नमुद करणेत आली आहेत. अशाच प्रकारे कार्यपध्दतीचा अवलंब करून नगर भूमापन मरोळ येथील न.भू.क्र.१६४६ व नगर भूमापन मूळगांव येथील न.भू.क्र.२०४, २०६ या मिळकतींची महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ कलम २०(२) अन्वये जाहीररित्या चौकशी करून तसेच चौकशीचे वेळी जागेवर प्राप्त अभिलेखावरून खात्री करून धारकांच्या मिळकत पत्रीका उघडणेत आलेल्या आहेत.

जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर यांचेकडे दिनांक २८/११/२०२३ रोजी अर्जदार लालचंद गुलाबचंद भगाजी (हुंडीया) यांचे कु.मु.धारक नागेश किसनराव निमकर यांनी मौजे-मुळगांव येथील स.नं.१६/२२ व १६/१७ न.भू.क्र.२०४ आणि २०६ यामधून वजीर ग्लास वर्क्स लिमिटेड यांचा पेन्सिली शे-यावरुन मिळकत पत्रिकेवरील इतर शेरे म्हणून लावलेले नाव काढावे तसेच बिनशेती वापर असल्यामुळे शेती शेरा कमी करुन छगनराज जवानमल यांचे नावाची नोंदी घेणेबाबत अर्ज सादर केला आहे. तसेच जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर यांचेकडे दिनांक २८/११/२०२३ रोजी अर्जदार जिवनदास गुलाबचंद भगाजी यांचे कु.मु.धारक नागेश किसनराव निमकर यांनी मौजे-मरोळ येथील स.नं. ८४/८, ८५/४, ८६/५, ८५/८ न.भू.क्र. १६४६ या मिळकत पत्रिकेत बनावट अर्जास अनुसरुन देण्यात आलेल्या बिनशेती आदेशाच्या आधारे मूळ भोगवटदाराचे नांव वगळून भाडोत्रीचे नांव लावल्याने त्यांचे पुर्नविलोकन होणेबाबत अर्ज सादर केला आहे. सदर अर्जांबाबत जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर यांनी नगर भूमापन अधिकारी, विलेपार्ले यांना पुढील नियमांतर्गत कार्यवाहीसाठी निर्देश दिलेले आहेत.

प्रकरणामधील विषयांकित मिळकतींबाबत तत्कालिन चौकशी अधिकारी यांनी घोषित केलेल्या निर्णयांचे बाबत हितसंबंधित धारक यांचा उक्त निर्णयांबाबत आक्षेप असल्यास पुराव्यांचे सबळ कागदपत्रांसह सदरच्या निर्णयाविरुद्ध विलंब माफीच्या अर्जासह संबंधित सक्षम महसूल अधिकारी यांचेकडे रितसर अपिल दाखल करुन दाद मागणी करण्याचे प्रावधान महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ कलम-२४७ अंतर्गत उपलब्ध आहे. हे लक्षात घेता, हितसंबंधित धारक यांनी उक्त निर्णयांबाबत आक्षेप असल्यास पुराव्यांचे सबळ कागदपत्रांसह सदरच्या निर्णयाविरुद्ध विलंब माफीच्या अर्जासह संबंधित सक्षम अधिकारी यांचेकडे रितसर अपिल दाखल केल्यास प्रकरण तपासून उचित निर्णय घेण्यात येईल.

**********

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ तिसरे (हिवाळी) अधिवेशन

**श्री. राजु (बाबा) जयवंतराव आवळे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.~~५७४०४९१/क~~ २७५६ पुढीलप्रमाणे आहे-**

"पुणे जिल्ह्यातील ता. आंबेगाव मौजे-साकोरे येथील बहुतांश जमिनी या भोगवटदार वर्ग- २ मध्ये असून संबंधित शेतकऱ्यांनी अविभाज्य शर्तीखाली असलेल्या जमिनीसाठी महसूल खात्याच्या विविध अधिकाऱ्यांकडे मागील कित्येक वर्षापासून निवेदन प्रस्ताव दाखल होणे, संबंधित विभागाने शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून न घेता त्यांचे प्रकरण प्रलंबित ठेवणे, मौजे-साकोरे या गावातील सर्व्हे क्र. १२७, ४ व ४० हे सर्व्हे क्रमांकाच्या जमिनी भोगवटदार वर्ग-२ मध्ये असल्यामुळे भोगवटदार वर्ग-१ करण्यासाठी शेतकऱ्यांनी संबंधित महसूल विभागास प्रस्ताव दाखल करुनही तसेच अविभाज्य शर्तीखाली मुल्यांकन दराच्या ५० टक्के नजराना भरण्यास तयार असुनही महसूल विभाग शासनाचे नुकसान करित असणे, सदर जमिन ही वडीलोपार्जित खरेदीविक्रीने आलेली असूनसुध्दा सदर जमिन भोगवदार वर्ग-२ मध्ये अन्यायकारक टाकण्याचे काम मागच्या तत्कालीन शासन काळात झालेले असुन त्याबाबत मालकी हक्क कोणाची आकारफोड पिकपाणी व छापील उतारे व फेरफार हे सर्व तपासून शेतकऱ्यांना न्याय देण्याबाबत शासनाने गंभीररीत्या दखल घेऊन करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

### मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

पुणे जिल्ह्यातील ता. आंबेगाव मौजे-साकोरे या गावातील स.नं. १२७ या सर्व्हे नंबरची जमीन भोगवटा वर्ग-१ असल्याचे अभिलेखावरून दिसून येते. सदर जमीन श्री. विजय कचरु मोरे यांच्या मालकीची असल्याचे फेरफार क्र. १७६२ अन्वये स्पष्ट होते.

मौजे साकोरे येथील सर्व्हे नं. ४ व ४० ही इनाम वर्ग-६ब या प्रकारातील असून या जमीनी भोगवटा वर्ग -२ धारणाधिकाराखालील आहेत. या जमीनीच्या धारणाधिकारामध्ये शासनस्तरावर यापुर्वी कोणताही बदल करण्यात आलेला नाही. प्रस्तुत जमीनी भोगवटा वर्ग-२ मधून भोगवटा वर्ग-१ मध्ये रुपांतर करण्याचा प्रस्ताव क्षेत्रीय कार्यालय तसेच शासनास प्राप्त झालेला नाही. प्रस्तुत जमीनीचे कब्जेदार सदरी अनुक्रमे श्री. सोनू खंडू मोरे व श्री. विजय कचरु मोरे यांचे नाव दाखल आहे. इतर हक्कामध्ये सक्षम प्राधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय हस्तांतरणास बंदी-ईनाम व वतन जमीनी (देवस्थान वगळून) नवीन अविभाज्य शर्त-बिगरशेतीकडे वापर झाल्यास साऱ्याच्या ५० टक्के नजराण्यास पात्र असा शेरा ७/१२ सदरी नमूद

असल्याचे दिसून येते. तसेच मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहीशी करणे अधिनियम, १९५८ मधील तरतूदीनुसार जमीनीचे रुपांतर अकृषीक करावयाचे झाल्यास सद्यस्थितीमध्ये ५० टक्के नजराणा भरून घेण्याची तरतूद आहे. तथापि, भोगवटा वर्ग २ मधून भोगवटा वर्ग -१ करण्याची तरतूद नाही.

मौजे साकोरे, ता. आंबेगाव, जि. पुणे येथील सर्व्हे क्र. १२७, ४ व ४० या जमीनींचा भोगवटा वर्ग-२ मधून भोगवटा वर्ग-१ मध्ये रुपांतर करण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव क्षेत्रीय कार्यालय तसेच शासनास प्राप्त झालेला नाही. क्षेत्रीय स्तरावरुन स्वयंस्पष्ट प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर शासन स्तरावर प्रचलित कायद्यातील तरतूदीनुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

*******

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

अ‍ॅड.आकाश फुंडकर, वि.स.स, यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२२३० खालीलप्रमाणे आहे:-

"मोहोदा अडगाव बू.ता.नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती गावातील गायरान चराईसाठी साल (१९११) वर्षांपासून सोडलेली शासनाची शेतजमिन जमीन मौजा आडगाव बू शेत सर्वे न. (सर्वे न २८ क्षेत्रफळ ९ हेक्टर ८४ आर) (सर्वे नं ८६ क्षेत्रफळ ३ हेक्टर २२ आर) (सर्वे न.८९ क्षेत्रफळ २ हेक्टर ७ आर) अशी एकूण जमीन (१५ हेक्टर १३ आर) एवढी असणे, ही जमीन पदाचा गैर वापर करुन विक्री केलेली असणे, जमिनीच्या विक्री विरोधात गावकरी यांच्या वतीने तक्रार केली असता मा. जिल्हाधिकारी यांनी चौकशीचे आदेश देण्यात येणे, परंतू जिल्हाअधिकारी यांच्या पत्राचा अवमान होणे, सदर जमीन ही गुरेचरायची जमीन व स्मशान भूमीची असल्यामुळे या जमिनीची कुठल्याही पद्धतीने विक्री होऊ नये असा ग्रामसभेचा ठराव सर्वांच्या मते पारित करण्यात येणे, सदर व्यवहार हा गैर कायदेशीर होणे, शासनाची व ग्रामपंचायत गावकरी मंडळींची फसवणूक करून या जमिनीची विक्री पदाचा दूर उपयोग करून करण्यात येणे, सदर शेतजमीन ही २०० वर्षांपूर्वी गुरे चराईसाठी सोडलेली असणे व गावातील ७० वर्षांपासून ३० लोकांची राहण्याची वस्ती असणे, गायराण जमीन खरेदी विक्रीची परवानगी नसतानासुद्धा सदर जमीन विक्री करण्याची परवानगी देणा-या अधिकारी व संबंधीतांची चौकशी करून कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच सदर शेत जमीन पूर्ववत चराईसाठी मोकळी करून देण्याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मौजा अडगाव (बु), ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती येथील सर्वे नंबर ८९ क्षेत्र २.०७ हे. आर, सर्वे नंबर ८६ क्षेत्र ३.२२ हे.आर व सर्वे नंबर २८ क्षेत्र ८.८१ हे.आर. जमिनीबाबत अर्जदार श्री. नारायण शेषरावजी परिमल यांच्या अर्जावरुन **भोगवटादार वर्ग २ ही चुकीची नोंदवलेली नोंद दुरुस्ती करून वर्ग १ म्हणून नोंद घेण्यात येत आहे** असा आदेश जिल्हाधिकारी, अमरावती यांनी त्यांचे आदेश क्र. कक्ष २६/अ.का./राजस्व/ कावि-३४३/२०१६, दिनांक २८/०९/२०१६ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५ नुसार दिला आहे.

मौजा अडगाव (बु), ता.नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती येथील सर्वे नं. ८९ क्षेत्र.२.०७ हे.आर, सर्वे नंबर ८६ क्षेत्र ३.२२ हे. आर व सर्वे नंबर २८ क्षेत्र ८.८१ हे. आर (भोगवटदार वर्ग २) जमिनीचे ७/१२ वरील इतर

रोया ५/1633 (750-2-24)

अधिकारात असलेली **"सदरहू शेत भरआकारी गावची गुरे चरण्याकरीता ठेवली शेतसारा सर्व गावचे शेतकरी मिळून देतात"** याप्रमाणे नोंद कमी करणेबाबत अर्जदार श्री.नारायण शेषराव परिमल, रा. आडगाव (बु), यांनी अर्ज केला होता. यानुषंगाने जिल्हाधिकारी, अमरावती यांनी आदेश-क्रमांक कक्ष-२६/अ.का./राजस्व/कावी-३४४/२०१६, दिनांक २८/०९/२०१६ रोजी आदेश पारीत केला असून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५ नुसार उपरोक्त नमूद जमिनीच्या ७/१२ च्या इतर अधिकारात घेतलेल्या **"सदरहू शेतभर आकारी गावाची गुरे चरण्याकरीता ठेवली शेतसारा सर्व गावचे शेतकरी मिळून देतात. शेषरावचे नाव खात्यात दाखल आहे. वि. कलेक्टर साहेब यांचे आगाऊ परवानगी शिवाय कोणास गहाण बोझा अगर बक्षीस करता येणार नाही", ही नोंद वगळण्यात येत आहे"**, असा आदेश दिलेला आहे.

मौजे अडगाव (बु), ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती येथील सर्वे नंबर २८, क्षेत्र ८.८१ हे.आर, पैकी ०.८० हेक्टर भोगवटादार वर्ग २ जमिनीची हिंदू व बौद्ध स्मशानभूमी करता केलेली नोंद चुकीची असल्याने, नोंद कमी करणेबाबत अर्जदार श्री. नारायण शेषराव परिमल, रा. अडगाव (बु) ता. नांदगाव खंडेश्वर, यांच्या अर्जानुसार जिल्हाधिकारी, अमरावती यांनी आदेश क्र. कक्ष २६/अ.का./राजस्व/कावि-३४५/ २०१६, दिनांक २८/९/२०१६ रोजी आदेश पारीत केला. सदर आदेशानुसार श्री. नारायण शेषराव परिमल यांचे कडील मौ. अडगाव येथील सर्वे नंबर २८ मधील इतर अधिकारात घेतलेली पुढील नोंद **"वि.उपविभागीय अधिकारी साहेब, अमरावती यांचे २३/०२/१९८१ प्रमाणे ०.८० आर जमीन बौद्ध स्मशानकरिता देण्यात आली. ही चुकीने घेण्यात आलेली नोंद महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५ वगळण्यात येत आहे"**, याप्रमाणे निर्णय दिला. सदर आदेशाच्या अनुषंगाने व श्री. नारायण शेषराव परिमल यांचे अर्जानुसार तत्कालीन तहसीलदार, नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती यांच्या रा.मा.क्र./आर.टी.एस-६४/आडगाव बु.-०१/२०१६-१७,दिनांक ०४/११/२०१६ नुसार मौ. अडगाव (बु) येथील शेत सर्वे क्रमांक २८ क्षेत्र ८.८१ यापैकी ०.८० हे. आर जमिनीची हिंदू व बौद्ध स्मशानभूमी करीता केलेली नोंद चुकीची असल्याने नोंद कमी करण्याबाबत आदेश दिला.

श्री. शिवराय कुलकर्णी यांनी दि. १६.०३.२०१७ रोजीच्या पत्रानुसार उपरोक्त जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या दिनांक २८/९/२०१६ च्या आदेशाविरुध्द तक्रार दाखल केली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, अमरावती यांनी त्यांचे पत्र क्र. कक्ष-२६/अ.का./महसूल-२/कावि-३७३/२०१७, **दि. १६.०३.२०१७ अन्वये उपविभागीय अधिकारी, चांदुर रेल्वे यांना उक्त जागेबाबतच्या अभिलेखामध्ये खोडतोड करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांची सविस्तर चौकशी करुन तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले होते.**

जिल्हाधिकारी, अमरावती यांचे वरीलप्रमाणे पत्राचे अनुषंगाने श्री. अंबादास म. पडोळे, सरपंच, अडगांव बु. व इतर नागरिक यांनी उपविभागीय अधिकारी, चांदुर रेल्वे यांना पुन्हा तक्रार अर्ज दाखल केला होता. याअनुषंगाने तत्कालीन उपविभागीय अधिकारी, चांदुर रेल्वे यांनी सदर प्रकरणी चौकशी करून दि.

१७.०४.२०१७ च्या पत्रानुसार जिल्हाधिकारी, अमरावती यांना अहवाल सादर केला. सदर अहवालानुसार ग्रामपंचायत अडगांव बु. यांनी दि. १५.०८.२०१३ रोजीच्या ग्रामसभेत स.नं. २८,८६ व ८९ ची विक्री करण्यास परवानगी देऊ नये असा ठराव घेतला. सदर ग्रामसभेत सूचक म्हणून श्री. अंबादास पडोळे हे आहेत. तत्कालीन सरपंच, श्री. सुरेश दिवटे यांनी सन २०१३ मध्ये स्वतः च्या स्वाक्षरीने हरकत प्रमाणपत्र दिले आहे.

तद्नंतर, ग्रामपंचायत अडगांव बु. यांनी दि. १५.०८.२०१४ रोजी स.नं. २८,८६ व ८९ ची विक्री परवानगीला हरकत नसल्याचे कळविले आहे. श्री. सुरेश दिवटे यांनी सन २०१४ मध्ये नाहरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. सन २०१४ मधील कार्यरत सरपंच श्री. अंबादास पडोळे यांनी २०१३ मध्ये तंटामुक्ती अध्यक्ष म्हणून सदर प्रकरणामध्ये हरकत नोंदविली होती तसेच २०१३ मधील ग्राम सभेमध्ये सदर विषय सुचविणारे व प्रकरणात हरकत घेणारे सुचक म्हणून श्री. अंबादास पडोळे यांचे नाव आहे. तद्नंतर श्री. पडोळे यांनी १००/- रुपये च्या स्टॅम्प पेपरवर सदर विक्री परवानगीला हरकत नसल्याचे लिहून दिले. यावरून सन २०१३ मधील कार्यरत सरपंच व सन २०१४ मधील कार्यरत सरपंच यांच्या भूमिकेबाबत संशयाला जागा असल्याने **जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या वरीलप्रमाणे आदेशाचे पुर्नविलोकन होणे गरजेचे आहे असे मत उप विभागीय, अधिकारी चांदूर रेल्वे यांनी त्यांच्या वरीलप्रमाणे अहवालात नमूद केले.**

श्री. अंबादास पडोळे यांनी सदर स्टॅम्प पेपर हा चुकीचा व बोगस असल्याचे सांगितले असले तरी त्यांनी याबाबत कुठेही फसवणुकीची तक्रार दाखल केली नाही. सध्यस्थितीत वरीलप्रमाणे शेत स. नं. २८,८६ व ८९ भोगवटदार वर्ग-१ असून त्यांच्या ७/१२ मध्ये भोगवटदार सदरी खाजगी व्यक्तींची नावे आहेत. सदर खाजगी भोगवटादार हे नोंदणीकृत खरेदीखतानुसार आलेले आहेत. तसेच हक्क नोंदणी मध्ये सुध्दा कब्जेदार सदरी असलेल्या श्री. शेषराव गणपत कुणबी यांच्या वारसांनी संबंधित सर्व्हे नं. २८, ८६ व ८९ मौजा अडगांव बु. हे नोंदणीकृत खरेदी खताने सध्याच्या भोगवटदार सर्वे नं. २८ दिलीप गोवर्धन करुले व देवेश दिलीप करुले, स.नं. ८६ श्रीमती. दिक्षा दिलीप करुले, दिलीप गोवर्धन करुले व देवेश दिलीप करुले, स.नं. ८९ श्रीमती दिक्षा दिलीप करुले, स्वाती दिलीप करुले व देवेश दिलीप करुले यांना विक्री केले आहे. वरीलप्रमाणे वस्तूस्थितीच्या अनुषंगाने, मौजा अडगाव (बु), ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती येथील सर्वे नंबर ८९ क्षेत्र २.०७ हे. आर, सर्वे नंबर ८६ क्षेत्र ३.२२ हे.आर व सर्वे नंबर २८ क्षेत्र ८.८१ हे.आर. जमिनीबाबत जिल्हाधिकारी, अमरावती यांनी पारीत केलेले आदेश, सदर प्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारी, उप विभागीय अधिकारी, चांदूर रेल्वे यांचा अहवाल इत्यादी बाबींच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचे मार्फत सखोल तपासणीची बाब कार्यवाहीत आहे.

********************

H-1833-2

**म.वि.नि.१०५ अन्वये** लक्षवेधी सूचना क्र.२३१५

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२३ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन**

मा.श्री.बळवंत वानखडे , विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे.:-

"भिवंडी तालुक्यातील अनेक देवस्थानांच्या जमिनी सारामाफीचे असुन मागील काळातील तात्कालीन महसुल मंत्र्यांनी दिंडोरी येथील सारामाफीच्या देवस्थान जमिनींना वर्ग-१ मध्ये करण्याचे आदेश दिले होते त्याचप्रमाणे भिवंडी येथील भिवंडी कणेरी फेणेगांव अंजुरदिवे येथील वज्रेश्वरी संस्था देवस्थानाच्या जमिनीसुध्दा सारामाफीच्या असल्यामुळे तथा अंजुर दिवे येथील सद्गुरु पद्मनाचार्य स्वामी या देवस्थानाच्या जमिनीसुध्दा सारामाफीच्या असल्यामुळे त्यामध्ये विक्रीने घेतलेल्या जमिनी व कुळाने आलेल्या जमिनींना थेट वर्ग-१ ने सारामाफी देण्यासाठी वेळोवेळी महसुल खात्याला शेतकऱ्यांनी निवेदन दिलेले आहेत परंतु देवस्थानच्या विश्वस्तांनी सारामाफी असलेल्या देवस्थानमधील कुळांना विक्रिकरांना थेट त्यांच्या जमिनीतून हद्दपार करण्यासाठी उपविभागीय अधिकारी भिवंडी यांच्याकडे बेकायदेशीर दावे दाखल करुन शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचे कार्य चालु असल्याने दावा फेटाळुन कुळखातेदार विक्रीदार शेतकऱ्यांना कायदेशीर मालक बनवण्यासाठी शासनाने अहवाल मागवून शेतकऱ्यांच्या बाजुने धोरणात्मक निर्णय होणे कामी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

## मा.श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मंत्री (महसूल) यांचे निवेदन

भिवंडी तालुक्यामधील मौजे कणेरी व फेणे या गावचे तालुका Land Alienation Register पाहता वज्रेश्वरी देवी संस्थान या देवस्थानाबाबतच्या नोंदी असल्याचे दिसून येत असुन मोजे कणेरी व फेणे ही गावे पुर्णतः (Entire Village) देवस्थान मध्ये येत आहेत. तसेच सदर गावांचे गाव नमुना नंबर ३ पाहता सदर गावांची नोंद देवस्थान इनाम वर्ग ३ असल्याचे दिसून येत आहे.

यानुषंगाने नमूद करण्यात येते की, राज्यातील देवस्थान इनाम जमिनींच्या संदर्भात राज्य शासनाची भूमिका ठरविण्याकरिता शासनास शिफारशी करण्यासाठी प्रधान सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २३/०३/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल शासनास अद्यापपर्यंत अप्राप्त आहे. सदर समितीचा अहवाल आल्यावर शासन स्तरावर योग्य ते धोरण निश्चित करुन, सर्व संबंधिताना यथायोग्य निर्देश देण्यात येतील.

........................................................................

म.वि.नि.१०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र. २३२०

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२३ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन**

मा.श्री.बळवंत वानखडे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे.:-

" तहसिलदार भिवंडी शेतजमिन न्यायाधिकरण विभागातील तात्कालिन तहसिलदार यांच्या अनागोंदी अनियमित गैरप्रकार केल्याबाबत अनेक तक्रारी संबंधित विभागांकडे नागरीकांनी केल्याने आव्हानित केलेले दाव्यांमध्ये तपासणी केली असता मोठ्यापध्दतीने गैरव्यवहार केलेला दिसून येतो तात्कालिन तहसिलदार यांनी मौजे राहनाळ येथील सर्व्हे क्रं ५३/२ व ५२/८ मध्ये मुळ कुळवहिवाट जुने दस्त फेरफार क्रमांक ५७८ मध्ये मंजुर कुळांची संपूर्ण यादी मध्ये कुळखातेदाराचे नावच नसतांना गैरकायदेशीर बनावट घडलेल्या फेरफारावरून ७० (ब) व ३२ (ग) मंजुर केल्याने तसेच मौजे कशेळी येथील सर्व्हे क्रमांक ४८ मध्ये लहू कृष्णा म्हात्रे संरक्षित कुळ असतांना त्यांना डावलुन कुळाने कमी झालेले विठु नारायण म्हात्रे यांच्या नाव ६० वर्षापुर्वी कमी केले असतांना त्यांच्या वारसांना ७० (ब) ३२ (ग) ने कुछ घोषित करण्यात आल्याने शेतजमिन न्यायाधिकरण कुळवहिवाट शाखेमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार चालत असल्याचे दिसुन आल्याने जनतेमध्ये असंतोष निर्माण झाल्याने अर्धन्यायिक प्रकरणातील पारदर्शकता नष्ट झाल्याने शासनाने अशा प्रकरणामध्ये तात्काळ पुर्नविलोकन घेण्यासाठी संबंधित विभागाला तात्काळ आदेश देणे कामी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. "

---

## मा.श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मोजै राहनाळ येथील स.नं.५३/२ या मिळकतीबाबत श्री. मगन ठाकऱ्या पाटील यांनी कुळ कायदा कलम ३२ ग अन्वये खरेदी किंमत निश्चित करणेबाबत तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण भिवंडी यांचेकडे अर्ज दाखल केला होता. सदरचा अर्ज तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण भिवंडी यांचेकडील आदेश क्र.कु.का.क. ३२ ग/राहनाळ/३७/२०१२, दि.०२/१२/२०१३ नुसार अमान्य करण्यात आला, त्याविरुध्द अर्जदार यांनी उपविभागीय अधिकारी यांचेकडे कुळ कायदा कलम ७४ खाली अपिल दाखल केले होते. सदरचे अपिल मान्य करण्यात येवून तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण भिवंडी यांचेकडील आदेश क्र.कु.का.क.३२ ग/राहनाळ/३७/२०१२, दि.०५/१२/२०१३ रद्द करण्यात आले. प्रकरणी फेरचौकशी करुन नव्याने आदेश पारीत करणेबाबत निर्देश दिले होते. त्यानुसार तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण भिवंडी यांचेकडे फेरचौकशी प्रकरण चालविण्यात आले. अर्जदार श्री. मगन ठाकऱ्या पाटील व इतर ७ यांचे पूर्वगामी हक्कदार श्री. ठाकऱ्या दादू यांचे नावाची नोंद सन १९५४/५५ चे ७/१२ चे कुळ सदरी दाखल होती. तसेच, फेरफार क्र.६७९, दि.१६/०५/१९५७ अन्वये अर्जदार यांचे पूर्वज यांची "सा. कुळ" म्हणून नोंद सदर मिळकतीच्या इतर अधिकारात केली असल्याचे दिसून आले होते. तद्नंतर फेरफार क्र.३१९७ व फेरफार क्र.३२५९ अन्वये सदर मिळकतीस अर्जदार यांची नावे वारसाने दाखल झाली असल्याने सदर अर्जदार हे स.नं.५३/२ या मिळकतीचे कुळ कायदा कलम ४० नुसार कुळ असल्याने त्यांचे नावं कुळ कायदा कलम ३२ ग अन्वये क्र.कु.का.क.३२ ग/फेरचौकशी/एसआर-०३/२१, दि.१०/१०/२०२२ अन्वये खरेदी किंमत निश्चित करुन दिलेली आहे. लक्षवेधी मध्ये उपस्थित केलेला फेरफार क्र.५७८ हा कुळ

नोंदीबाबतचा नसून सदर फेरफार हा तुकडीबंदी बाबतचा आहे. तसंच उर्वरित स.नं.५३/२अ, ५२/८अ, ५२/८ ब, ५२/क मध्ये कोणतेही हस्तांतरण झालेले दिसून येत नाही.

तथापि, श्री. शशीकांत गायकवाड यांनी मौजे राहनाळ येथील सर्व्हे क्रं ५३/२ व ५२/८ मध्ये ७० ब व ३२ ग मंजूर केल्याचे दिसून येत नाही.

अर्जदार श्री.लहु कृष्णा म्हात्रे यांनी महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ७० व अन्वये मोजे कशेळी स.नं.४८ क्षेत्र ४-७२-९ पो.ख.०.००८ आकार २२.८७ या मिळकतीस कुळ घोषित करण्याबाबत दि.२९/१०/२००७ रोजी तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण भिवंडी यांचेकडे दावा दाखल केला होता. सदरचा दावा तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण भिवंडी यांचेकडील आदेश क्र.७० व/कशंळी /१२/०७, दिनांक ३०/६/२००९ रोजी आदेशान्वये मुदतबाह्य असल्याने काढून टाकण्यात आला होता. तद्नंतर अर्जदार यांनी सदर आदेशाविरूध्द उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांचे न्यायालयात अपिल दाखल केले. उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांनी आदेश क्र.वोडी/टेनन्सी/अपोल नं.०१/२०१३, दिनांक १४/०२/२०१४ अन्वये अपिलार्थी यांचा अर्ज अंशतः मान्य करून तहसीलदार व शेतजमीन या न्यायाधिकरणाकडील आदेश क्र.७० ब/कशेळी/१२/२००७, दिनांक ३०/०६/२००९ रोजीचे आदेश रद्द केले व महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ७० व मधील तरतुदीनुसार आदेश पारीत करणेकामी, कलम २ (१७) (१८) कलम ४ च्या तरतुदीनुसार योग्य ते पुरावे तपामणकामी, सर्व हितसंबंधीतांस त्यांचे म्हणणे मांडण्याची पुरेशी संधी देऊन व पुराव्यांचा विचार करून नियमानुसार पुढील योग्य ते आदेश पारीत करणेबाबत कळविले होते. त्याअनुषंगानं तहसीलदार व शेतजमीन या न्यायाधिकरणाकडे फेरचौकशी प्रकरण चालविण्यात येवून आदेश क्र.कु.का.क./ ३२-ग/मौजे- कशेळी/ फेरचौकशी/४/२०१४, दि.१/२/२०२१ अन्वये अर्जदार लहु कृष्णा म्हात्रे यांचा सदर मिळकतीबाबत कुळ घोषित करणेकरीता कुळ कायदा कलम ७० ब नुसार दि.२९/१०/२००७ रोजी दाखल केलेला दावा अमान्य करणेत आला आहे.

तसेच, मोजे कशेळी स.नं.४८ क्षेत्र ४-७२-९ पो.ख.०-००८ आकार २२.८७ रु. पै. यापैकी ३- ०७-५० हे. आर. या मिळकतीबाबत तत्कालीन शेतजमीन न्यायाधिकरण भिवंडी श्री. शशीकांत गायकवाड यांनी आदेश क्र.कुळ कायदा कलम ७०-ब/कशेळी/२१/२०१६, दि.०८/११/२०१७ अन्वये कै. हाडक्या विठू म्हात्रे (मयत), वारस श्री. शांताराम हाडक्या म्हात्रे व इतर यांना दावा मिळकतीचे कुळ असल्याचे घोषित करुन आदेश क.कु.का.क.३२ग/मोजे कशेळी/५१/२०१७, दि.०६/०३/२०१९ अन्वये सदर मिळकतीची खरेदी किंमत निश्चित करुन देण्यात आली होती. सदर आदेशाविरुध्द अर्जदार श्री. मुरलीधर अर्जुन मढवी व इतर यांनो उपविभागीय अधिकारी भिवंडी विभाग, भिवंडी यांचे न्यायाधिकरणाकडे अपिल दाखल केले होते. त्यानुसार आदेश क्र. बोडी/टेनन्सी अपिल नं.२८६/२०२२, दि.१९/१०/२०२३ अन्वये अपिलार्थी यांचा अर्ज मान्य करण्यात आला आहे. तहसीलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण भिवंडी यांचेकडील क्र.कु.का.क.३२ ग/मोजे कशेळी/५१/२०१७, दि.०६/०३/२०१९ रोजीचे आदेश रद्द करण्यात आले आहेत. उपविभागीय अधिकारी भिवंडी यांचेकडील आदेश दिनांक १९/१०/२०२३ रोजीच्या आदेशाविरुध्द मा. महाराष्ट्र महसुल न्यायाधिकरण, मुंबई यांचे न्यायालयात क्र. अध्यक्ष/ टेनन्सी/ रिव्ही/ ठाणे/ २१४/ २३ (एल-५३३/२३) नुसार अपिल दाखल केले आहे. सदर अपिल सुनावणीवर प्रलंबित आहे.

**********************

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

### लक्षवेधी सूचना क्र:-६३९

श्री. विजय वडेट्टीवार, श्री. सुरेश वरपुडकर, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. अशोकराव चव्हाण, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. अस्लम शेख, श्री. सुनिल केदार, श्री. विकास ठाकरे, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्रीमती सुलभा खोडके, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. राजेश एकडे, श्री. बळवंत वानखडे, श्री. संग्राम थोपटे, श्री. रोहित पवार, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. प्रकाश सोळंके, श्री. बबनराव लोणीकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र. ६३९ पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यातील जवळपास २७ हजार संगणक परिचालकांमार्फत शासनाच्या अनेक योजना व सुविधा ग्रामपंचाय स्तरावरील सर्वसामान्य ग्रामस्थांना पुरविण्यात येत असणे, डिजिटल सेवा पुरविणारे संगणक परिचालक किंवा डाटा एंट्री ऑपरेटर यांना मानधन स्वरूपात केवळ ६ हजार ९३० रूपये दिले जात असल्यामुळे त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असणे, सदरहू मानधन वेळेत न मिळणे, ऑगस्ट, २०२३ मध्ये नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्यातील हिप्परगाथाडी येथील परिचालकाने मिळत असलेली तुटपुंजी रक्कम व शासनाच्या उदासीन धोरणाला कंटाळून आत्महत्या करण्याची गंभीर बाब घडणे, दिनांक ६ जून, २०१८ रोजी शासनाकडे सादर करण्यात आलेल्या यावलकर समितीच्या शिफारशीनुसार संगणक परिचालक पद कायस्वरूपी निर्माण करून त्यांना जिल्हा परिषद, नगरपंचायतीमधील कर्मचाऱ्यांप्रमाणे किमान वेतन लागू करण्याची व इतर सर्व सुविधा देण्याची त्यांची मागणी असणे, परंतु तोपर्यंत त्यांच्या मानधनात वाढ करून ते वेळेवर देण्याची मागणी, संगणक परिचालकांकडून विविध सनदशीर मार्गाने शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात येणे, परंतु स्थानिक नागरिकांच्या सोयीसाठी काम करणाऱ्या संगणक परिचालकांच्या मागण्यांकडे झालेल्या दुर्लक्षामुळे त्यांच्यामध्ये व त्यांच्या कुटुंबियांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने अभय यावलकर समितीच्या शिफारसी लागू करून संगणक परिचालकांच्या मागण्या मंजूर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

### मा. मंत्री (ग्रामविकास) यांचे निवेदन

आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पामार्फत ग्रामपंचायत स्तरावरील विविध सुविधा ग्रामस्थांना पुरविण्यात येतात, राज्यात आतापर्यंत १४,६६५ स्वतंत्र आपले सरकार सेवा केंद्र व ६,१२७ क्लस्टर आपले सरकार सेवा केंद्र असे एकूण २०,७९२ आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करण्यास संबंधित ग्रामसभेने मान्यता दिली असून त्या अंतर्गत २७,८३९ ग्रामपंचायतींचा समावेश आहे. त्यापैकी सीएससी-एसपीव्ही मार्फत २०,०२१ ठिकाणी केंद्र चालकांची नियुक्ती करून केंद्र कार्यान्वित केली आहेत. आपले सरकार सेवा केंद्रामार्फत G2G व G2C सेवा देण्यासाठी केलेल्या कामाच्या प्रमाणात जास्तीत जास्त रु. ७०००/- इतकी प्रति माह मोबदल्याची रक्कम

संबंधित ग्रामपंचायत त्यांच्या स्वनिधीतून प्रचलित देयक संगणक प्रणालीनुसार सीएससी-एसपीव्ही मार्फत केंद्र चालकांच्या बँक खात्यात वर्ग केली जाते. आपले सरकार सेवा केंद्रातील केंद्रचालक हे ग्रामोद्योजक (Village Level Entrepreneur- VLE) असल्याने उपरोक्त मानधनाव्यतिरिक्त इतर B2C सेवा ग्रामस्थांना पुरविल्यावर त्याचा अतिरिक्त मोबदला त्यांना देय असतो. केंद्रचालकांनी सदर सेवा पुरविल्यामुळे त्यांच्या उत्पन्नात निश्चित वाढ होईल.

दि. १०.०८.२०२३ रोजी मौ. हिप्परगा (थडी), ता. बिलोली, जि. नांदेड येथील ग्रामपंचायत स्तरावर कार्यरत असलेले कै. अंबादास नागोराव पेटेकर, वय वर्ष ३० यांनी ग्रामपंचायतीमध्ये गळफास घेवून आत्महत्या केली आहे. तथापि, संबंधीताचा मृत्यु त्याच्या वैयक्तीक कारणामुळे झालेला आहे. कमी मानधन मिळत आहे किया वेळेवर मानधन मिळत नाही याबाबत संबंधीत केंद्रचालकाने ग्रामपंचायत / पंचायत समितीला कधीही पत्रव्यवहार केलेला नाही. तसेच संबंधीताच्या आत्महत्येच्या अनुषंगाने पोलीस दप्तरी अप्राकृतिक मृत्यु म्हणून नोंद करण्यात आलेली आहे.

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे वेतन वाढ व आकृतीबंध सुधारित करण्यासाठी दि. २ फेब्रुवारी, २०१७ रोजी गठीत यावलकर समितीने ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या सुधारित आकृतीबंधामध्ये डाटा ऑपरेटर हे नवीन पद अंतर्भूत केले असून १००० ते १०००० पर्यंतच्या लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीमध्ये लिपिक किंवा डाटा ऑपरेटरचे १ पद व १०००० वरील लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीमध्ये लिपीकाची दोन व डाटा ऑपरेटरचे एक पद भरण्याची शिफारस केली आहे. सदर शिफारसीचा अद्याप शासनाकडून स्वीकार करण्यात आलेला नाही.

प्रस्तुत प्रकरणी नमूद करण्यात येते की, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम मधील कलम ६१ अनुसार ग्रामपंचायतींना त्यांचे कर्मचारी नेमण्याचे संपूर्ण अधिकार आहेत. ग्रामीण पातळीवर आपले सरकार कक्षामध्ये कंत्राटी पद्धतीने कार्यरत संगणक परिचालक हे ग्रामपंचायतीचे कर्मचारी नसून त्यांची नेमणूक बाह्य यंत्रणेमार्फत सी.एस.सी कंपनीमार्फत करण्यात येते. यावलकर समितीने शिफारस केलेल्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या सुधारित आकृतीबंध प्रस्तावामध्ये आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पातील कार्यरत संगणक परिचालक यांना ग्रामपंचायतीमध्ये सामावून घेऊन ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्याबाबत कोणतीही शिफारस केलेली नाही.

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे आकृतीबंध सुधारित करण्याबाबतच्या नस्तीवर वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्द्यांच्या अनुषंगाने सर्व विभागीय आयुक्तांमार्फत सर्व मुख्य कार्याकारी अधिकारी यांच्याकडून माहिती मागविण्यात आली होती. प्राप्त माहितीच्या अनुषंगाने ही नस्ती वित विभागास फेरसादर करण्यात आली आहे.

*****************

महाराष्ट्र विधानसभा- सन २०२३ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

विधानसभा लक्षवेधी सूचना क्र १३४२ .

~~मा.श्री~~. माणिकराव कोकाटे, श्री. दिलीपराव बनकर, वि.स.स. यांनी **महाराष्ट्र विधानसभा नियम १०५** अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना क्र. १३४२** खालीलप्रमाणे आहे.

"बांधपाडा, ता. उरण, जि. रायगड ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत ग्रामविकास अधिकारी यांनी शासकीय निधीचा अपहार करण्यासाठी रस्ता व गटार सफाईच्या कामामध्ये खोटया स्वाक्षऱ्या व कागदपत्रे यातून रु.१० लक्षचा अपहार करणे कामाची अदाजपत्रकें, मुल्याकने उपअभियंता बां. उपविभाग पनवेल यांच्यामार्फत देण्यात आल्याचे दर्शविणे परंतु उपअभियंताच्या खोट्या स्वाक्षऱ्या करुन अपहार करणे हि बाब वसुलपात्र असल्याचे दोषारोप पत्रातील विविरणपत्रामध्ये मुख्यकार्यकारी अधिकारी, जि.प. रायगड यांनी नमूद केलेले असतांना ग्रामविकास अधिकारी यांच्यावर कारवाई न होणे, सदर ग्रामपंचायतीमध्ये ग्रामपंचायत लेखा संहिता २०११ मधील नमुद वित्तीय औचित्य सुत्रांचे पालन केलेले नसणे ई निविदा पध्दत न वापरता पुरवठादारांची निवड करणे निधी खर्चात अनियमितता केलेली असणे, दिवाबत्ती साहित्य खरेदी करताना देखील ईनिविदा न करणे, साठारजिस्टरला नोंद न घेणे खरेदी प्राप्त साहित्य उपलब्ध करुन न देणे या सुत्रांचा भग करणे याशिवाय ग्रामपंचायत चाणजे अंतर्गत वसुल घरपट्टीची रु.९ लक्ष ग्रामनिधी खात्यावर न भरता स्वतः कडे बाळगणे ग्रामपंचायत अंतर्गत कामे करणाऱ्या कंत्राटदारांकडून मोठमोठ्या रक्कमा हया स्वतःच्या खात्यावर वर्ग करणे अशाप्रकारे महा.जि.प.जि.सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चे कलम ३ चा भंग करणे असे असतांना सदर ग्रामविकास अधिकारी यांचेवर शिस्तभंगाची कारवाई न होणे, त्यामुळे येथील नागरीकामध्ये शासनाविषयी प्रचंड असंतोष निर्माण होणे सदरप्रश्नी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया "

**मा. मंत्री ( ग्राम विकास ) यांचे निवेदन**

ग्रामपंचायत बांधपाडा, ता. उरण येथील ग्रामविकास अधिकारी यांनी दिनांक २३.१२.२०२१ ते १८.२.२०२२ या कालावधीत अंतर्गत रस्ते व गटर सफाईच्या कामावर रु. १०,१५,०००/- रक्कम खर्च केल्याचे दाखवून या करिता ग्रामपंचायत दप्तरी उपलब्ध असलेले अंदाजपत्रक व मुल्यांकन उप अभियंता, बांधकाम, रायगड जि. प. उपविभाग, पनवेल यांच्या मार्फत देण्यात आल्याचे दाखविले आहे. तथापि, उप अभियंता, बांधकाम, रायगड जि. प. उपविभाग, पनवेल यांनी सदर अंदाजपत्रके व मुल्यांकन दिले नसल्याचे कळविले. याप्रमाणे शासकीय निधीचा अपहार करण्याकरिता खोट्या कागदपत्रांची जुळवाजुळव करून रु. १०,१५,०००/- इतकी रक्कम रोखीने काढल्याचे दिसून येते. सदरची रक्कम वसुलपात्र रक्कम सिद्ध होत असल्याने तसेच इतर बाबींतील अपहार यासाठी विभागीय आयुक्त कोकण विभाग, कोकण यांनी दिनांक ११.४.२०२३ रोजी या प्रकरणी संबंधितांकडून ग्रामनिधीच्या खात्यातून रोखीने काढलेली रक्कम रु. १०,१५,०००/-, साहित्य खेरदी अपहारित रक्कम रु. १४,२२,६७५/- आणि मुल्यांकनापेक्षा जादा रक्कम रु. ४०००/- वसूल करण्यात यावी,तसेच संबंधितांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा आणि सरपंच यांना पदावरून काढून टाकण्यात येत आहे, असे आदेश दिलेले आहेत. सदर आदेशाप्रमाणे कारवाई करण्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. , रायगड यांच्या दिनांक ३.५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये गट विकास अधिकारी, पंचायत समिती उरण यांना कळविले आहे. या प्रकरणी श्रीमती विशाखा ठाकूर, सरपंच

ग्रुप ग्रामपंचायत, बांधपाडा, ता. उरण यांनी शासनाकडे अपील दाखल केले असता पुढील चौकशीसाठी विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण यांच्या दिनांक ११.४.२०२३ रोजीच्या आदेशास शासनाने दिनांक १९.५.२०२३ रोजीच्या आदेशान्वये स्थगिती दिलेली आहे. ग्रामपंचायत बांधपाडा, ता. उरण येथे साहित्य खरेदीमध्ये अनियमितता झाल्याचे दिसून आले आहे. तसेच संबंधित ग्राम विकास अधिकारी यांनी ग्रामपंचायत चाणजे, ता. उरण येथील घरपट्टी रक्कम ग्रामनिधी खात्यावर भरणा केलेली नाही. सदर अनियमितेस जबाबदार असणाऱ्या ग्राम विकास अधिकारी यांच्याविरुद्ध जिल्हा परिषदेने खाते चौकशी सुरू केली आहे आणि गट विकास अधिकारी यांना शासन शुद्धीपत्रक क्र. व्हीपीएम-२०१९/ प्र.क्र. २८१/ पं. रा. ३, दि. १८.९.२०१९ नुसार संबंधितविरुद्ध कार्यवाही करण्याचे कळविले आहे.

---

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

**श्री.सुनिल केदार, श्री.अस्लम शेख, श्री.सुभाष धोटे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१७३ पुढीलप्रमाणे आहे:-**

"महाराष्ट्र राज्यातील इमारत बांधकाम व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळ मुंबई यांच्या माध्यमातून सन २०२० ते ३१/१०/२०२३ या कालावधीतील अटल आहार योजनेत हजारो कोटी झालेला गैरव्यवहार कामगाराच्या बनावट नोंदणी आखडा फुगवीने, खोटे बिले तयार करणे, अनेक जिल्ह्यात आहार पुरवठादार व सहाय्यक कामगार आयुक्त कामगाराच्या माध्यमातून शासनाची केलेली दिशाभूल, राज्यातील ३ कंपन्यांना संधी देवून ४२ प्रभागामध्ये सन २०१९ ते २०२३ या कालावधीत कोट्यावधी रुपयाचे बनावट बिले लाटण्यात आले करारनाम्यातील अटीशर्तीनुसार आहारपुवठा न करणे आदेशातील अटी शर्ती भंग करुन संगनमतातून गुनिना कमर्शियल लिमिटेड मे. इंडो अलाईट फ्रुट्स लि. मुंबई, मुंबई पारसमल पगारिया जस्ट किचन नागपूरच्या माध्यमातून शासनाची दिशाभूल करुन अधिकाऱ्यासह नियमबाह्य अटल आहार वाटप व सुरक्षाकिट वाटप योजनेत झालेला भ्रष्टाचार चंद्रपूर जिल्ह्यातून प्राप्त झालेल्या तक्रारीकडे होणारे दुर्लक्ष व चौकशीला होणारे विलंब पावसाळी अधिवेशन मा. मंत्री कामगार यांनी घोषित केलेल्या चौकशी समिती कडुन अहवाल सादर करण्यास होणारे विलंब अधिवेशन कालावधीनंतर लाभार्थ्यांची झालेली घट पोलीसअधीक्षक जिल्हाधिकारी यांच्याकडे दिलेल्या तक्रारी व कामगार विभागाकडे प्राप्त झालेल्या अहवालावर कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई कामगाराची झालेली फसवणूक कामगारांचा वाढता असंतोष सातत्याने वर्तमानपत्रात झळकणाऱ्या बातम्या लोकप्रतिनिधिकडून वाढत्या तक्रारी दोषींवर कार्यवाही करण्याकरीता शासनाकडून होणारी दिरंगाई याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

## मा.मंत्री (कामगार) यांचे निवेदन

केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगारांना सुरक्षा, आरोग्य आणि कल्याणकारी उपाययोजनांच्या तरतुदीसाठी पारीत केलेल्या इमारत आणि इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) कायदा, १९९६ अंतर्गत महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार नियम, २००७ निर्गमित केले असून उक्त अधिनियमाच्या कलम १८ अन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र राज्यात नोंदीत बांधकाम कामगारांपैकी मोठया प्रमाणावर बांधकाम कामगार अन्य राज्यातून स्थलांतरीत झालेले आहेत. तसेच ग्रामीण भागातूनही बरेच बांधकाम कामगार रोजगार मिळण्यासाठी शहरात येतात. सदर बांधकाम कामगारांकरीता बांधकामाच्या ठिकाणी निवासाची पुरेशी व्यवस्था नसते. तसेच, स्वयंपाक करणेही जिकरीचे ठरते. त्याचा परिणाम बांधकाम कामकाजावरही होतो. यास्तव कामगार विभाग व मंडळाने मध्यान्ह योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार मध्यान्ह भोजन वितरणाकरीता ई-निविदा प्रक्रिया राबवून विभागीय स्तरावर १.मुंबई व नवी मुंबई, औरंगाबाद विभाग, २. नाशिक व कोकण विभाग (मुंबई व नवी मुंबई वगळून) व ३. पुणे विभाग, अमरावती विभाग व नागपूर विभाग अशा एकूण तीन गटाकरीता मध्यान्ह भोजन योजना राबविण्याकरीता तीन संस्था नियुक्त करण्यात आल्या होत्या.

निविदेतील अटी शर्तीनुसार प्रथम मुंबई/नवी मुंबई, ठाणे व नागपूर या तीन जिल्हयात तसेच पुणे व पालघर या दोन जिल्हयासह एकूण पाच जिल्हयात मध्यान्ह भोजन योजना प्रायोगिक तत्वावर राबविण्यात आली. तदनंतर टप्याटप्याने सर्व जिल्हयात मध्यान्ह भोजन योजना सुरू करण्यात आली.

जिल्हा स्तरावर बांधकाम कंत्राटदार, विकासक, कामगार संघटना, कामगार नाके, विटभट्टी मालक यांच्या मागणीनुसार जिल्हयाचे सहायक कामगार आयुक्त/सरकारी कामगार अधिकारी यांनी निवड केलेल्या बांधकामाच्या ठिकाणावरील नोंदीत व अनोंदीत कामगारांना मध्यान्ह भोजन पुरवठयास मान्यता देतात. संबंधित विभागीय व जिल्हा कार्यालयाच्या तपासणी व शिफारस अहवालांव्दारे मध्यान्ह भोजन संख्या वाटप केल्याची खात्री केल्याचे प्रमाणिकरण करण्यात येते त्या आधारे मध्यान्ह भोजनाच्या देयकांची अदायगी करण्यात आली असून कुठेही कागदोपत्री कामगार दाखवून ठेकेदारांना रक्कम मंजूर केली जात नाही.

सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्याकडील गठित समितीचा चौकशी अहवालाच्या अनुषंगाने मंडळाच्या दिनांक ११.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये विविध मुद्यांची माहिती सादर करण्याबाबत अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने निवासी उपजिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्याकडून दिनांक १९.०७.२०२३ अन्वये प्राप्त झालेला अहवाल त्याचप्रमाणे विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये मा. मंत्री (कामगार) यांनी दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांच्या तक्रारीची चौकशी करण्यासाठी शासनाने दिनांक ०१.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे.

तसेच मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना सुरक्षा व अत्यावश्यक संच वाटप करण्यात येत आहेत. सदर संच वाटप करतेवेळी नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगाराचा संच स्विकारात असल्याचा फोटो, सुरक्षा संच प्राप्त झाल्याची बांधकाम कामगाराची स्वाक्षरी /उजव्या व डाव्या अंगठयाचे ठसे, वितरण पावतीवर नोंदणी अधिकाऱ्याची स्वाक्षरी व शिक्का व बांधकाम कामगाराची पोचपावती प्राप्त करून घेण्यात येते. त्यानुसार संबंधित जिल्हा कार्यालय प्रमुख (सरकारी कामगार अधिकारी/सहायक कामगार आयुक्त) व विभागीय कार्यालयाच्या (कामगार उप आयुक्त/अपर कामगार आयुक्त) तपासणी व शिफारस अहवालांव्दारे देयके मंडळामार्फत अदा करण्यात येतात. त्यामुळे सदर योजनेमध्ये भ्रष्टाचार झाला ही बाब वस्तुस्थितीस धरून नाही.

*************************************************************

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

**श्री.निलेश लंके, श्री.राजकुमार पटेल, श्री.विजय वडेट्टीवार, श्री.अमिन पटेल, श्री.धिरज देशमुख, श्री.राजेश एकडे, श्री.सुनिल केदार, श्री.विकास ठाकरे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१४३९ पुढीलप्रमाणे आहे:-**

"नोव्हेंबर २०२३ च्या शेवटच्या आठवडयात वा त्या सुमारास महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे नोंदणीकृत कामगारांची आरोग्य तपासणी एच.एल.एल.लि. या संस्थेमार्फत केली जात असणे, श्री. उमेश अग्निहोत्री यांनी दिनांक २९ डिसेंबर २०२२ रोजी कामगार मंत्री, दिनांक ०८ जून २०२३ रोजी जिल्हाधिकारी वर्धा, ०५/०६/२०२३ रोजी अपर कामगार आयुक्त-नागपूर, यांनी लेखी निवेदन पुराव्यासह सादर केल्याची बाब उघडकीस येणे, वर्धा जिल्हयात २०२०/२१ ते २०२३ या ५ वर्षाच्या काळात ३५,९३१ कामगारांची आरोग्य तपासणी करण्यात येणे, त्या तपासणी चे रिपोर्ट त्या कामगारांना अद्यापी देण्यात न येणे, संबंधित कंपनीला सन २०२० पासून ९,३६,३७,१२५ रू. अदा करण्यात येणे, म्हणजेच ३५,९३१ कामगारांना सरासरी २६०६ रूपये एका कामगारामागे शासनाने खर्च करणे, आरोग्य तपासणी करीता हा दर सर्वाच्च असणे, ३५९३ कामगारांना तपासणी अहवाल न देता कामगार कामगार विभागाचे अधिकारी व एच.एल.एल.लि. यांच्यात झालेल्या आर्थिक हात मिळवणीमुळे कंपनीचा बेकायदेशीर केलेल्या कोटयवधी रूपयांचा फायदा, यामुळे वर्धा जिल्हयातील लाखो कामगार व त्यांच्या कुटुंबियांचा शासनाच्या या योजनेवरील उडालेला विश्वास व एच.एल.एल. लि. आणि संबंधित अधिकारी शासनाची फसवणूक करून कोटयवधी रूपयांची लूट करत असल्याबद्दल निर्माण झालेली तीव्र चीड, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

## मा.मंत्री (कामगार) यांचे निवेदन

केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगारांना सुरक्षा, आरोग्य आणि कल्याणकारी उपाययोजनांच्या तरतुदीसाठी पारीत केलेल्या इमारत आणि इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) कायदा, १९९६ अंतर्गत महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार नियम, २००७ निर्गमित केले असून उक्त अधिनियमाच्या कलम १८ अन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे.

इमारत व इतर बांधकामाच्या ठिकाणी काम करणाऱ्या बांधकाम कामगारांना त्यांच्या कामाच्या स्वरूपानुसार विविध आजारांना सामोरे जावे लागते. बांधकाम कामगारांचे आर्थिक स्थिती अत्यंत कमकुवत असल्याने आजारावरील औषधोपचार वेळीच घेतले जात नाहीत. परिणामी, काही आजार गंभीर स्वरुप धारण करतात. बांधकामाच्या ठिकाणी काम करत असलेल्या कामगारांची नियमित आरोग्य तपासणी करून त्यावर वेळीच उपचार केल्यास बांधकाम कामगारांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करणार नाही.

यास्तव महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांची वर्षातुन एकदा एकुण १७ प्रकारच्या विविध चाचण्यामार्फत रू.१९५०/- प्रति बांधकाम कामगार (लाभार्थी) या दराने आरोग्य तपासणी करण्यासाठी मे. एच.एल.एल. लाईफकेअर लिमिटेड या संस्थेची नियुक्ती करण्यात आली होती.

वर्धा जिल्हयामध्ये सदर योजनेअंतर्गत माहे ऑगस्ट २०१९ ते माहे फेब्रुवारी २०२३ अखेर एकुण २३,०९२ इतक्या नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

दरम्यान मंडळामार्फत नोंदित सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगार लाभार्थ्यांच्या घरोघरी जाऊन आरोग्य तपासणी करण्यास तसेच आरोग्य तपासणी योजनेचा लाभ नोंदित सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगार लाभार्थी व त्यांच्या कुंटुबांमधील यथास्थिती पती/ पत्नी आणि त्यांची दोन अविवाहित १० वर्षावरील अपत्ये यांना २३ प्रकारच्या विविध आरोग्य तपासणी चाचण्या रू.३९००/- प्रति लाभार्थी या दराप्रमाणे करण्यासाठी दिनांक ०१.०३.२०२३ व दिनाकं ०२.०५.२०२३ अन्वये कार्यादेश देण्यात आले.

त्यानुसार वर्धा जिल्हयामध्ये माहे मार्च २०२३ ते ऑगस्ट २०२३ अखेर एकुण २२,५८० इतक्या नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करण्यात आली. ऑगस्ट २०१९ ते ऑगस्ट २०२३ अखेर या चार वर्षाच्या कालावधीत ४५.६७२ इतक्या नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करण्यात आली असून मे. एच.एल.एल.लाईफकेअर लिमिटेड यांनी मंडळाकडे माहे ऑगस्ट २०२३ अखेर ३५,९३१ लाभार्थ्यांच्या आरोग्य तपासणीची देयके सादर केली आहेत.

वर्धा जिल्हामध्ये सरकारी कामगार अधिकारी तथा उपजिल्हा कार्यकारी अधिकारी यांच्या लेखी मान्यतेने बांधकाम कामगारांच्या संख्येनुसार बांधकाम ठिकाणांची निवड करून त्या ठिकाणी मे. एच.एल.एल. लाईफकेअर लिमिटेड या संस्थेकडून आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आलेले आहे. तसेच बांधकाम कामगारांच्या कुटुंबियांची घरोघरी जाऊन (Door to Door) आरोग्य तपासणी करण्यात आलेली आहे.

सदर योजनेअंतर्गत आयोजित करण्यात येणाऱ्या आरोग्य तपासणी शिबीर आणि घरोघरी जाऊन देण्यात येणाऱ्या आरोग्य तपासणी भेटीमध्ये संबंधित लाभार्थ्यांना त्यांचे आरोग्य तपासणी अहवाल हस्तपोच देण्यात येतात व तसे सरकारी कामगार अधिकारी, वर्धा आणि अपर कामगार आयुक्त, नागपूर यांनी कॅम्प कम्पलीशन सर्टीफीकेटव्दारे प्रमाणीत केलेले आहे. तसेच आरोग्य तपासणीनंतर संबंधित बांधकाम कामगाराने मंडळाकडे नोंद केलेल्या मोबाईल क्रमांकावर एसएमएसव्दारे https://mcwwb.myhindlab.com या संकेतस्थळाची लिंक पाठविण्यात येते. ज्याव्दारे सदर संकेतस्थळावरील Health Report या आयकॉनवर क्लिक केल्यास लाभार्थ्यांचा नोंदणी क्रमांक बांधकाम कामगाराचे नाव/मोबाईल नंबर इत्यादी माहितीच्या आधारे सर्व २३ चाचण्यांचे आरोग्य तपासणी अहवाल उपलब्ध होतात.

जिल्हा कार्यालय प्रमुख (सरकारी कामगार अधिकारी/सहायक कामगार आयुक्त) व विभागीय कार्यालय प्रमुख (कामगार उप आयुक्त/अपर कामगार आयुक्त) यांनी देयकासोबत सादर केलेल्या कॅम्प कम्पलीशन सर्टीफीकेट व त्याव्दारे संबंधित कार्यान्वयीन यंत्रणांनी - आरोग्य तपासणी शिबीर पूर्व लेखी संमती, लाभार्थ्यांना त्यांचे आरोग्य तपासणी अहवाल हस्तपोच दिल्याचे, तसेच देयकाच्या अचुकतेबाबत केलेले प्रमाणीकरण (Certification) व देयकाच्या अदायगीबाबत केलेल्या शिफारस अहवालांच्या आधारे मंडळाकडे सादर होणाऱ्या देयकांची मंडळ व मे. एच.एल.एल. लाईफकेअर लिमिटेड यांच्याव्दारे विकसीत आरोग्य तपासणी पोर्टलवरील (mbocw.myhindlab.com) लाभार्थ्यी व कॅम्प् संख्या यांच्याशी पडताळणी करून करार मान्य दरानुसार आवश्यक कपातीसह आजअखेर रू. ९,३६,३७,१२५ एवढया रक्कमेची देयके मे. एचएचएल लाईफकेअर लिमिटेड या संस्थेस अदा करण्यात आली आहेत .

*************************************************************

**लक्षवेधी सूचना क्रमांक ६०८**

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे हिवाळी (तिसरे) अधिवेशन**

**महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये लक्षवेधी सूचना**

श्री. विजय वडेट्टीवार मा. वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ६०८ खालील प्रमाणे आहे:-

"गडचिरोली जिल्हयातील भामरागड, अहेरी आणि मुलचेरा तालुक्यात रोजगार हमी योजनेत अंदाजे १० कोटी रुपयांचा गैरव्यवहार निदर्शनास येणे, या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली यांच्याकडून चौकशी समिती नेमण्यात येणे, या चौकशी समितीने प्रत्यक्षात कामे न करता १० कोटी रुपये उचलल्याचा अहवाल जिओ टॅगच्या फोटोसह मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., गडचिरोली यांचेकडे सादर करणे, या अहवालात रोहयो कामांच्या गैरव्यवहार प्रकरणी आर्थिक अपहार झाल्याचे स्पष्ट अभिप्राय असून तिनही गटविकास अधिकाऱ्यांसह २३ अधिकारी/कर्मचारी दोषी असल्याचा ठपका ठेवणे, परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प., गडचिरोली यांनी गटविकास अधिकारी व शाखा अभियंता यांच्याशी आर्थिक संगनमत करुन फक्त ग्रामसेवकांचे निलंबन व कंत्राटी कर्मचाऱ्यांची सेवा समाप्ती करणे, तथापि या आर्थिक गैरव्यवहाराचे मुख्य सुत्रधार असणाऱ्या गटविकास अधिकारी व शाखा अभियंता यांच्यावर केवळ वेतनवाढ थांबविणे, विभागीय चौकशी प्रस्तावित करणे यासारखी किरकोळ कारवाई करुन कोणतीही ठोस कारवाई करण्यात न येणे, यासंदर्भात चौकशी समितीने दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने संबंधित गटविकास अधिकारी व शाखा अभियंता यांना तात्काळ सेवेतून निलंबित करून त्यांना पाठीशी घालणाऱ्या मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली या तिघांची आर्थिक गुन्हे विभागांकडून चौकशी करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया."

**मा. मंत्री (रोहयो) यांचे निवेदन**

निवासी उपजिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्या दिनांक ८/१२/२०२२ च्या पत्रान्वये भामरागड, मुलचेरा व अहेरी (जि. गडचिरोली) या तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत झालेल्या कामांबाबत तक्रार प्राप्त झाली होती. त्यास अनुसरून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांनी दि. २२/१२/२०२२ च्या आदेशान्वये उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रां.पं.) जिल्हा परिषद, गडचिरोली यांचे अध्यक्षतेखाली सहा सदस्यीय चौकशी समिती नेमली. या समितीने सादर केलेल्या अहवालानुसार भामरागड, मुलचेरा व अहेरी या तालुक्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत झालेल्या कामांमध्ये वेगवेगळया अनियमितता झाल्या असून सदर अनियमिततेसाठी या तिनही तालुक्यातील अधिकारी व कर्मचारी हे जबाबदार असल्याचे निदर्शनास आले.

सदर चौकशी प्रकरणात २६ अधिकारी/कर्मचारी पैकी भामरागड तालुक्यातील ११, अहेरी तालुक्यातील ८ व मूलचेरा तालुक्यातील ७ अनियमिततेसाठी जबाबदार असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली व त्यानंतर पंचायत समिती, भामरागड व अहेरी येथील ३ ग्रामसेवक यांना निलंबित करुन विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. तसेच श्री. प्रतिक चन्नावर, गटविकास अधिकारी पंचायत समिती अहेरी यांची एक वार्षिक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात थांबविण्यात

आली आहे. तसेच १ तांत्रिक सहाय्यक (कंत्राटी) यांची सेवा समाप्त करण्यात आली आहे. १ तांत्रिक सहाय्यक (कंत्राटी) यांना दंडाची शिक्षा केली आहे. शाखा अभियंता १ व उर्वरीत ग्रामसेवक यांचेवर विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. सदर योजनेशी संबंधित अन्य २ कनिष्ठ अभियंता, २ विस्तार अधिकारी (पंचायत) व २ सहाय्यक लेखा अधिकारी यांच्या दोन वार्षिक वेतनवाढी तात्पुरत्या स्वरुपात थांबविण्यात आल्या आहेत. पंचायत समिती, मुलचेरा येथील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत तत्का. गट विकास अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत) शाखा अभियंता १, तांत्रीक सहाय्यक (कंत्राटी)१, ग्रामसेवक ३ व सहाय्यक लेखा अधिकारी १ यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच श्री.स्वप्नील मगदूम, गट विकास अधिकारी, पंचायत समिती भामरागड यांच्याविरूध्द विभागीय चौकशी सुरू करण्यास शासनाने दि.२८/०८/२०२३ च्या पत्राने मान्यता दिली आहे.

पंचायत समिती, मुलचेरा येथील मग्रारोहयो अंतर्गत तांत्रीक बाबींची पुर्नचौकशी करण्याकरीता चौकशी समिती नेमण्यात आली होती. अध्यक्ष चौकशी समिती तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद, गडचिरोली यांचा चौकशी अहवाल तसेच उपविभागीय जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद (ल.पा.) उपविभाग चामांशी तथा सदस्य चौकशी समिती यांचा अतिप्रदान झालेल्या रक्कमेचा अहवाल प्राप्त झाला असून त्याअनुषंगाने तिनही तालुक्यातील सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना जिल्हाधिकारी गडचिरोली यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

वरील प्रकरणी गडचिरोली जिल्हयातील भामरागड, अहेरी आणि मुलचेरा तालुक्यात रोहयो अंतर्गत कामात झालेल्या गैरव्यवहाराच्या चौकशी अहवालास अनुसरून सदर अनियमिततेच्या घटनेमध्ये एका पेक्षा जास्त अधिकारी व कर्मचाऱ्याचा समावेश असल्याने म.ना.से.(शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम १२ नुसार एकत्रित विभागीय चौकशीची कार्यवाही करणे आवश्यक आहे. या नियमातील तरतुदी विचारात घेऊन विभागीय आयुक्त, नागपूर यांच्याकडून एकत्रित विभागीय चौकशीचा प्रस्ताव मागविण्यात आला असून त्यास शासन मान्यता दिल्यानंतर या प्रकरणातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांची उक्त नियमातील नियम ८ नुसार सखोल विभागीय चौकशी करण्यात येईल. चौकशीअंती दोषी आढळलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांविरूध्द शिक्षेबाबतची यथोचित कार्यवाही करण्यात येईल.

****************

लक्षवेधी सूचना क्रमांक २०४८

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२३ चे हिवाळी (तिसरे) अधिवेशन**
**महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये लक्षवेधी सूचना**

---

श्री. नितीन पवार मा. वि. स. स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २०४८ खालील प्रमाणे आहे:-

**"महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ शिबिर कार्यालय बांधकाम भवन नाशिक येथील महिला कार्यकारी अभियंता श्रीमती वर्षा जीवन पवार अहिरे यांनी शासकीय सेवेत वरिष्ठ पदावर कार्यरत असताना देखील महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभाची सिंचन विहिरीचा लाभ घेऊन शासनाची फसवणूक केल्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, श्रीमती अहिरे यांची स्वमालकीची शेत जमीन गट नंबर ७२५/२ मौजे छडवेल पखरून (ता.साक्री जि.धुळे) येथील क्षेत्रामध्ये सिंचन विहीर अनुदान रूपये तीन लक्ष स्वरूपात मिळवून घेणे, श्रीमती पवार अहिरे यांनी स्वतःच्या नावाने जॉब कार्ड बनवून घेणे, पंचायत समिती साक्री, तालुका साक्री जिल्हा धुळे येथे प्रस्ताव मंजुरीसाठी देणे, सदरच्या प्रस्तावात ग्रामसभेचा ठराव नंबर २१ ग्रामपंचायत छडवेल यांनी पारित केलेला आढळून येणे, सदर योजनेचा लाभ मिळवून देण्यात ग्रामपंचायत रोजगार सेवक, ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी यांनी संगनमत केल्याचे आढळून येणे, सदरची असे असताना देखील याबाबत प्रशासनाने कोणतीही ठळक कारवाई करण्यात न येणे अनियमितता करणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांना संरक्षण देण्याची भूमिका प्रशासनाने घेतली असणे त्यामुळे भविष्यात देखील अशाच प्रकारे अनियमितता होण्याचा वाढलेला धोका याबाबत शासनाने सक्तीने तात्काळ कारवाई करण्याची असणारी आवश्यकता, शासनाचे सदर बाबीकडे होत असणारे दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."**

## मा. मंत्री (रोहयो) यांचे निवेदन

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभाचे व सार्वजनिक हिताची कामे निवडीचे अधिकार ग्रामसभेस देण्यात आलेले आहेत. त्यानुसार वैयक्तीक सिंचन विहीरीच्या कामांकरीता दि.१७/१२/२०१२ च्या शासन निर्णयानुसार मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार मौजे छडवेल, ता. साक्री, जि. धुळे या ग्रामपंचायतीने दिनांक २४/११/२०१५ रोजी घेतलेल्या ग्रामसभेत वैयक्तीक सिंचन विहीर लाभाकरीता लाभार्थ्यांची निवड केली. त्यात श्रीमती वर्षा जीवन पवार यांचा समावेश होता. मौजे छडवेल ग्रामपंचायतीने श्रीमती वर्षा जीवन पवार यांचा विहीत नमुन्यात प्रस्ताव दिनांक २३/१२/२०१५ रोजी पंचायत समिती साक्री येथे दाखल केला होता. तद्नंतर छाननी अंती पात्र लाभार्थ्यांचे संबंधित अभियंता यांनी अंदाजपत्रक तयार करुन त्यास तांत्रिक मान्यता प्रदान केली. तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, साक्री यांनी दि. १२/०४/२०१७ रोजी प्रशासकीय मान्यता आदेश पारीत केले.

शासन निर्णय दि. १७/१२/२०१२ अन्वये वैयक्तिक जॉब कार्ड धारकास मनरेगा अंतर्गत मजूर म्हणुन काम करणे अनिवार्य आहे. श्रीमती पवार यांना जॉब कार्ड क्रं. MH-०७-००२-१४९- ००१/२२९१ निर्गमित झालेले आहे. श्रीमती पवार यांचे सिंचन विहीर कामांवर एकूण १३ हजेरीपत्रके निर्गमित केले असून या हजेरीपत्रकामध्ये श्रीमती पवार यांनी मजूर म्हणून काम केलेले नाही. श्रीमती पवार यांचे सिंचन

विहीर कामावर मोजमाप पुस्तीका मुल्यांकनानुसार मजुरी पोटी एकुण रुपये १,४६,७७३/- इतकी रक्कम व साहित्यासाठी एकूण १,३७,८८२/- इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे. सिंचन विहीर लाभार्थी श्रीमती पवार यांची प्रस्तुत प्रकरणी तक्रार झाल्यांनतर सिंचन विहीर कामांवर झालेला योजनेचा अकुशल व कुशल खर्च रुपये ३.०० लक्ष हा जिल्हा स्तरीय सेन्ट्रल बँक ऑफ इंडीया, मुख्य शाखा, धुळे येथे E-fims खाते क्रं. ३२४९४१५९४४ मध्ये दिनांक १६/०२/२०२२ रोजी स्वतःहून भरणा करुन त्याबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती, साक्री यांना अवगत केले.

लाभार्थी श्रीमती पवार यांच्या सिंचन विहीर संदर्भात संबधित तक्रारदार यांनी तक्रार केल्यानंतर या कामाच्या चौकशी करीता विस्तार अधिकारी ग्रामपंचायत यांची चौकशी अधिकारी म्हणून पंचायत समितीस्तरावरुन नियुक्ती करण्यात आलेली होती. विस्तार अधिकारी ग्रामपंचायत यांनी या कामाची सविस्तर चौकशी व दस्ताऐवज तपासुन चौकशी अहवाल दि. २६/१०/२०23 रोजी सादर केलेला होता. सदर चौकशी अहवालाच्या निष्कर्षानुसार लाभार्थी श्रीमती वर्षा जीवन पवार यांनी सिंचन विहीर मंजुरी कामी सादर केलेल्या प्रस्तावावर स्वाक्षरी नाही व शासनाच्या निकषानुसार ते लाभ घेण्यास पात्र नाही ही बाब गट विकास अधिकारी यांच्या निदर्शनास आणुन देणे आवश्यक होते. तसेच पंचायत समिती स्तरावर प्रस्तावाची छाननी करतांना श्री. अविनाश अहिराव, कनिष्ठ सहाय्यक यांनी प्रस्तावावर श्रीमती वर्षा पवार यांची स्वाक्षरी नाही ही बाब लक्षात न घेता मंजुरी कामी गट विकास अधिकारी यांच्याकडे नस्ती सादर केलेली आहे. तसेच तत्का. ग्रामसेवक श्री. जगदिश घुगे यांनी देखील विहीर मंजुर नंतर काम सुरु होण्यापुर्वी प्रशासकीय मान्यता आदेशातील अटी नुसार श्रीमती वर्षा जीवन पवार शासकीय सेवेत असल्याबाबत खातरजमा करुन सिंचन विहीर मंजुरी प्रस्ताव रद्द करणेकामी पंचायत समितीस अवगत करणे आवश्यक होते. सबब संबधित कर्मचारी यांनी कर्तव्यात कसूर केल्याने त्यांचेविरुध्द पुढील प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच श्रीमती पवार यांनी शासकीय योजनेचा चुकीच्या पध्दतीने लाभ घेतल्याने त्यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ नुसार उचित कार्यवाही करण्याबाबत संबधीतांना कळविण्यात येत आहे.

*****************

महाराष्ट्र विधानसभा

सन- २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

लक्षवेधी सुचना क्रमांक ४७०

**श्री. संग्राम थोपटे, श्री बाळासाहेब थोरात, श्री नानाभाऊ पटोले, श्री शिरीष चौधरी, श्री संजय जगताप, प्रा. वर्षा गायकवाड, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ४७० पुढीलप्रमाणे आहे :-**

"भोर, जि. पुणे शहरालगत सुमारे २५ एकर जागेत यापूर्वी दि. २६ नोव्हेंबर, २००८ रोजी नुसार झालेल्या उच्चाधिकार समितीच्या ५३ च्या बैठकीत आय.टी. पार्क तथा एम.आय.डी.सी. बाबत मंजूरी देण्यात आली असून २५ एकर जमीन भोर नगरपरिषदेच्या ताब्यात असणे, येथील मौजे उत्रौली व वडगांव डाळ येथे दिनांक २१ ऑक्टोबर, १९९२ रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अधिनियम १९६१ नुसार संपादनाची प्रकिया सुरु करण्यात येणे, त्यामुळे येथील जमीनीवर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ असा शेरा असणे, याशिवाय सदर दोन गावांमधील सुमारे २१३.३३ हे क्षेत्र संपादन करण्यासाठी उद्योग, उर्जा, कामगार विभागाने दिनांक २१ ऑक्टोबर, १९९२ रोजी अधिसूचना काढून महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ च्या तरतूदी लागू केल्या असणे, सदर अधिसूचनेनुसार भूसंपादनाची प्रकिया उपविभागीय अधिकारी, भोर यांच्याकडून कार्यान्वित होणे व संबंधितांना व्यक्तिगत भूसंपादनाच्या नोटिसा बजावण्यात आल्या असणे, परंतु अद्यापही सदर जमीन उद्योग विभागाकडे वर्ग करण्याबाबत शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी येथील बेरोजगार तरुणांत पसरलेले तिव्र असंतोषाचे वातावरण यामुळे शासनाने सदर जमीन उद्योग विभागाला वर्ग करुन येथे एम.आय.डी.सी. व मिनी एम.आय.डी.सी. करण्याबाबत याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिकिया".

मा. मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

भोर नगरपरिषद यांनी भोरेश्वर औद्योगिक वसाहतीसाठी दिर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्याने दिलेल्या २५ एकर जागेवर आय. टी. पार्क विकसित करण्यास उच्चाधिकार समितीच्या दि. ०७/८/२००८ रोजीच्या ५० व्या बैठकीत मान्यता प्रदान केली आहे.

भोर नगरपरिषदेने भोरेश्वर औद्योगिक वसाहत या संस्थेला नगरपरिषदेच्या मालकीची ३५ एकर मात्र दिर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्याने दिलेली आहे. भोरेश्वर औद्योगिक वसाहत यांनी सदर क्षेत्रावर औद्योगिक भूखंडांचे आरेखन केलेले असून त्यापैकी ७ भूखंड औद्योगिक प्रयोजनासाठी वापरात असून १४ भूखंडावर बांधकाम करणेत आलेले असल्याचे मुख्याधिकारी, नगरपरिषद भोर यांनी दि. ०३/५/२०११ रोजीच्या पत्राने म. औ. वि. महामंडळास कळविलेल आहे.

प्रचलित निकषानुसार माहिती तंत्रज्ञान उद्यान विकसीत करण्यासाठी किमान १० हेक्टर क्षेत्र आवश्यक आहे. ही बाब विचारात घेता विषयांकित क्षेत्र वादातीत नाही व मोकळे, निर्वेध असल्याबाबतच्या अटी / धोरणाच्या अधिन राहून उद्योग विभाग / महामंडळ यांनी सदर जागेच्या हस्तांतरणास तत्वतः सहमती दर्शविली होती. तथापि, या अटींची पुर्तता होत नसल्यामुळे तसेच म. औ. वि. महामंडळास सदर क्षेत्र विकसीत करणे किफायतशीर होणार नसल्याने, सदरचे क्षेत्राचे

हस्तांतरण शक्य होणार नाही, असे अभिप्राय म. औ. वि. महामंडळामार्फत शासनास कळविणेत आले होते. सदर प्रस्तावास शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे.

तत्कालीन उद्योग मंत्री यांचे अध्यक्षतेखाली दि. २०/६/२०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये भोर येथे माहिती तंत्रज्ञान उद्यान विकसीत करण्याबाबत चर्चा करणेत आली. सदर विषयी ही जागा माहिती तंत्रज्ञान उद्यान विकसीत करण्यासाठी अपूरी असल्याने महामंडळातर्फे माहिती तंत्रज्ञान उद्यान विकसीत करता येवू शकणार नाही, असा निर्णय यापूर्वीच झाला आहे, त्यामुळे भोर नगरपरिषदेनेच सदर जागेबाबत एकात्मिक औद्योगिक क्षेत्र (Integrated Industrial Area IIA) विकसीत करण्याबाबतचा प्रस्ताव उद्योग विभागाकडे सादर केल्यास जागेचा उपयोग औद्योगिक प्रयोजनासाठी होवू शकतो अशी चर्चा झाली असून, सदर बैठकीमध्ये IIA बाबत भोर नगरपरिषदेने पुढील निर्णय घ्यावा असा निर्णय बैठकीत घेण्यात आला आहे.

भोर औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याकरिता मौजे उत्रोली ता. भोर, जि. पुणे येथील खाजगी क्षेत्र १२६.८४ हेआर., व मौजे- वडगांव (डाळ), ता. भोर, जि. पुणे येथील ८४.४९ हे. आर. अशी एकुण खाजगी क्षेत्र २११.३३ हेआर. क्षेत्र व २.०० हेआर. सरकारी क्षेत्र असे एकुण २१३.३३ हे. आर जमीन संपादन करणेसाठी शासनाने दि.२१.१०.१९९२ रोजीच्या अधिसुचनेव्दारे मऔवि अधिनियम १९६१ मधील प्रकरण ६ च्या तरतुदी लागु केल्या आहेत.

महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियमाच्या अंतर्गत कलम ३२(२) दिनांक १/४/१९९३ रोजी राजपत्रात प्रसिद्ध केलेली आहे. त्याअनुषंगाने संबंधितांना व्यक्तिगत भूसंपादनाच्या नोटीसा बजावण्यात आलेल्या होत्या. प्रस्तुत भुसंपादन प्रकरणी ग्रामस्थांनी मोठया प्रमाणात विरोध केल्यामुळे संयुक्त मोजणीचे काम बंद करण्यात आले होते. त्यामुळे प्रकरणी अद्याप पर्यंत पुढील भूसंपादन कार्यवाही होऊ शकली नाही.

तद्नंतर सदर औद्योगिक क्षेत्राचे भूसंपादन होणे बाबत, स्थानिक विद्यमान विधानसभा सदस्य यांचे मार्फत शासनास विनंती करण्यात आली. त्या अनुषंगाने म. औ.वि. महामंडळाच्या मुख्यालयीन समितीने दिनांक २६/०५/२०१७ रोजी स्थळ पहाणी करुन, भूसंपादन प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिलेले होते. तद्नंतर उपविभागीय अधिकारी, भोर यांचेमार्फत भूसंपादन करणेकामी प्रयत्न करण्यात आले. परंतू, औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यास बहुतांश खातेदारांचा विरोध असल्याने व संमती असलेल्या क्षेत्रास सलगता नसल्याने सदर क्षेत्र विनाअधिसूचित करणेकामी मुख्यालयीन भुनिवड समितीची दिनांक २४/०२/२०२२ रोजी स्थळ पाहणी करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने शासनाच्या उच्चाधिकार समितीच्या दिनांक ०१/०४/२०२२ रोजीच्या १४० व्या बैठकीमध्ये बहुतांश खातेदारांचा विरोध असल्याने व संमती असलेल्या क्षेत्रास सलगता नसल्याने सदर संपुर्ण क्षेत्र विनाअधिसुचीत करण्यास उच्चाधिकार समितीने मंजूरी दिलेली आहे. त्याअनुषंगाने सदर क्षेत्र विनाअधिसूचित करणेसाठी म. औ.वि. अधिनियम १९६१ अन्वये पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

**************************

<u>लक्षवेधी सूचना क्र. २२८१</u>

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

**श्री. देवराव होळी, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २२८१ पुढीलप्रमाणे आहे :-**

" चंद्रपूर जिल्ह्यातील कुसुंबी, ता.जिवती येथील आनंदराव मेश्राम व इतर २४ आदिवासींची ६३.६२ हे. आर जमिन मागील ४२ वर्षांपासून माणिकगड कंपनीने बेकायदेशीर रित्या बळकावलेली असणे, कंपनीने स्थानिक प्रशासनिक अधिका-यांना हाताशी घेऊन दिनांक १९ मार्च, १९८५ पासून बेकायदेशीरपणे ताब्यात घेतल्याचे निदर्शनास येणे, त्या जमिनीचा योग्य तो मोबदला या मिळावा याकरीता मागील ४२ वर्षांपासून आदिवासी बांधवांनी सातत्याने तहसीलदार, उपविभागीय अधिकारी व जिल्हाधिकारी यांच्याकडे न्याय मागण्यासाठी याहक्कासाठी लढा सुरू असणे, यासंदर्भात आतापर्यंत विधानसभेत लक्षवेधी, तारांकित प्रश्न होऊन त्यावर शासनस्तरावर चर्चा होणे, सदर प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांच्या अटकेचे ही आदेश होणे, तद्नंतर १९८५ मध्ये मोबदला दिल्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडून खोटे शपथपत्र न्यायालयात सादर करणे, मात्र वास्तविक असा कोणत्याही प्रकारचा मोबदला दिल्याबद्दलचा पुरावा शासन स्तरावर नसणे, यावरून अजूनही या शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचा मोबदला न मिळाल्याचे सिद्ध होणे, करिता सदर जमिनीचे एमआयडीसी मार्फत शासनाने अधिग्रहण करून जमीन ताब्यात घेऊन या शेतकऱ्यांना मोबदला देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री, महसूल यांचे निवेदन.**

मे. मानिकगड कंपनी गडचांदूर यांना चुनखडक उतखनन करण्याकरीता उदयोग उर्जा व कामगार विभागाचे पत्र दिनांक ३०.४.१९७९ अन्वये ६४३.६२ हे.आर क्षेत्रावर खनिपट्टा मंजूर करण्यात आला आहे. या अनुषंगाने चंद्रपुर जिल्हयातील जिवती तालुक्यातील कुसुंबी येथील मानिकगड सिमेंट कंपनीकरीता ६३.६२ हे.आर जागेचे म.ज.म.अ. १९६६ अन्वये जिल्हाधिकारी चंद्रपुर यांचे आदेशान्वये भुपृष्ठ हक्काचे संपादन करण्यांत आले होते. भुपृष्ठ हक्क संपादनात घराचा शेतीचा आणि संपादीत इतर मालमत्तेचा मोबदला तत्कालीन उपविभागीय अधिकारी,राजूरा यांचा अहवाल दिनांक २५.१.१९८५ च्या नुसार निश्‍चित केल्याचे दिसुन येते. तसेच जिल्हाधिकारी चंद्रपुर यांचा संदर्भ दिनांक २६.७.१९८५ अन्वये आणि इतर उपलब्ध दस्ताऐवज यावरुन संबंधीत जमिन धारकांना भुपृष्ठ हक्काचे संपादनाबाबत मोबदला वाटप केल्याचे दिसुन येते. खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम, १९५७ च्या कलम ८ मधील उपकलम (२) महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचे आदेशपत्र क्र. एमएमएन.-२२०१/५०/उद्योग-९, दिनांक १५.११.२००२ अन्वये २० वर्षाकरीता प्रथम नुतणीकरण व खाण व खनिजे (विकसन व विनियमन) सुधारीत अधिनियम, २०१५ च्या कलम ८ अ मधील उपकलम (५ व ६) नुसार शासन आदेश उद्योग उर्जा व कामगार विभाग, दिनांक १०.०८.२०१८ अन्वये खाण पट्टयाचा पुढील १० वर्षासाठी कालावधी वाढविण्यात आलेला आहे. सदर खनिपट्टा नुतनीकरण होऊन दिनांक १६.०८.२०३१ पर्यंत कंपनीस मंजूर आहे. सद्य:स्थितीत ४९३.३८ हे.आर जमिनीचे लिज कंपनीकडे असुन त्यापैकी ४२९.७६ हे.आर क्षेत्र वनक्षेत्र असुन ६३.६२ हे.आर महसुल क्षेत्र आहे. त्यामुळे सदर जमिन बेकायदेशीरपणे ताब्यात घेतली आहे, ही बाब खरी नाही.

रोटा ५/१६५१ (८००-२-२४) C कृमा.प.

सदर प्रकरणात प्राप्त निवेदनावर जिल्हाधिकारी स्तरावर वेळोवेळी बैठका होऊन समस्यांचे निराकारण करण्यात आले आहे. सदर विषय विधानमंडळात विविध आयुधामार्फत उपस्थित होवून त्याअनुषंगाने, निवेदन व उत्तरे देण्यात आली आहेत. मा.मुख्यमंत्री यांनी मा.विधान सभा सदस्य यांच्या निवेदनावर बैठक घेण्याबाबत दिलेल्या निर्देशानुसार अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्तरावरील झालेल्या बैठकीतील चर्चा व निर्णयाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना उचित कार्यवाही करण्याबाबत दि.२१.०६.२०२३ च्या पत्रान्वये निर्देशित केले आहे.

सदर प्रकरणात कुसुंबी येथील काही शेतक-यांमार्फत राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग, नवी दिल्ली यांचेकडे तक्रार केलेली होती. या संदर्भात मा.आयोगाने जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना समक्ष हजर राहून म्हणने सादर करण्याचे निर्देश होते. परंतू कार्यबाहूल्यामुळे स्वतः जिल्हाधिकारी, चंद्रपूर हजर राहू शकत नसल्यामुळे तत्कालीन उपजिल्हाधिकारी (अतिक्रमण) यांना उपस्थित राहण्याबाबत प्राधिकृत करण्यात आले होते. परंतू तद्नंतर Warrant of Arrest of witness by Hon. Commission File No. NCST/DEV-७३०/MH/१७/२०२२- ESDW दिनांक २१ फेब्रुवारी २०२३ अन्वये Warrant of Arrest काढण्यात आले. त्याअनुषंगाने मा. आयोगासमोर जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे मार्फत दिनांक ०२ मार्च २०२३ रोजी म्हणने मांडण्यात आलेला असून व सविस्तर अहवाल सुध्दा सादर करण्यात आलेला आहे.

विषयांकीत प्रकरणात खाणपट्टा मंजूर करण्यात आलेला कालावधी दिनांक १६.०८.२००१ ला संपल्याने कंपनीने वर्ष २००२ मध्ये नूतनीकरण करतांना संबंधितांना मोबदला दिला नसल्याचे कारणास्तव तसा मोबदला मिळण्याकरीता श्री. आनंद मारू मेश्राम यांनी मा. उच्च न्यायालय,खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र. ९१३/२०१५ दाखल केलेली होती. सदर याचिकेमध्ये दिनांक २७.०६.२०१६ रोजी न्याय निर्णय पारित झाला असून "याचिकाकर्ता आनंद मारू मेश्राम यांनी स्वेच्छेने ताबा दिलेला असून त्यांना नुकसान भरपाई मिळालेली आहे." असे निरिक्षण नोंदवून "अनेक दशकापासून खाणकाम सुरु असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता, सदर याचिका मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी खारीज केली आहे" तसेच सदर आदेशात मा. उच्च न्यायालयाने " We find that the process of law is being abused" असे मत व्यक्त केलेले आहे. सदर आदेशाविरोधात मा. सर्वोच्च न्यायालयात Case no. S.L.P. (C) No.०३५०६३/२०१६ and S.L.P. (C).CC No. ०२२०१२/२०१६ अन्वये अपील दाखल करण्यात आलेली असून त्याबाबतची सद्यःस्थिती पुढील प्रमाणे आहे-Pending-(Motion Hearing) (After Notice (For Admission)-Civil Cases) IA Allowed. सद्यःस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे संदर्भ दिनांक २६.०७.१९८५ च्या संदर्भान्वये इतर उपलब्ध दस्ताऐवज यावरुन संबंधीत जमीन धारकांना भुपृष्ठ हक्काचे संपादनाबाबत मोबदला वाटप केल्याचे दिसून येते.

*************

लक्षवेधी सूचना क्रमांक-१३८४

## महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना

## सन २०२३ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

श्री.रवि राणा, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १३८४ पुढीलप्रमाणे आहे :-

""मुख्यमंत्री सचिवालय कक्ष जिल्हाधिकारी अमरावती स्थित कार्यालयाचे विशेष कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालयाचे पत्र.क्र. १६३/२०२३ दि.२३ फेब्रुवारी २०२३ रोजी अप्पर मुख्य सचिव मुख्यमंत्री सचिवालय मंत्रालय मुंबई यांना अमरावती जिल्हयातील स्थानिक लोक्रतिनिधींचे मागणी प्रमाणे सहसंचालक हिवताप हत्तीरोग जलजन्य रोग पुणे यांचे आस्थापनेवरील प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी (प्रयोगशाळा तंत्रज्ञ) या पदाचे वेतन तफावत सुधारणा करण्यासाठी तसेच या पदाच्या पद शुरखलेत बदल करण्यासाठी पत्र पाठवले असणे, तसेच आरोग्य संघटनेच्या महिला जिल्हा उपअध्यक्ष पुष्पा नारायण वाणखडे यांचे निवेनाद्वारे केलेली मागणी अमरावती जिल्हा परीषद आरोग्य सेविका एल.एच.व्हीं. या प्रवार्गाच्या मागण्या मंजूर करण्यासाठी मुख्यमंत्री कार्यालयकडे विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती येथील उपायुक्त आस्थपणा यांनी दि. ३१/१०/२०२३रोजी पत्र पाठवले असणे,तसेच वरील मागण्या मंजूर करण्यासाठी सातत्याने पत्र पाठवले जात असणे,तरीपण अद्याप पर्यंत शासनाकडून कोणताच निर्णय झाला नसणे, त्यामुळे वरील आरोग्य कर्मचारी, अधिकारी यांच्यामध्ये असंतोष, चीडीची भावना लक्षात घेता शासनाने वरीत नमुद मागण्यासंबंधी तातडीने करावयाची आवश्यक कार्यवाही तसेच शासनाची प्रतिक्रिया " "

---

**मा.प्रा.डॉ.तानाजी सावंत, मंत्री (सार्वजनिक आरोग्य विभाग आणि कुटुंब कल्याण) यांचे निवेदन :-**

राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग) पुणे यांच्या आस्थापनेवर प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी या संवर्गाचे एकूण १६७२ पदे मंजूर असून त्यापैकी सद्यस्थितीत ८३५ पदे भरलेली आहेत. सदर पदे सरळ सेवेची असून सेवाप्रवेश नियमानुसार सरळ सेवा भरती प्रक्रियेद्वारे भरली जातात. या पदाची वेतनश्रेणी सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे पी.बी-२ (९३००-३४८००) ग्रेड-पे ४२०० असून सातव्या वेतन आयोगात पे मॅट्रीक एस-१३ (३५४००-११२४००) अशी आहे. प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी या पदास पदोन्नती साखळीतील पुढील पदोन्नतीचे पद आरोग्य पर्यवेक्षक (गट क) असून सदर पदाची सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतनश्रेणी पी. बी. २ (९३००-३४८००) ग्रेड पे ४२०० आहे. सातव्या वेतन आयोगात पे मॅट्रीक एस-१३ (३५४००-११२४००) अशी वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेली आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत उपसंचालक आरोग्य सेवा परिमंडळे यांचे आस्थापनेवर देखील समपदनाम प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी (गट क) ही पदे मंजूर आहेत. या पदाची वेतनश्रेणी सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे पी. बी. २ (९३००-३४८००) ग्रेड पे ४२०० आहे. तथापि सदर पद परिमंडळ

अंतर्गत एकाकी असल्यामुळे सदर पदास पदोन्नती साखळी उपलब्ध नाही. त्यामूळे प्रचलित शासन नियमानुसार बारा वर्षाच्या सेवेनंतर समूचीत ग्रेड वेतन रु. ५०० इतकी वाढ देण्याची तरतूद होती. परंतु, दिनांक ०१.०१.२०१६ पासून सातवा वेतन आयोग लागू करण्यात आलेला आहे. त्यानुसार वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ०२.०३.२०१९ अन्वये पदोन्नतीची संधी उपलब्ध नसणाऱ्या कर्मचा-यांना आलेली कुंठीतता घालवीण्याकरिता सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत १०, २०, व ३० वर्षाची नियमित अर्हताकारी सेवा पूर्ण झाल्यानंतर लाभ मंजूर करण्याची योजना आंमलात आलेली आहे. त्यामुळे ज्या पदांना पदोन्नतीची संधी उपलब्ध नाही अशा पदावर कार्यरत कर्मचाऱ्यास लगतची वेतनश्रेणी मंजूर करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग जलजन्यरोग) पुणे या कार्यालयाच्या आस्थापनेवरील प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी या पदास पदोन्नती साखळीतील पुढील पद आरोग्य पर्यवेक्षक (गट क) आहे. सदर पदावर पदोन्नती झाल्यास पदोन्नतीच्या अनुषंगाने एक मानिव वेतनवाढ दिली जाते. परंतु कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनश्रेणीत बदल होत नाही. आरोग्य पर्यवेक्षक पदावर पदोन्नती देण्याची तरतूद सेवा नियमात अंतर्भूत असल्याने विद्यमान सेवाप्रवेश नियमानुसार कार्यवाही केली जात आहे.

प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी यांच्या वेतनश्रेणी वृध्दी करण्याबाबतचा सकारात्मक प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभागाकडून वेतन सुधारणा समिती समोर सादर केला होता. तथापि, वेतन सुधारणा समितीने खंड-१ व खंड-२ अधिसूचित करताना या संवर्गाच्या वेतनश्रेणी वृध्दी केलेली नाही.

जिल्हा परिषद आरोग्य सेविका या प्रवर्गाच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करणेबाबत निवेदन प्राप्त झालेले होते. त्यातील काही प्रमुख मागण्या पैकी एन. पी. एस. योजना रद्द करून जुनी पेन्शन लागू करण्यात यावी, आरोग्य सेविका यांना पदोन्नती देतांना एल.एच.व्ही. प्रशिक्षणाची अट रद्द करावी, लेखाशिर्ष २२११ व २२१० अंतर्गत मंजूर असलेली व व्यपगत झालेली एल.एच.व्ही. ची पदे चालू ठेवावी, तालुका स्तरावर, जिल्हा मुख्यालयामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी दोन एल.एच.व्ही. व ए. एन. एम. पदाची स्थापना व्हावी, कायम प्रवास भत्त्यामध्ये वाढ करावी, ५ दिवसाचा आठवडा लागू करावा, कोरोना काळात केलेल्या कामा बाबत त्यांना प्रोत्साहनपर दोन वेतनवाढी मंजूर करण्यात याव्यात. या व इतर मागण्यांचे निवेदन प्राप्त झालेले होते. सदर प्रकरणी निवेदनाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही चालू आहे.

********************************

*लक्षवेधी सूचना क्रमांक-५८७*

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

**श्रीमती. प्रतिभा धानोरकर, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. विकास ठाकरे, श्री. सुनिल केदार, श्री. शिरिष चौधरी, श्री. संजय रायमुलकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.५८७ खालीलप्रमाणे आहे :-**

"चंद्रपूर जिल्हयातील वरोरा तालुक्यात कृषी उत्पन्न बाजार समिती अस्तीत्वात असणे, सदर तालुक्यात कांदयाचे उत्पादन अत्यल्प होत असल्याची माहिती कृषी विभागात मार्फत दिलेली असणे, सदर कृषी उत्पन्न बाजार समितीत कांदा विक्रीसाठी आलेला नसणे, तरी देखील तेथील कर्मचारी व काही संचालक मंडळी यांनी मिळुन कांदा उत्पादक तालुक्यात असल्याचे दाखवलेले असणे, शासनाची त्यातुन दिशाभुल केलेली असणे, शासनाच्या कांदा अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात कांदा विक्री केलेली नसतांना जमा झालेली असणे, जमा झालेली रक्कम मागण्यासाठी काही संचालक मंडळींनी दलालाची निवड केलेली असणे, शेतकऱ्यांना मिळालेली अनुदान परत करण्यासाठी दलालाचा दबाव असणे, या मुळे शासनाच्या पैशाचा अपव्यय होत असणे, सामान्य नागरीकांची दोषी अधिकारी व संचालक मंडळावर कार्यवाही ची मागणी होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया."

---

मा. मंत्री (पणन) यांचे निवेदन

राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यामध्ये, खाजगी बाजार समित्यामध्ये, थेट पणन अनुज्ञप्तीधारकांकडे अथवा नाफेडकडे दिनांक १ फेब्रुवारी २०२३ ते दिनांक ३१ मार्च २०२३ या कालावधीत लेट खरीप हंगामातील लाल कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना रुपये ३५० प्रति क्विंटल व जास्तीत जास्त २०० क्विंटल प्रति शेतकरी याप्रमाणे अनुदान देण्याचा शासन निर्णय, दिनांक २७/३/२०२३ अन्वये निर्णय घेण्यात आला आहे.

सदर कांदा अनुदान योजना राबविण्यासाठी शासनाने विहित केलेल्या अटी व शर्तींचे पालन करून कांदा अनुदान अर्जाची छाननी करणे आवश्यक होते.

कृषि उत्पन्न बाजार समिती वरोरा अंतर्गत कांदा अनुदानास पात्र ६७६ लाभार्थ्यांच्या बँक खात्यात दि. ०६/०९/२०२३ रोजी रु. २,३०,०८२.९०/- ( २ कोटी, ३० लाख, ८२ हजार, ९० पैसे ) एवढी रक्कम शासनाकडून जमा करण्यात आली आहे. तथापि, कृषि उत्पन्न बाजार समिती वरोरा येथे कांदा विक्रीचे व्यवहार झाले नसल्याबाबत विविध मुद्दे निदर्शनास आणून सदर ठिकाणी कांदा अनुदानाबाबत अफरातफर झाल्याची बाब श्रीमती प्रतिभा धानोरकर, विधानसभा सदस्य यांनी शासनाच्या निदर्शनास आणली होती.

त्याअनुषंगाने शासनाने दिनांक १२/१०/२०२३ च्या शासन निर्णयान्वये कृषि उत्पन्न बाजार समिती, वरोरा येथील कांदा अनुदान वितरणाबाबत झालेल्या अनियमितेतची सखोल चौकशी करणेसाठी सहसचिव (पणन) यांचे अध्यक्षतेखाली ५ सदस्यांची समिती गठीत करण्यात आलेली होती.

कृ.मा.प.

ROTA-H-1635-1(700-2-2024)

सदर समितीने दि. २५/१०/२०२३ व २६/१०/२०२३ रोजी कृषि उत्पन्न बाजार समिती, वरोरा, जि. चंद्रपूर येथे भेट देऊन कांदा अनुदान संदर्भातल्या बाजार समितीकडील सर्व कागदपत्रांची तपासणी केली. तपासणी वेळी कांदा अनुदान कामकाज संदर्भातील बाजार समितीतील संबधित अधिकारी / कर्मचारी यांचे लेखी / तोंडी जबाब घेण्यात आले. तसेच सदर योजनेची अंमलबजावणी करताना गावपातळीवरील समितीने दिलेल्या अहवालाबाबत तलाठी, ग्रामसेवक व कृषि सहाय्यक यांचेही जबाब घेण्यात आले. ज्या व्यापाऱ्यांनी कांदा अनुदानासाठी शेतकऱ्यांना कांदा विक्री पट्टी दिलेल्या आहेत अशा सर्व व्यापाऱ्यांचे ही जबाब घेण्यात आले. त्याचबरोबर कांदा अनुदान संदर्भातील तालुका स्तरीय छाननी समिती सदस्य व जिल्हा स्तरीय छाननी समिती सदस्यांचे जबाब घेण्यात आले.

वरील सर्व घटकांचे लेखी व तोंडी जबाब घेतल्यानंतर कांदा अनुदान पात्र करण्यात आलेल्या एकूण ६७६ शेतकऱ्यांनी कांदा अनुदान मागणी अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. तपासणी अंती चौकशी समितीला खालील बाबी आढळून आलेल्या आहेत.

सचिव कृषि उत्पन्न बाजार समिती, वरोरा यांनी तहसिलदार वरोरा, भद्रावती व चिमूर यांना दि. ११/०५/२०२३ च्या पत्रान्वये शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर कांदा पीक पेऱ्याची नोंद आहे किंवा नाही याची शहानिशा करण्यासाठी गाव पातळीवर नेमलेल्या संबधित तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक यांचे समितीकडून तपासून अहवाल देणेबाबत पत्र दिलेले होते. सदर समितीचा अहवाल तालुका स्तरीय छाननी समितीला प्राप्त होण्याअगोदरच तालुका स्तरीय छाननी समितीने एकुण प्राप्त ७१२ अर्जापैकी ६७६ शेतकऱ्यांचे कांदा अनुदान मागणीचे अर्ज पात्र करुन जिल्हा स्तरीय छाननी समितीकडे पाठवण्यात आलेले होते. जिल्हा स्तरीय छाननी समितीने याबाबत कोणतीही शहानिशा न करता सदर ६७६ अर्ज पात्र केलेले आहेत. परंतु सदर पात्र अर्जांपैकी बहुतांश अर्जासोबत जोडलेल्या ७/१२ उताऱ्यावर कांदा पीकपेऱ्याची नोंद आढळून आलेली नाही.

प्रथमदर्शनी या प्रकरणात अनेक अनियमितता झालेल्या दिसून आल्या आहेत. याबाबत चौकशी समितीने शासनास दि. २९/११/२०२३ रोजी सादर केलेल्या अहवालातील शिफारसीस शासनाने मान्यता दिल्यानुसार संबंधितांवर कारवाई करणेबाबत पणन संचालक- महाराष्ट्र राज्य पुणे, सह सचिव( आस्थापना) सहकार विभाग तसेच जिल्हाधिकारी-चंद्रपूर, मुख्य कार्यकारी अधिकारी-चंद्रपूर व जिल्हा कृषि अधिकारी-चंद्रपूर यांना शासन पत्र दिनांक ०४ जानेवारी २०२४ निर्देश देण्यात आले आहेत.

***********************

H-1635-1A

लक्षवेधी सूचना क्र.२२५०

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

डॉ. राहूल आहेर, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान परिषद नियम १०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२२५० पुढीलप्रमाणे आहे :-

"नाशिक जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समित्या, थेट पणन परवानाधारक, खाजगी बाजार व नाफेड खरेदी केंद्र यांचेकडील कांदा अनुदानासाठी पात्र असलेले एकूण १७२१५२ लाभार्थी शेतकऱ्यांना २०२३ मध्ये शासनाकडून ४३५.६१ कोटी अनुदान मंजूर करण्यात आलेला असणे, सहकार व पणन विभागाकडील दिनांक ३० ऑगस्ट, २०२३ रोजीचे शासन निर्णयानुसार कांदा अनुदानापैकी पहिला टप्पा प्रत्येकी लाभार्थी रु.१०,०००/- (अक्षरी रुपये १० हजार) अदा करण्यात आलेला असणे, सहकार व पणन विभागाकडील दिनांक १५ सप्टेंबर, २०२३ रोजीचे शासन निर्णयानुसार मंजूर कांदा अनुदानापैकी दुसरा टप्पा प्रत्येकी लाभार्थी रु.१०,०००/- (अक्षरी रुपये १० हजार) अदा करण्यात आलेली असणे, अद्यापपावेतो शासनाकडून ०२ टप्प्यात प्रत्येक लाभार्थ्यांस एकूण रु.२०,००० पर्यंतची संपूर्ण रक्कम संबंधीत लाभार्थ्यांना अदा करण्यात आलेली असणे व २१२.८३ कोटी रुपये रक्कम अदा करणे बाकी असणे, उर्वरीत रक्कम अदा करण्याकरीता शासनाने तात्काळ कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने न, तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."."

---

मा. मंत्री (पणन) यांचे निवेदन

पणन संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या दिनांक २५.०८.२०२३ च्या पत्रान्वये सादर केलेल्या अहवालानुसार नाशिक जिल्ह्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्या, थेट पणन परवानाधारक, खाजगी बाजार व नाफेड खरेदी केंद्र यांचेकडील कांदा अनुदानासाठी पात्र असलेले एकूण पात्र लाभार्थ्यांची संख्या १,७२,१५२ असून त्यासाठी रू.४३५,६१,२३,५७८/- (अक्षरी रूपये ४३५ कोटी ६१ लाख २३ हजार ५७८ फक्त) इतका निधी आवश्यक होता. तसेच संपूर्ण राज्यातील कांदा अनुदानासाठी वितरीत करावयाच्या एकूण अनुदानाची रक्कम रू. ८५७,६७,५८,६०८/- कोटी (रू.८५७ कोटी, ६७ लाख, ५८ हजार,६०८) इतकी आवश्यक असल्याचे पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी कळविले होते.

पणन संचालक यांनी कळविलेल्या प्राथमिक अंदाजानुसार विधीमंडळाच्या २०२३ च्या पावसाळी अधिवेशानात रु. ५५० कोटी इतका निधी पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आला. त्यापैकी वित्त विभागाने प्रथमत: या योजनेसाठी रू.४६५.९९ कोटी (अक्षरी रूपये ४६५ कोटी, ९९ लाख फक्त) इतकी रक्कम खर्च करण्यास मान्यता दिली होती.

त्यानुसार शासन निर्णय दि. ३०/०८/२०२३ अन्वये त्यानुसार शासन निर्णय दि. ३०.०८.२०२३ अन्वये प्रथम टप्प्यात रू. १०.०० कोटी पेक्षा कमी अनुदानाची मागणी असलेल्या १४ जिल्हयातील पात्र लाभार्थ्यास संपूर्ण अनुदान व रू. १०.०० कोटी पेक्षा जास्त अनुदानाची मागणी असलेल्या उर्वरित १० जिल्हयातील लाभार्थ्यांना प्रथम टप्प्यात रू.१०,०००/- इतक्या मर्यादेत अनुदान वितरणाचा तसेच शासन पत्र दिनांक १५.०९.२०२३ अन्वये दुस-या टप्प्यात सदर १० जिल्हयातील लाभार्थ्यांना अजून रू.१०,०००/- इतक्या मर्यादेत अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला. तद्नंतर वित्त विभागाने उर्वरीत ८४.०१ कोटी इतका निधी वितरीत करण्यास मान्यता दिल्यानुसार शासन निर्णय दिनांक २४.११.२०२३ अन्वये रू. १०.०० कोटी पेक्षा जास्त अनुदानाची मागणी असलेल्या १० जिल्हयातील ज्या लाभार्थ्यांना प्रथम व दुस-या टप्प्यात रू. २०,०००/- इतक्या कमाल मर्यादेत अनुदान वितरीत करण्यात आले आहे अशा लाभार्थ्यांना रू. ४,०००/- इतक्या कमाल मर्यादेत अनुदानाचा तिसरा टप्पा मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

अद्यापपावेतो शासनाकडून ०३ टप्प्यात प्रत्येक लाभार्थ्यास एकूण रु.२४,००० /- पर्यतची रक्कम संबंधीत लाभार्थ्यांना अदा करण्यात आलेली आहे. नाशिक जिल्हयातील लाभार्थ्यांना ०३ टप्प्यात एकूण २६२.६७ कोटी इतकी रक्कम अदा करण्यात आलेली आहे. प्रसंगत: आय.सी.आय.सी.आय. बँकेच्या संगणक प्रणालीवर अपलोड केलेल्या तपशीलानुसार संपूर्ण राज्यातील पात्र नोंदीकरिता कांदा अनुदानासाठी एकूण रु. ८५१,६६,९३,६६३/-इतक्या निधीची आवश्यकता असल्याने विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे **रु.३०१,६६,९३,००० /- (रू. ३०१ कोटी, ६६ लाख, ९३ हजार फक्त)** इतका निधी मंजूर करुन घेण्यात आला आहे. त्यापैकी रु.२११.१६ कोटी इतका निधी खर्च करण्यास वित्त विभागाने मान्यता दिली असल्याने शासन निर्णय दि.०८/०२/२०२४ अन्वये प्रथम , दुसरा व तिसऱ्या टप्प्यात रू. २४,०००/- इतक्या कमाल मर्यादेत अनुदान वितरीत करण्यात आले आहे अशा लाभार्थ्यांना रू. २०,०००/- इतक्या कमाल मर्यादेत अनुदानाचा चौथा टप्पा मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.सदर अनुदान वितरणाची कार्यवाही सुरु आहे.

*********************************

H-1634-1A

लक्षवेधी सूचना क्रमांक-१४८३

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

**श्री. विजय वडेट्टीवार, श्री.अशोकराव चव्हाण, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १४८३ पुढीलप्रमाणे आहे:-**

""राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान (RMSA-रमसा) यांनी डाटा चोरी करण्याच्या आरोपामध्ये ब्लॅक लिस्ट करण्यात आलेल्या पुणे येथील 'लॅण्ड ए हैंड' या एनजीओ ला व्यावसायिक शिक्षा ट्रेनिंग करण्याकरिता पर्यवेक्षण आणि तपासणी करण्याची जबाबदारी देण्याची गंभीर बाब उघडकीस येणे, या संस्थेला सध्या सुरू असलेल्या ट्रेनिंगचे पर्यवेक्षण करण्याची जबाबदारी तसेच पूर्वी झालेल्या प्रशिक्षण कार्यक्रमांची देखील तपासणी करण्याची जबाबदारी देण्यात आली असणे, पूर्वी पर्यवेक्षण करण्याचे काम रमसाच्या अधिकाऱ्यांकडूनच केले जाणे, ब्लॅक लिस्ट असलेल्या संस्थेस ही जबाबदारी देण्याबाबत विचारणा केली असता रमसाच्या अधिकाऱ्यांनी आम्हाला या संबंधी कल्पना नसल्याचे सांगून चालढकल करणे, रमसाच्या माध्यमातून व्होकेशनल ट्रेनिंगकरिता करोडो रूपयांचे बजेट दिले जात असून यातील १५ टक्के रक्कम मॅनेजमेंट आणि मॉनिटरिंग करिता राखीव ठेवली जात असणे, आता या ब्लॅक लिस्ट असलेल्या "लॅण्ड ए हैंड" या संस्थेला ही रक्कम मिळणार असून यामध्ये काहीतरी गोडबंगाल असल्याचे बोलले जात असणे, व्यावसायिक शिक्षा ट्रेनिंगचे पर्यवेक्षण आणि तपासणीचे काम ब्लॅक लिस्ट असलेल्या संस्थेला देण्याऐवजी अटी शर्ती पूर्ण करणाऱ्या योग्य त्या अनुभवी संस्थेस काम मिळण्यासाठी पारदर्शकपणे निविदा प्रक्रिया राबविण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केंद्र सरकारकडे योग्य तो पाठपुरावा करण्याची आवश्यकता व यासंबंधी शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची भूमिका."

---

## श्री.दिपक केसरकर, मा. मंत्री शालेय शिक्षण यांचे निवेदन

सन २०१८ पर्यंत शालेय शिक्षण विभागामार्फत राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान ही योजना राबविण्यात येत होती. तथापि सन २०१८ मध्ये "समग्र शिक्षा" अंतर्गत सर्व शिक्षा अभियान व शिक्षक शिक्षण या योजनांसह सदर योजनेचे एकत्रिकरण करण्यात आले. या केंद्र पुरस्कृत योजनेची राज्यातील अंमलबजावणी या विभागाच्या अधिपत्याखालील राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई कार्यालयामार्फत करण्यात येते.

पूर्वीच्या राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान व सध्याच्या "समग्र शिक्षा" उपक्रमात व्यवसाय शिक्षण हा महत्वपूर्ण घटक आहे. "लेन्ड अ हॅन्ड इंडिया" या अशासकीय संस्थेशी राज्यात या घटकाच्या अंमलबजावणीसाठी सन २०१४ पासून वेळोवेळी सामंजस्य करार करण्यात आले आहेत. सध्या अस्तित्वात असलेला करार ३ वर्षे कालावधीचा असून तो दि.२३.१२.२०२४ रोजी संपुष्टात येत आहे. सदर अशासकीय संस्था राज्यात व्यवसाय शिक्षण घटकाची अंमलबजावणी करण्याकरीता विनामोबदला काम करीत आहे.

[कृ.मा.प.

राज्यात व्यवसाय शिक्षण प्रभावीपणे राबविण्यासाठी अशा प्रकारे विनामोबदला काम करण्याचा प्रस्ताव इतर कोणत्याही अशासकीय संस्थेकडून प्राप्त झाला नाही. "लेन्ड अ हॅन्ड इंडिया" ही संस्था सामंजस्य करारातील तरतुदीनुसार शाळांचे सर्वेक्षण, प्रशिक्षकांचे प्रशिक्षण, देखरेख, उद्योगांसोबत संपर्क, परीक्षा व प्रमाणपत्र, त्रयस्थ संस्थेमार्फत मुल्यांकन अहवाल सादर करणे इ.बाबतीत सहकार्य करते.

समग्र शिक्षा अंतर्गत व्यवसाय शिक्षणाकरीता मंजूर रकमेपैकी कोणतीही रक्कम राखीव ठेवली जात नाही. व्यवसाय प्रशिक्षकांची नेमणूक करणाऱ्या व नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कौन्सिल (NSDC) यांच्याकडे नोंदणीकृत असलेल्या व्यवसाय प्रशिक्षण संस्थांना कराराप्रमाणे १५% मॅनेजमेंट व मॉनिटरिंगची रक्कम अदा करण्यात येते. सध्या १७ व्यवसाय प्रशिक्षण संस्था कार्यरत असून त्यांनाच अशी रक्कम अदा केली जाते. त्यामुळे "लेन्ड अ हॅन्ड इंडिया" या संस्थेस अशी रक्कम मिळणार असल्याच्या दाव्यात कोणतेही तथ्य नाही. ही अशासकीय संस्था महाराष्ट्राबरोबरच अन्य अनेक राज्यात अशाच प्रकारचे काम करीत असून सदर संस्था ब्लॅक लिस्टेड असल्याबाबत तपशीलासह लेखी तक्रार अद्यापि प्राप्त झालेली नाही. सबब, यानुषंगाने कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

********************

H-1715+1A

लक्षवेधी सूचना क्र. ५८

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे तिसरे हिवाळी अधिवेशन

श्री. सुनिल केदार, श्री. अस्लम शेख, श्री. सुभाष धोटे, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, श्रीमती लताबाई सोनवणे, श्रीमती मंजुळा गावीत, श्री. मोहन मते, श्री. अजय चौधरी, डॉ. राहूल पाटील, श्री. सुनिल प्रभू, श्री.विजय वडेट्टीवार, श्री. अशोकराव चव्हाण, श्री.रविंद्र वायकर, श्री.अबू आजमी वि.स.स. यांच्या लक्षवेधी सूचना क्र.५८ वरील निवेदन अन्न व औषध प्रशासन मंत्री सभागृहासमोर ठेवतील:-

"राज्यात अन्न व औषधांच्या नित्कृष्ट दर्जामुळे सामान्याचे आरोग्यहित धोक्यात येऊ नये यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून सातत्याने धडक मोहिम राबविल्या जात असणे, राबविण्याची जबाबदारी ज्या औषधनिरीक्षकांवर असते त्यापैकी २१ पेक्षा जास्त औषध निरीक्षक बनावट असल्याची धक्कादायक माहिती दिनांक २२ नोव्हेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निर्देशनास येणे, सन २०१० मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने औषध निरीक्षक पदासाठी भरती प्रक्रिया राबविली असून ८१ नावांची शिफारस केली असणे, सन २०१२ मध्ये या पदांसाठी नियुक्ती दिलेली असणे, दोन वर्षाच्या कालावधीत उमेदवारांनी सादर केलेल्या प्रमाणपत्रांची छाननी करणे अपेक्षित असतांना प्रत्यक्षात तसे करण्यात आलेले नसणे, याच संधीचा फायदा नवनियुक्त औषध निरीक्षकांनी करून चक्क कमी शैक्षणिक अर्हता असलेले कागदपत्र, बनावट प्रमाणपत्र सादर करणे, लेखी परीक्षेमध्ये गुणवत्तेच्या कसोटीवर चोख नसलेल्या उमेदवारांना तोंडी परीक्षेमध्ये झुकते माप देणे, पात्र निकषांची पूर्तता केलेली नसतांनासुध्दा बनावट कागदपत्राच्या आधारावर २१ पेक्षा जास्त औषध निरीक्षकांची वरीष्ठ अधिकाऱ्यांनी पदाचा दुरुपयोग करून नियमबाहयरित्या या नियुक्त्या करणे, या नियुक्तीमध्ये शासनाच्या डोळयात धुळफेक करून गेल्या दहा वर्षापासून हे बनावट औषधनिरीक्षक विभागामध्ये कार्यरत असून शासनाकडून लाखो रुपयांची उचल करीत असणे, यासंदर्भात शासनाकडे लेखी तक्रार केली असतांनासुध्दा याप्रकरणाची चौकशी होत नसल्याने नागरिकांत पसरत असलेला तीव्र असंतोष, परिणामी याप्रकरणी उच्चस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करून संबंधितांवर कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

श्री. धर्मरावबाबा आत्राम, मा. मंत्री (अन्न व औषध प्रशासन) यांचे निवेदन

राज्याच्या अन्न व औषध प्रशासनातील औषध विभागाव्दारे, औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व नियम १९४५ ची अंमलबजावणी केली जाते. औषधांचा दर्जा व उपलब्धता आणि कायदयाची अंमलबजावणी करण्यासाठी औषध निरीक्षकांव्दारे वेळोवेळी धाडी जप्तीची कारवाई करण्यात येते.

राज्यात औषध निरीक्षकांची पदभरतीसाठी शासनाने ९६ पदांसाठी मागणीपत्र सादर केले होते. त्यानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून जाहिरात क्रमांक १५/२००७, दिनांक २१/१२/२००७, जाहिरात क्रमांक २०/२००८, दिनांक ११/२/२००८ व जाहिरात क्रमांक ६९/२००८, दिनांक २९/७/२००८ अन्वये पदभरतीसाठी तीन जाहिराती प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. या तिन्ही जाहिरातीच्या अनुषंगाने आयोगाने

एकच चाळणी परीक्षा व मुलाखत घेवून पात्र उमेदवारांबाबत दिनांक ०४/१२/२०१० रोजीच्या पत्रान्वये ६१ उमेदवारांची व दिनांक ०७/१२/२०१० रोजीच्या पत्रान्वये २२ उमेदवारांची शिफारस शासनास सादर केली होती.

उपरोक्त प्रमाणे शिफारस प्राप्त झाल्यानंतर शिफारस प्राप्त उमेदवारांचे पूर्वचारित्र आणि वर्तणूक तपासणी उमेदवारांचे शैक्षणिक तसेच जाती दाव्याच्या वैधता दाखल्याची पडताळणी करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली. सदर प्रक्रिया सुरु असताना मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद यांनी मुळ अर्ज क्र. ७०/२०११ व १९१/२०११ मध्ये औषध निरीक्षक गट-ब या पदांसाठी दिलेल्या जाहिरातीमधील उमेदवारांच्या निवडीसंदर्भातील विषद केलेली कार्यपध्दती व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने उमेदवार निवडीकरीता प्रत्यक्षात अवलंबविलेली कार्यपध्दती यामध्ये विसंगती आढळल्याने सदरची ८३ उमेदवारांची यादी रद्द करण्याबाबतचा निर्णय दिनांक ०३.०५.२०११ रोजी दिला. सदर न्यायनिर्णयाविरुध्द मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद यांच्याकडे दाखल झालेल्या विविध याचिकेच्या अनुषंगाने दिनांक २६.०८.२०११ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये मा. उच्च न्यायालयाने मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद यांच्या दिनांक ०३.०५.२०११ च्या निर्णयास स्थगिती दिली. तथापि, सदर आदेशामध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या ८३ उमेदवारांना नियुक्ती द्याव्यात किंवा कसे, याबाबत काहीही स्पष्ट केलेले नव्हते.

मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी दिलेल्या स्थगिती आदेशानुसार ८३ औषध निरीक्षकांना नियुक्त्या देण्यात याव्यात किंवा कसे, याबाबत तत्कालीन मा. मंत्री (अन्न व औषध प्रशासन) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १५.०९.२०११ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये औषध निरीक्षकांच्या नियुक्तीबाबतची निकड लक्षात घेता मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांच्या निर्दशनास आणून देण्यासाठी सहायक, सरकारी अभियोक्ता यांना शासन स्तरावरुन पत्र पाठविण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला. सहायक सरकारी अभियोक्ता यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या ८३ औषध निरीक्षक पदावरील उमेदवारांना नियुक्ती देता येईल किंवा कसे, याबाबत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्यात आले. विधी व न्याय विभागाने औषध निरीक्षक पदावरील उमेदवारांना मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद यांच्या न्यायनिर्णयाच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात उमेदवाराकडून वचनचिठ्ठी / हमी घेऊन नियुक्ती देण्याबाबत सहमती दर्शविली.

मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २८.०८.२०११ रोजी दिलेल्या स्थगिती आदेशाच्या अनुषंगाने श्री. सुजीत रंगनाथ भडके यांनी मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल केलेल्या रिट पिटीशन क्र. ५२१६/२०११ संदर्भात सिव्हील ॲप्लीकेशन क्र. १५०००/२०११ दाखल करण्यात आली होती. तसेच श्री. संतोषसिंग कपूरचंदसिंग राजपूत यांनी मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद येथे दाखल केलेल्या रिट पिटीशन क्र. ५२१६/२०११ संदर्भात सिव्हील ॲप्लीकेशन क्र. १५०००/२०११ दाखल करण्यात आले होते. सदर दोन्ही सिव्हील ॲप्लीकेशनवर दिनांक १५.१२.२०११ रोजी झालेल्या सुनावणीच्या दरम्यान मा. उच्च न्यायालय , औरंगाबाद यांनी औषध निरीक्षक पदावरील उमेदवारांना रिट पिटीशन क्र. ५२१६/२०११ वरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून नियुक्ती देण्यात याव्यात, असे आदेश दिले होते.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या ८३ उमेदवारांपैकी ३३ उमेदवारांचे अनुभवाचे प्रमाणपत्र बोगस असल्याबाबती तक्रार शासनास प्राप्त झाली. या ३३ उमेदवारांचे अनुभवाचे प्रमाणपत्र पडताळणीसाठी शासनाने आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांना पाठविले. अन्न व औषध प्रशासनातील अधिका-

यांकडून या उमेदवारांच्या अनुभवाच्या दाखल्यांबाबत पडताळणी केल्यानंतर आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांना त्यांचा पडताळणी अहवाल प्रथमत: दिनांक ०९/०१/२०१२ रोजी सादर केला व तद्नंतर इतर अहवाल शासनास सादर केले. ज्या उमेदवारांचे दाखल्याबाबत तक्रार प्राप्त झाली होती त्यांची योग्य ती पडताळणी शासनाने केली आहे व त्यानुसार कार्यवाही केलेली आहे.

औषध निरीक्षकांचे नेमणूकीबाबत व उमेदवारांच्या अनुभव प्रमाणपत्रांच्या सत्यतेबाबत श्री.लेकुरवाळे व इतर यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका क्रमांक ४५९७/२०१९, ४५९८-४६०१/२०१९, ४६०२/२०१९ दाखल केली. या याचिकेवर मा.उच्च न्यायालय यानी दिनांक १८/०२/२०२२ रोजीच्या आदेशान्वये ५५ उमेदवारांचे अनुभव दाखल्यांची फेरपडताळणी करण्यासाठी निर्देश दिले. त्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाचे दि.१८/०२/२०२२ रोजीचे आदेश व सदर आदेशाच्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने कळविलेली वस्तुस्थिती विचारात घेता ५५ औषध निरीक्षकांच्या अनुभव प्रमाणपत्रांची फेरपडताळणी करुन त्याबाबतचा अहवाल शासनास तात्काळ सादर करण्याचे निर्देश आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांना देण्यात आले. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांनी दिनांक ३१/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये ५५ उमेदवारांचे फेरपडताळणी अहवाल शासनास सादर केला आहे. सदर फेरपडताळणी अहवाल व ५५ उमेदवारांच्या अनुभव प्रमाणपत्रांबाबतची कागदपत्रे महाराष्ट्र लोकसेवा आयोगास आवश्यक त्या कार्यवाहीसाठी उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. सदर प्रकरण सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ आहे. प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या अंतिम न्यायनिर्णयानंतर पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.

*****

लक्षवेधी सुचना क्र.१४९८

## सन २०२३ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

श्री. विजय वडेट्टीवार, श्री. अशोकराव चव्हाण, श्री. सुरेश वरपुडकर, डॉ. नितिन राऊत, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. अमिन पटेल, श्री. अस्लम शेख, श्री. अमित विलासराव देशमुख. श्री. धिरज देशमुख, श्री. अमित झनक, श्री. विश्वजित कदम, श्री. सुभाष धोटे.श्री. सुनिल केदार, श्री. विकास ठाकरे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. संजय जगताप, श्री. विक्रमसिंह सावंत, वि.स.स.

"राज्यात ड्रग्जमाफियांनी नाशिक, कोल्हापूर, सोलापूर, संभाजीनगर, पैठण, नालासोपारा इ . ठिकाणी ड्रग्जचे कारखानेच उघडल्याचे निदर्शनास येऊन एकाच शहरात अब्जावधी रुपयांचा ड्रग्जचा साठा आढळून येणे, अशा प्रकारे एका बाजूला संपूर्ण राज्यच नशेच्या गर्तेत अडकले असताना स्वतंत्र अमली पदार्थविरोधी टास्क फोर्स निर्माण करण्याबाबत शासन स्तरावर निर्णय घेऊन पुरेशा मनुष्यबळाअभावी हा विभाग कार्यान्वित न होणे, परिणामी राज्यातील विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात एमडी ड्रग्जचे कारखाने पोलिसांनी उध्दवस्त करणे, या कालावधीत मुंबई पोलिसांनी मागील दोन वर्षात ५ हजार २४३ कोटी एमडी जप्त करुन आजपर्यंत ४९५ गुन्यांुची झालेली नोंद, संभाजीनगरमध्ये २५० कोटीपेक्षा जास्त किमतीचे अमली पदार्थ जप्त करण्यात आल्याची माहिती केंद्रीय महसूल गुप्तचर विभागाकडून प्रसिध्द होणे, नाशिक व सोलापूर ड्रग्ज तस्करीतील ७१८ आरोपींना अटक करण्यात येणे, तसेच मुंबई पोलिसांनी सन २०२३ मध्ये ३७१ कोटींचा अमली पदार्थांचा साठा जप्त करुन १८ ऑक्टोबर, २०२३ पर्यंत अमली पदार्थांचे ११८९ गुन्हे दाखल करुन १४६५ आरोपींना झालेली अटक, इतक्या मोठ्या प्रमाणात ड्रग्जची तस्करी राज्यात सुरु असताना ती रोखण्यात शासनाला आलेले अपयश, परिणामी ड्रग्जच्या विळख्यात अडकलेल्या तरुण पिढीचे आयुष्य उध्वस्त् होण्याची जनमानसात निर्माण झालेली भीती, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

## मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

नाशिक पोलीस आयुक्तालयाच्या हद्दित नाशिक रोड पोलीस हद्दीतील शिंदे गावात गट नं. ४५३ शिंदे-नायगांव रोड, जि. नाशिक येथे छापा टाकला असता, सदर फॅक्टरी ही शिंदेगावात साकीनाका मुंबई पोलीसांनी छापा टाकलेल्या कंपनीचे गोडावून होते. तेथे एम.डी. व त्याकरिता लागणारा कच्चा माल मिळून आल्याने नाशिकरोड पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ४६०/२०२३, एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ चे कलम ८ (क), २२ (क), २९ प्रमाणे दि. ०८.१०.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यात एकुण ९ आरोपी अटक करण्यात आले असुन एकुण रु ११,७९,००,३०० किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक कार्यालय, कोल्हापूर यांच्या कार्यक्षेत्रात सन २०२३ मध्ये एकुण २५ गुन्हे अंमली पदार्थाची अवैध वाहतुक, खरेदी - विक्री, साठा वगैरे बाबत व एकुण ३६ गुन्हे अंमली पदार्थाचे सेवन केले बाबत दाखल करण्यात आलेले आहेत.

मोखाडा पोलीस ठाणे, कावळपाडा गावाचे हद्दीत मेफेड्रोन हा अंमली पदार्थ तयार करण्याचे साहित्य व कच्चा माल मिळुन आल्याबाबत मिरा भाईंदर-वसई विरार पोलीस आयुक्तालयातील काशिमिरा गुन्हे शाखा, नवघर पोलीस ठाणे गु.र.नं. ६४०/२०२३ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ वे कलम ८ (सी), २२ (सी), २९ सह भा.ह.का. कलम ३, २५ व म.पो.अधिनियम १९५१ चे कलम ३७ चे पोटकलम (१) व (३) प्रमाणे दि. २२/१०/२०२३ रोजी दाखल गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सन २०२३ मध्ये छत्रपती संभाजीनगर पोलीस हद्दित एकुण ८६ गुन्हे दाखल करण्यात आले असुन रु.५३,१८,५२०/-किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर ग्रामीण हद्दीमधील एम पैठण पोस्टे हद्दीत डिआरआय ने कार्यवाही केली असुन त्याअनुषंगाने तेथील प्रभारी अधिकारी यांची नियंत्रण कक्ष येथे बदली करण्यात आली आहे. तसेच कारखाने तपासणीसाठी विशेष दोन पथके नेमुन तपासणी करण्यात येत आहे.

दि.३१.०८.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स स्थापन करण्यास तत्वत: मान्यता दिली आहे.त्यास अनुसरून सदर अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स करीता एकूण ३४६ नवीन पदे निर्माण करण्यास व त्यासाठी येणाऱ्या आवर्ती व अनावर्ती खर्चास (वाहन खरेदी सहीत) मान्यता देण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरू आहे.

महाराष्ट्र राज्यात सन २०२३ मध्ये मॅफेड्रोन संदर्भात एकूण ६४२ गुन्हे दाखल झाले असून ९६२ आरोपींना अटक करण्यात आली आहे व अंदाजे किंमत रू.७७२.१० कोटी इतक्या रकमेचे मॅफेड्रोन अंमली पदार्थ जप्त करण्यात आलेले आहेत.

मुंबई शहरामध्ये सन २०२३ या वर्षात एन.डी.पी.एस. कायद्यान्वये एकूण ११३४८ गुन्हे दाखल असून, ११६४५ आरोपी विरूध्द कारवाई करण्यात आलेली आहे. सदर कारवाई अंतर्गत अंदाजे किंमत रु. ४२७ कोटी, १८ लाख, २५ हजार, २८७ रुपये किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे.

विशेष पोलीस महानिरिक्षक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अंमली पदार्थांबाबतचे "समन्वय अधिकारी" म्हणून शासन निर्णय दि.०६.०१.२००७ अन्वये घोषित करण्यात आले आहे. तसेच केंद्र शासनाच्या दि.२५.०५.२०२२ च्या आदेशान्वये नार्कोकोऑर्डीनेशन यंत्रणेची पुनः रचना करण्यात आली असुन त्यानुसार दि. ३१.०८.२०२३ च्या शासन निर्णयाने अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) ची स्थापना करण्यात आली आहे. अंमली पदार्थावर आळा घालण्यासाठी राज्यस्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समिती व जिल्हा स्तरावर जिल्हास्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समितीची स्थापना करण्यात आली असून सदर समित्यांकडून अंमली पदार्थावर आळा घालण्याबाबत वेळोवेळी आढावा घेतला जातो.

राज्यात अंमली पदार्थाच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी सर्व पोलीस घटकामध्ये स्वतंत्र अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन केलेले आहेत.

जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिना निमित्त दरवर्षी २६ जून पासून १५ दिवस अंमली पदार्थ विरोधी पंधरवडा अभियान राबविले जाते. सदर कालवधीत अंमली पदार्थ विरोधी कक्ष, स्थानिक पोलीस ठाणे तसेच अशासकीय संस्था मार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळा, महाविद्यालय, रेल्वे स्थानक, महत्वाचे चौकांमध्ये अंमली पदार्थ विरोधी पोस्टर्स, बॅनर्स, पथनाट्यद्वारे तसेच e-pledge द्वारे जनजागृती केली जाते.

**********